# डॉ.बं.न.जाजू

# होस्टेलचे दिवस



a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# होस्टेलचे दिवस

डॉ. बं. न. जाजू

# होस्टेलचे दिवस

**लेखक : डॉ. बं. न. जाजू**

पत्ता : पत्ता: डॉ. बं. न. जाजू
ए2/402, शिवरंजन टावर्स
सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे 411008
सम्पर्क: व्हाट्सॅपँ क्र. 8668553115
ई मेल bnjajooin@yahoo. co. in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ३ जानेवारी २०२३

©esahity Pratishthan®2023


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. बं. न. जाजू



जन्म २७ सप्टेंबर १९४३.

डॉक्टर बंकटलाल जाजू यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील एका शेती आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात. एका लहानशा खेड्यात झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ग्रामीण भा्गात झालं. पुढे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथून बी. ई. (मेक्यनिकल ) आणि नंतर आय. आय. टी, मुंबई येथून एम. टेक. आणि पीएच. डी. पदव्या प्राप्त केल्या. 1966 ते २००१ असे पस्तीस वर्ष, महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागात, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, पुणे, औरंगाबाद, जळगाव येथे प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्राचार्य अशा अनेक पदांवर काम केलं. त्यानंतर, जी. एच. रायसोनी इंजीनीरिंग कॉलेज, नागपूर येथे पाच वर्ष प्राचार्य आणि पुढे ह. व्या. प्र. मंडळ, अमरावती ह्यांच्या इंजीनीरिंग कॉलेज मध्ये, पाच वर्ष प्राचार्य म्हणून काम केलं. एक ख्यातीप्राप्त, विद्यार्थिप्रिय आणि आदरणीय प्राध्यापक व प्राचार्य.

डॉ. जाजू यांना महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच इंडियन अचिव्हर्स फाऊंडेशन इंडिया चा शिक्षा भारती पुरस्कार प्राप्त. सी.

वी. रमन अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजीनीरिंग अँड टेक्नॉलजी तसेच इंनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड ही मिळाला. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर ६५ टेक्निकल शोध प्रबंध प्रकाशित. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व पोर्तुगल मध्ये, शोध प्रबंध वाचन केलं तसेच काही सेशन ही चेअर केले.


डॉ. जाजू इन्स्टिट्यूशन ऑफ इंजींनियर्स इंडियाचे फेलो तसेच कंबशन इंस्टीट्यूट ऑफ इंडिया आणि ISTEI चे आजीवन सदस्य आहेत.


डॉ. जाजू अमरावती, नागपूर, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मेंबर ऑफ सिनेट, डीन ऑफ फॅकल्टि, मेंबर ऑफ अॅकडमिक कौन्सिल, मेंबर ऑफ बी, यू, टी. आर. , मेंबर ऑफ स्पेशल Examination कमिटी म्हणून काम केले。 जीवनातील सर्व क्षेत्राशी जवळीक. साहित्य, नाट्य, संगित ह्यात विशेष रुचि. ते एक ख्यातीप्राप्त वक्ता असून त्यांनी आतापर्यंत जवळ जवळ १८० इन्व्हायटेड टेक्निकल Talks दिले आहेत.


-------------------------------------


ईसाहित्य प्रकाशित पुस्तके

फ़क्त एकदा क्लिक करा. उघडेल. वाचा.



a

जीवनात कसं बोलावं, वागावं, राहावं,

हे मी ज्यांच्या कडून शिकलो

त्या माझ्या होस्टेल मधल्या

अनेक मित्रांना

आणि

मी होस्टेल वार्डन असताना

मला सहकार्य करणाऱ्या, माझ्यावर प्रेम करणाऱ्या,

माझ्या अनेक विद्यार्थ्यांना

# अनुक्रम

मनोगत पान

- व्ही.एम.व्ही.-वेस्ट होस्टेल
- इंजीनियरिंग कॉलेज होस्टेल
- टिस्कोज होस्टेल-जमशेडपूर
- एच1-आय.आय.टी. बॉम्बे
- वार्डन म्हणून

**मनोगत:**

माझ्या विद्यार्थी जीवनात जवळजवळ सहा वर्ष मी तीन महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या होस्टेल मध्ये राहलो. होस्टेल मध्ये रहाण्याने विद्यार्थी, अनेक जीवन आवश्यक गोष्टी शिकतात. वेगवेगळ्या प्रांतांच्या, गावाच्या, जातीच्या, भाषेच्या विद्यार्थ्यांबरोबर आपण राहतो. हळूहळू ते आपले मित्र होतात. आप आपसात कसं राहावं, बोलावं हे आपण शिकतो. त्या काळात खऱ्या अर्थानं आपण एकमेकांच्या सुख दु:खाचे भागीदार असतो. अडीअडचणीत कोणाला कशी मदत करावी, हे, अन् टिम वर्क म्हणजे काय ते शिकतो. खऱ्या अर्थानं होस्टेल आपल्याला पुढच्या जीवनासाठी घडवतं, तयार करतं. मी आज जो आणि जसा आहे, तसा होण्यात माझ्या होस्टेल जीवनाचा फार मोठा वाटा आहे. माझ्या ह्या होस्टेल जीवनात मी असंख्य मित्र जोडले. आज पन्नास साठ वर्षांनंतर ही आम्ही अनेक मित्र एकमेकांच्या संपर्कात आहोत. एकमेकांशी अर्धा अर्धा तास फोन वर बोलतो. एकमेकांना मेल, मेसेजेस पाठवतो. जुन्या गोष्टींना अन् त्या आठवणींना उजाळा देतो. ह्या 75-80 वर्षाच्या वयात अशा मित्रांची नितांत गरज असते. मी भाग्यवान आहे की माझ्या ह्या होस्टेल च्या जीवनामुळे मला असे मित्र लाभले.

म्हणूनच मी माझ्या मुलालाही, तो मुंबईला व्ही.जे.टी.आय.ला शिकत असताना होस्टेल मध्येच ठेवलं. इतकंच काय, माझी नात (मुलीची मुलगी) पुण्याला जेव्हा इंजिनियरिंग ला गेली, तेव्हा माझ्या मुलीचं पुण्याला घर असूनही, आम्ही नातीला कॉलेज च्या मुलींच्या होस्टेल मध्ये ठेवलं. पहिली

तीन वर्ष ती होस्टेल मध्ये राहिली अन् फक्त फायनलला ती घरी राहिली. ह्यामुळे मुलांमध्ये झालेला बदल मी अनुभवला आहे. अगदी रूढ भाषेत सांगायचं, तर, होस्टेल मध्ये राहिल्याने मुलं माणसाळली॰ हा पालक म्हणून माझा अनुभव आहे.

पुढे तर मी औरंगाबादच्या इंजिनियरिंग कॉलेज च्या होस्टेलचा वार्डन म्हणूनही तीन वर्ष काम केलं. तेव्हा तर मी 250 विद्यार्थ्यांचा पालक होतो. मी स्वत: माझ्या संपूर्ण विद्यार्थी दशेत होस्टेल मध्ये राहलो असल्यानं, मला होस्टेल च्या विद्यार्थ्यांच्या अडचणी, त्यांचे प्रॉब्लेम्स, त्यांच्या अपेक्षा, त्यांची भांडण, त्यांच्या ट्रीक्स सारं काही चांगल्या रिती नं माहीत होतं. मी स्वत: होस्टेलर असतांनाचे माझे अनुभव अन् होस्टेल वार्डन असतांनाचे ही काही मजेदार अनुभव, मी ह्या पुस्तकात लिहले आहेत. मला विश्वास आहे की ते वाचकांना आवडतील. आवडले तर मला नक्की मेल, मेसेज करा. मला आनंद होईल. ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी ह्याच्या आधी, माझी चार पुस्तकं प्रकाशित केली आहेत. हे पाचवं पुस्तक. माझ्या, आधीच्या चार पुस्तकांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. मला बऱ्याच वाचकांचे फोन, मेसेजेस, मेल आल्या. खूप आनंद झाला.

वयाच्या 80 व्या वर्षी मी लिहतो आहे ह्याचं सर्व श्रेय ई साहित्य प्रतिष्ठानाने मला दिलेल्या ऊर्जेला अन् प्रोत्साहनाला जातं. ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांचा मी मनापासून आभारी आहे.

डॉ. बंकट जाजू



**व्ही.एम.व्ही.-वेस्ट होस्टेल (समोरून व मागून)**



# व्ही.एम.व्ही.-वेस्ट होस्टेल (समोरचा कॉर्नर)





**Group of hostel friends at V.M.V, Amravati**

**Standing: (Left to Right):** Raghu Bhalerao, Sohan Chopde, Laxman Dudhe, Pramod Markande, Damu Kute, Sakharam Kasture

**Sitting: (Left to Right):** Narayan Dusad, Bankat Jajoo, Sukhdeo Shelke, Shegunashi, Damu Ambhore, Uttam Kharat

# व्ही.एम.व्ही-वेस्ट होस्टेल

1961 ला मी बुलडाण्याच्या एडेड हायस्कूल मधून एस.एस.सी. झालो. विदर्भ बोर्डात मेरीट मध्ये 9 वा होतो. त्यामुळे पुढे नागपूर-अमरावतीच्या कुठल्याही महाविद्यालयात सहज प्रवेश मिळेल असं वाटत होतं. पण माझा मोठा भाऊ विदर्भ महा विद्यालय ( व्ही.एम.व्ही. ) अमरावतीत शिकत होता. त्या वर्षी तो बी.एससी० झाला होता अन तिथेच पुढे एम.एससी. करणार होता, म्हणून मी ही व्ही.एम.व्ही.त च प्रवेश घ्यायचं ठरवलं. व्ही.एम.व्ही. मध्ये मुलांचे दोन व मुलींचं एक अशी तीन होसटेल्स होती. मुलांसाठी असलेले दोन होसटेल्स म्हणजे, ईस्ट होस्टेल व वेस्ट होस्टेल. भाऊ चार वर्ष वेस्ट होस्टेल मध्येच होता. ही दोन्ही होसटेल्स तिन मजली होती. प्रत्येकी जवळ-जवळ 80 खोल्या असलेली. पहिल्या मजल्यावर ( Ground Floor ) साधारणतः: सर्व नव प्रवेशित ( म्हणजे आमच्या काळी ज्याला प्री यूनिव्हर्सिटी म्हणायचे ) विद्यार्थी राहायचे. ह्या मजल्यावर फक्त दोन खोल्यांचा अपवाद वगळता बाकी सर्व खोल्या फोर सिटर होत्या. त्या दोन, टू सीटर होत्या. हॉस्टेल मध्ये बहुधा पदवी उत्तर विद्यार्थी नसायचे. फक्त दोन सिंगल सिटर रूम्स होत्या त्यात मात्र

दोन पदवी उत्तर विद्यार्थी राहायचे. ते हॉस्टेल चे प्रिफेक्ट असायचे. आमची एक कॉमन रूम ही होती. तिच्यात मुख्यत: टेबल टेनिस चं एक टेबल व कॅरम बोर्ड्स असायचे. हॉस्टेलच्या मागच्या बाजूला तीन मेस होत्या . दोन एका बाजूला नंतर एक सहा बाथरूम्स चं यूनिट व नंतर तिसरी मेस. तिच्या थोडं बाजूला पोस्ट-ऑफिस होतं. ह्या सगळयांच्या मागे काही अंतरावर एक लांब लचक दहा-बारा संडासांचं यूनिट होतं. बाथरूम्स च्या समोर एक मोठा पाण्याचा हौद होता. त्याला तीन नळ होते.

पहिली मेस सिनियर म्हणजे पार्ट-2 आणि पार्ट-3 च्या विद्यार्थ्यांची. मधली प्री-यूनिव्हर्सिटी ची. अन् तिसरी पार्ट-1 च्या विद्यार्थ्यांची. ईस्ट आणि वेस्ट दोन्ही हॉस्टेल च्या मध्ये एक मोठं मैदान होतं॰ त्या मैदानावर त्या त्या होस्टेलची व्हालीबॉल व खोखो-कबड्डीचे ग्राऊंडस होते. संध्याकाळी त्यावर मुलं खेळायची. कॉमन रूम मध्येही टेबल टेनिस व कॅरम साठी गर्दी व्हायची. एका बाजूला दोन्ही होस्टेल ला कॉमन असलेला एक छोटा स्विमिंग पूल होता. त्यात वर्षात 2-3 महिनेच पाणी असायचं. दोन्हीही होस्टेल पासून कॉलेज अगदी चार मिनिटात चालून जाता येईल एवढ्या अंतरावर होतं. कॉलेज प्रचंड मोठं होतं. भव्य तीन मजली दगडी इमारतीत मेन ऑफिस, खाली आणि वर मोठमोठ्या क्लास-रूम्स, स्टाफ कॉमन रूम, पदार्थ विज्ञान व रसायन शास्त्राच्या प्रचंड मोठ्या प्रयोग शाळा, फिजिक्स व केमिस्ट्री लेक्चर थिएटर्स, एक मोठा कॉमन हॉल असं सर्व होतं. ह्या कॉमन हॉल मध्ये वर्ष भर मोठ मोठे कार्यक्रम व्हायचे. वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, अनेक प्रसिद्ध वक्त्यांची

भाषण, कवी सम्मेलनं, गायनाचे कार्यक्रम असं भरगच्च काहीतरी सुरूच असायचं. ह्या इमारतीच्या उजव्या बाजूला एक प्रचंड मोठी इमारत होती .ह्या इमारतीत मोठं वाचनालय, काही प्रयोग शाळा. अनेक क्लास-रूमस होत्या. ह्याला जीओग्राफी डिपार्टमेंट म्हणायचे. मुख्य इमारतीच्या विरुद्ध बाजूला दोन्ही होस्टेलस नंतर बॉटनी-जिओलोजी विभाग, त्यांच्या क्लास रूमस प्रयोग शाळा होत्या. त्याच्या अन ईस्ट होस्टेल च्या बाजूला कॉलेज ची हॉकी, फूटबॉल, व क्रिकेटची मैदानं होती. ह्याशिवाय मोठा बोटोंनिकल गार्डन, मुख्य इमारती समोरचा गार्डन, प्राचार्य, उप-प्राचार्य, प्राध्यापकांचे बंगले असं प्रचंड मोठं ते महा विद्यालय होतं. 1922 ला किंग एडवर्ड मेमोरिअल कॉलेज (के.ई.एम.) म्हणून ह्याची स्थापना झाली होती.

वेस्ट होस्टेल मधल्या रूम नंबर 5 मध्ये मला प्रवेश मिळाला. बुलडण्याचा माझाच वर्ग मित्र अरुण सावजी हा माझा एक रूम पार्टनर होता. दूसरा चिखलीचा सोहन चोपडे. तो चोपडे असं आडनाव लिहत असला तरी तो पंजाबी होता. अन् रूम मधला चौथा अगदीच अपरिचित आखरे म्हणून होता. चार नंबर रूम मध्ये असलेला बुलडण्याचा, आमच्याच हायस्कूल मध्ये आम्हाला एक वर्ष पुढे असलेला रघु भालेराव राहायचा. हा रघु पुढे माझा चांगला मित्र झाला. त्याचं सर्व काम फार शिस्तबद्ध असायचं. सकाळी पाच-साडे-पाचलाच उठायचा. मग समोरच्या ग्राऊंडवर रनिंग, नंतर काही आसनं, डबल बार, सिंगल बार वगैरे करायचा. जसजशी आमची मैत्री वाढत गेली तसतसा तो मलाही सकाळी उठवून त्याच्या बरोबर हे सर्व करायला

लावायचा. पुढे मला ह्याचा फार फायदा झाला. रघुची तेव्हापासूनच आध्यात्मिक बैठक होती. पुढे तर रघु झुऑलजी मध्ये एम.एससी., पीएच.डी. होऊन , हुशंगाबाद , कोल्हापूर, निपाणी येथे प्राध्यापक होता. पण हे सर्व करतांना त्यानं आपलं सर्व आयुष्य रामकृष्ण मिशन ला वाहिलं. ते अजूनही चालूच आहे. अनेक ठिकाणी अजून त्याची व्याख्यानं होतात. तो आजन्म ब्रम्हचारी आहे. अजूनही आमची मैत्री कायम आहे. आम्ही सतत संपर्कात असतो.

वेस्ट होस्टेल मध्ये आमचा एक आठ-दहा मित्रांचा जवळचा ग्रुप तयार झाला. आम्ही नेहमी कॉलेज मध्ये, मेस मध्ये, खेळायला, संध्याकाळी फिरायला बरोबरच असायचो. त्या पैकी काही जण रूम नंबर 12 मधले, काही 16 मधले, काही 4 तर काही 9 मधले होते. काही बुलदाणा-चिखली च्या आसपासचे, एक वणीचा तर एक उमरखेडचा, एक मलकापुर जवळचा. त्यामुळे आमच्या मराठी बोलण्यातले शब्द, उच्चार, हेल, वेगवेगळे होते. आमचा उमररखेडचा मित्र कस्तुरे , नेहमी, तुम्ही असं कामून करायले, वाचायले, जायायले असं बोलायचा. त्याचा एक शब्द फार पेट होता. तो म्हणजे ‘ढ्या’. ’चला, ढ्या के साथ जेऊत, चला ढ्या के साथ खेळूत, ढ्या के साथ पोहूत. असं त्याचं प्रत्येक काम ‘ढ्या’ के साथ असायचं. मग आम्ही सगळे त्याला ‘ढ्या’ च म्हणायला लागलो. एक दुधे होता त्याला थोडं कमी ऐकायला यायचं. आम्ही सर्व त्याला ‘बहिरं’ असंच म्हणायचो. आमच्या मधला दामू अम्भोरे चांगला धडधाकट व अगदी बिनधास्त होता. त्याला

सर्वजण ‘ठोळया’ असं म्हणायचे. मी, प्रमोद मार्कंडे, कुटे, दुसाद, आमची, टोपण नावं नव्हती. आम्ही ग्रुप मधले सर्व जण महिन्यातून एकदा अमरावती शहरात सिनेमा पाहायला जायचो. त्याही वेळी आताच्या चित्रा, प्रभात, श्याम, गोपाल ह्या टॉकीज होत्या. आमच्या होस्टेल पासून, ही सिनेमागृह चार-पाच किलोमीटर अंतरावर होती. त्या वेळी सिटि बस किंवा रिक्शा अशी काहीच साधनं नव्हती व्हिएमव्ही च्या जवळपास . आम्हाला गावात पायीच जावं-यावं लागायचं. म्हणून आम्ही साधारणतः: दुपारच्या तीनच्या किंवा संध्याकाळच्या सहाच्या शो ला च जायचो. आमचा सर्व ग्रुप अभ्यासू अन् जागरूक होता. आपल्याला चांगलं मराठी, हिन्दी , इंग्लिश बोलता आलं पाहिजे असं सर्वांना वाटायचं. आम्ही तसा प्रयत्न नेहमी करायचो. मला आठवतं, आम्ही सिनेमाला गावात जातांना, सर्वांनी असं ठरविलं होतं की हॉस्टेल वरुन टॉकीज पर्यंत जाताना, सर्वांनी इंग्लिश मध्येच बोलायचं. चुकलं तरी चालेल. इतरांनी चुकीचं बोलणाराला हसायचं नाही. कोणी कोणी तोंडच उघडायचं नाही. ठोळया, ढ्या, कुटे, दुसाद ही मंडळी बोलायचीच नाही. मग असं न बोलणाराला सर्वांना चहा पाजावा लागायचा. ह्याचा आम्हाला पुढे खूप फायदा झाला. मग येतांना त्या सिनेमाच्या गोष्टी, ॲक्टिंग, गाणी ह्यावर बोलत बोलत आम्ही येत असू. दुधे खूप चांगलं गायचा. गाणी, माझ्या खूप लवकर लक्षात राहायची. मग मी गाता गाता दुधे ला प्रोम्पटिंग करायचो. ह्या सिनेमा वरुन आठवण आली . माझा रूम पार्टनर चोपडे ह्याला सिनेमाचं फार वेड होतं. तो आमच्या ग्रुप मध्ये होता. पण तो एकटा दर रविवारी सिनेमाला

जायचा॰ एकदा श्याम टॉकीज मध्ये ‘जंगली’ सिनेमा लागला. तो सायराबानोचा पहिलाच सिनेमा असल्यानं अन शंकर-जयकिशन च्या संगीतामुळे अन् आधीच गाजलेल्या गाण्यांमुळे सर्वांचं आकर्षण ठरला. आमच्या चोपडेनं तो सलग सहा आठवडे पाहिला (दर रविवारी) अन सातव्यांदा गेला तेव्हा तीन ते सहा व सहा ते नऊ असे दोन्हीही शो पाहून आला. अशी ही वल्ली होती. दर वेळा तो जंगली पाहून आला की रूम मध्ये अर्धा तास ‘याहूssssssssचा’ धिंगाणा सुरू असायचा. आमचे पलंग तोडतोय की काय अशी भीती वाटायची.

होस्टेल मध्ये प्रत्येक विंग ला रूम झाडण्यासाठी व आमची चहा पाण्याची भांडी धुऊन आणण्यासाठी एक गडी/चपराशी असायचा. प्रल्हाद, दत्ता, युसुफ अशी त्यांची नावं मला अजूनही आठवतात. ही मंडळी आम्हाला ‘जाजू बाबू, चोपडे बाबू असं संबोधायची. आमच्या मेस मध्ये चहा वगैरे काही मिळायचं नाही. आम्ही आपापला चहा किंवा दूध स्वत: स्टोव वर करायचो. त्या वेळी चार आण्याला ( 25 नवे पैसे ) एक पाव दूध मिळायचं. दुधवाला हॉस्टेल ला यायचा. तसंच सकाळी एक टोस्ट- ब्रेड वालाही यायचा. एक दिवस मी टोस्ट विकत घेतले. दोन तुकडे. त्या आधी मी कधी टोस्ट खाल्ला नव्हता. चोपडे म्हणाला “ अबे उसमे अंडा रहता है. और तू तो अंडा खाता नही.” सावजी म्हणाला “अरे काही नाही जाजू. तो तुला चिडवतो आहे. “ मग मी तो चहा बरोबर खाल्ला. पण चोपडेनं म्हटलेलं ते माझ्या डोक्या बाहेर गेलं

नाही म्हणून की काय थोड्या वेळात मला उलटी झाली. त्याच्या पुढच्या वर्षी तर मी चक्क अंडी खायला लागलो. पण तो पहिला प्रसंग अजून आठवतो.

प्री यूनिव्हर्सिटीला सकाळी सातलाच कॉलेज असायचं. दोन पिरीयड झाले की साडेआठ वाजता 15 मिनिटांचा नाश्त्यासाठी ब्रेक असायचा. मग सर्व जण मेसकडे धावायचे। पोहे किंवा भजी, असा काही तरी नाश्ता तयारच असायचा. तो भरभर खाऊन परत पुढच्या पिरीयड साठी कॉलेज ला पळावं लागायचं। ह्या पळापळीत एखाद्या वेळी नाश्ता चुकायचा किंवा पुढच्या पिरीयडला उशीर तरी व्हायचा. एकदा तर एका मजेदार कारणामुळे मला माझा नाश्ता सोडूनच पुढच्या तासाला जावं लागलं. सकाळी दूसरा पिरीयड फिजिक्स चा होता. तो सुटल्या बरोबर आम्ही हॉस्टेल कडे नाश्त्यासाठी धावलो. त्या डिपार्टमेंट च्या बाहेरच एक मोठा टॉयलेट ब्लॉक होता. मी तिथे टॉयलेटला जाऊन बाहेर पडत होतो तेव्हा आमच्या वर्गातला एक कोठारी म्हणून मुलगा आत टॉयलेट मध्ये शिरत होता. तो ईस्ट होस्टेल मध्ये राहायचा। मी, नाश्त्याला उशीर होऊ नये म्हणून धावत आमच्या होस्टेलकडे गेलो. होस्टेल च्या पायऱ्या चढतच होतो तर मला समीरहून कोठारी पायऱ्या उतरताना दिसला. माझा माझ्या डोळ्यावर विश्वासच बसेना. कारण मी कोठारीला फिजिक्स डिपार्टमेंट च्या टॉयलेट मध्ये घुसतांना पाहीलं होतं. तो माझ्या आधी आमच्या होस्टेल मध्ये पोहचून परतणं शक्यच नव्हतं. मग मी परत त्या टॉयलेटकडे धावत गेलो. आत जायला लागलो तर कोठारी बाहेर पडत होता. मी गोंधळूनच गेलो. हा काय भानामतीचा प्रकार आहे मला

कळेना. मग मी त्याला म्हटलं ‘अरे यार तुम अभी तो हमारे हॉस्टेल के पास थे॰ और अभी टॉयलेट से निकल रहे हो.’ तो म्हणाला ‘मै तुमहारे होस्टेल काय को जाऊंगा ?’ मी बुचकळत म्हणालो ‘अरे मै ने अपनी आखोसे देखा है भाई .’ मग तो जोरजोरनं हसत म्हणाला. ‘तुमने बराबर देखा है. लेकीन वो मै नही था. मेरा जुडवा भाई था. उसने बॉटोनी-झूलॉजी लिया है. वह दुसरे क्लास मे है.’ मग त्यानं सांगितलं की ते दोघं अगदी सारखे दिसणारे जुळे भाऊ आहेत. अन् ते मुद्दाम सारखेच कपडे घालतात. त्यांची हेअर स्टाइल ही सारखीच आहे. त्यामुळे अनेक जण फसतात॰ मी तर त्या दिवशी गोंधळूनच गेलो होतो. त्या गडबडीत मी परत नाश्त्याला न जाता पुढच्या तासाला गेलो. कॉलेज एकदम दीड वाजताच सुटायचं. मग जेवण. आमच्या मेसच्या जेवणापायी आमचे एक दोन वर्ग मित्र कॉलेज सोडून गेल्याच मला अजून आठवतं. आमच्या मेस मध्ये ठाकूर म्हणून मुख्य स्वयंपाकी होता. तो रोज आमटी खूप छान बनवायचा. भाज्या यथातथाच असायच्या. आमच्या ताटाच्या साइजच्या तो पोळया बनवायचा. त्याही जाड. म्हणजे, ग्रामीण बोलीत म्हणतात तसं ‘एकच खा अन तिकडं जा’. दुसऱ्या वर्षी जी मेस मिळाली तिचा स्वयंपाकी बरा होता. त्याला आम्ही दादू म्हणायचो. तो दर मंगळवारी रात्री चविष्ट फोडणीची खिचडी व लसणाच्या फोडणीची कढी बनवायचा. ती इतकी चवदार असायची की आम्ही पाच पाच-सहा सहा प्लेट कढीच खायचो. मंगळवार ची आम्ही वाटच पाहत असू. दर रविवारी दुपारी फिस्ट असायची. त्यात कधी लिमिटेड तर कधी अनलिमिटेड श्रीखंड, गुलाब

जाम, फ्रूट सॅलड असं मिळायचं. एकदा रवीवरच्या फिस्टला गुलाबजाम अनलिमिटेड होते. मग आम्ही अम्भोरे, ठोळयाशी पैज लावली .त्यानं पन्नास गुलाब जाम खायचे म्हणून. त्यानं चक्क 52 गुलाबजाम खाल्ले व आम्ही पैज हरलो.

मेस क्लब सिस्टीमनं चालायची. दर तीन महिन्यानं मेस सेक्रेटरी व त्याचे तीन सहकारी निवडले जायचे. प्रत्येक मेसची टीम वेगळी असायची ह्या सगळ्यांवर होस्टेल प्रीफेक्टचं नियंत्रण असायचं. शिवाय एक प्राध्यापक हॉस्टलचे वार्डन असायचे. त्यांचं क्वार्टर हॉस्टेल ला लागूनच असायचं. त्यांचेही नियमित राऊंड व्हायचे. आमच्या वेळी हॉस्टेल मध्ये रॅगिंग हा प्रकार नव्हता. निदान आमच्या व्ही.एम.व्ही. च्या हॉस्टेल मध्ये तर मुळीच नव्हता. सीनियरस उलट आम्हा नवीन आलेल्यांना मार्गदर्शन करायचे. संध्याकाळी, समोरच्या मैदानावर आम्ही त्यांच्या बरोबर व्हालीबॉल किंवा कब्बडी खेळायचो. आमचा ग्रुप संध्याकाळी बाहेरच्या वलगाव रस्त्यानं फिरायला जायचा. त्या वेळी समोर काहीच वस्ती नव्हती रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतंच शेतं होती. त्यात काही शेतांमध्ये मुग तर काही मध्ये भुईमूग पेरलेला असायचा. शेंगा आल्या की , आणि शेतात कोणी नसलं की आम्ही मुगाच्या शेंगा तोडून खायचो. भुईमूग उपटून आणायचो. मग हॉस्टेल च्या हौदावर धुवून सामूहिक शेंगा खायचा कार्यक्रम व्हायचा. एक दिवस आम्ही फिरायला गेलो तेव्हा दुधे बरोबर नव्हता. तो कधीही बाहेरचा चहा चिवडा घ्यायचा नाही. फार जपून खर्च करायचा. सर्व जण त्याला कंजूष म्हणायचे. त्या दिवशी तो फिरायला

बरोबर नव्हता. मग ठोळया म्हणाला ‘ आज जरा बहिऱ्याची मजा करू. आपण रूमवर परत जातांना एका पिशवीत काहीतरी भरून नेऊ . आमच्या रूम मध्ये गेल्यावर तो पिशवी बघून विचारेलच की काय आणलं. मी म्हणेन की आम्ही आज भुईमूगच्या शेंगा आणल्या आहेत. तू आता अर्धा किलो गुळ आण बाजूच्या कर्मचारी वसाहतीच्या किराणा दुकाना वरून. तो पर्यंत आम्ही मेस मधून शेंगा भाजून आणतो. फिर देखो मजा.’ मग आम्ही तसंच केलं. त्यांच्या रूम मध्ये गेल्या बरोबर अभ्यास करता करता दुधेनं पिशवी पाहिली अन् ओरडलाच “अबे ओ, फल्ल्या लाये क्या ? वा वा “। मग ठरल्याप्रमाणे अम्भोरेनं त्याला आधी गुळ आण म्हणून सांगीतलं. तो ताबडतोब उठून गुळ आणायला गेला. आणि पंधरा मिनिटात घेऊन आला. अम्भोरेनं तो घेतला अन् त्याच्या समोर पिशवी उलटी केली अन् टाळया वाजवत सर्वांना गुळ वाटला. तो खूप चिडला. आम्ही सर्व हसत होतो अन् तो आम्हाला शिव्या देत होता. मग कस्तुरे म्हणाला ‘ अरे अशा शिव्या काहून द्यायायला ? मी उद्या ढ्या के साथ किलो भर शेंगा विकत आणतो. मग आपण भाजूत अन् खाऊत.’

माझा भाऊ एम.एससी. पार्ट-1 ला होता. त्याला ईस्ट हॉस्टेल चा प्रिफेक्ट म्हणून निवडलं. त्याला तिथेच वेगळी रूम मिळाली. त्याचेच दोन मित्र आमचे प्रिफेक्ट होते. ते नेहमी माझी विचारपूस करायचे. मधून मधून मी ही भाऊ कडे जायचो. आमच्या वर्गातली काही मुलं ईस्ट हॉस्टेल मध्ये होती. त्यांच्याकडे ही जायचो. ती मुलं ही कधी कधी आमच्या कडे यायची. ईस्ट हॉस्टेल मध्ये आमचा एक वर्ग मित्र होता. सुदेश दासगुप्ता. तो नेहमी शुद्ध हिंदीत , पल्लेदार

वाक्ये बोलायचा. मग तो गेला कि आम्ही त्याची नक्कल करीत असू. मी एस.एस.सी. मध्ये मेरीट मध्ये होतो अन् आताही चांगला अभ्यास करायचो. दासगुता कधी माझ्या रूम वर आला अन मी त्याला विचारलं की ‘कैसे आये हो दासगुप्ताजी ?’ तर त्याचं पल्लेदार उत्तर असायचं— “ अरे चल पडते है कभी कभी, आप जैसे ऋषीमुनियोकी चरण धूली मस्तक लगाने. “ मग माझा पार्टनर चोपडे डोक्यावर हात मारून म्हणायचा ‘ यार मेरा सच्चीही मस्तक उठ गया. अबे दासगुप्ता, तू कभी ठिकसे समझे ऐसा बोल नही सकता क्या ? ‘ आमच्या बाजूच्या रूम मध्ये एक ज्ञानेश्वर मरगडे म्हणून परतवाड्याचा विद्यार्थी होता, तो महाराष्ट्रीय होता, पण त्याला मराठी धड बोलता येत नसे. कारण तो दहावी पर्यंत बैतुलला एम.पी. मध्ये त्याच्या मामाकडे शिकलेला होता. त्याचं मराठी ऐकून आम्हाला खूप हसायला यायचं. उदाहरणार्थ—‘ तू जेवण खाल्ली का ? किंवा ‘ मी सायकलीच्या च्याकात वारा भरून आणतो.’ किंवा ‘तू माझी किताब देऊन च्युक. मी तुला तुझी देऊन च्युकलो.’ मग आम्ही हसायचो.

महिन्याचा एक सिनेमा पाहायला सोडून आम्ही कधी गावात जायचोच नाही. नाही म्हणायला देवीच्या नवरात्रेतील यात्रेला अन देवी दर्शनाला नऊ दिवसातून एक दिवस जाऊन यायचो. ते ही टोळीनं. तसंच गणेश उत्सवाच्या दहा दिवसात एखाद दिवशी नाच-गाण्याचा कार्यक्रम वगैरे पाहायला जात असू. अर्थात ते ही थेट गावात नाही. जवळच्या गाडगेनगर मध्ये थोडी वस्ती होती . तिथे गणपती चे काही कार्यक्रम असायचे. ते पाहायला जायचो. खरं

म्हणजे तेव्हा शिवाजी कॉलेज ते व्ही.एम.व्ही. ह्याच्या मध्ये जवळ जवळ वस्तीच नव्हती. रात्रीचं तर सोडाच,पण संध्याकाळी सुधा एकटं-दुकटं जायची भीती वाटायची. मला आठवतं, आम्ही दोघं भाऊ नेहमी दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुटीत बरोबरच आमच्या गावी जायचो अन यायचो. एकदा डिसेंबर महिन्या माझ्या वडलांचे मोठे भाऊ वारले, तेव्हा मी एकटाच गावी गेलो. चार-पाच दिवस राहून परतलो. माझं खेडं चिखली देऊळगावराजा च्या मध्ये होतं. अमरावतीला येतांना आम्ही आमच्या खेड्यावरुन, आधी देऊळगावराजाहून शेगावला जाणारी नवजीवन म्हणून एक प्रायवेट मोटार होती तीनं शेगावला यायचो. चक्क आडीच वाजेपासून साडेसात असा 5 तासाचा प्रवास करावा लागायचा. (आता बस ने जास्तीत जास्त दोन तास लागतात ) मग शेगाव वरून रात्री नऊ ची पॅसेंजर रेल्वे पकडायचो. ती बडनेऱ्याला रात्री एक-दीड ला पोहचायची. तिथून बडनेरा- अमरावती पॅसेंजर ने अमरावतीला यायचो. असं करत अमरावती येईपर्यंत रात्रीचे दोन-अडीच वाजायचे. मी त्या डिसेंबर मध्ये असाच रात्री अडीच ला अमरावती स्टेशन ला पोहचलो. एकटा. त्या वेळी फक्त सायकल रिक्शा हेच एक साधन होतं. रात्री-अपरात्री रिक्शा वाले अडवून भाडं मागायचे. पण दूसरा इलाजच नसायचा. मी अडीच वाजता असाच रिक्शा केला. त्यानं शिवाजी कॉलेज कडून रिक्शा घेतला. त्या कॉलेज पर्यंत ठीक होतं. पुढे अगदी निर्मनुष्य. मला खूप भीती वाटायला लागली. जीव मुठीत धरून बसलो. पुढे , आताचा जो राठी नगर नंतर चा शेगाव नका आहे, तिथे एक दोन मजली बंगला होता. तो नेहमी

निर्मनुष्य असायचा. त्याला भूत बंगला म्हणायचे. जस जसा तो जवळ आला माझी गाळणचं उडाली. (अजूनही आठवण आली की अंगावर काटा येतो.) कसा बसा तो पार करून रात्री तीन ला हॉस्टेल ला पोहचलो.

अगदी पहिल्या वेळी जेव्हा आम्ही अमरावतीला गेलो तेव्हा तर मजाच झाली. त्या वेळी अर्थात भाऊ बरोबर होता. पहिल्या वेळी सामानही थोडं जास्त होतं. भाऊ ची पेटी (त्या वेळी आमच्या कडे सूटकेसेस नव्हत्या.) माझी पेटी. शिवाय दोघांच्या दोन पिशव्या. माझी गादी , रजई, दोन-तीन चादरी हयांची मोठी वळकटी. तेव्हाही आम्ही नवजीवन मोटर नं शेगावला बरोबर पोहचलो. पण आमची भुसावळ-नागपूर पॅसेंजर त्या दिवशी लेट झाली होती. ती आल्या नंतर सर्व सामानासह आम्ही कसे बसे ट्रेन मध्ये बसलो. माझ्या आयुष्यातली ट्रेन मध्ये बसायची ती पहिलीच वेळ होती. त्यामुळे भाऊ मला, ट्रेनचं तिकीट काढण्यापासून, प्लॅटफॉर्म, ओव्हरब्रिज, वगैरे बद्दल सांगत होता. भाऊनं मला सांगीतलं की अमरावती मेन लाइन वर नाही. अमरावतीला जायला बडनेऱ्यावर नेहमी उतरून बडनेर-अमरावती अशी एक छोटी ट्रेन पकडावी लागते. परत येतांनाही बडनेऱ्याला येऊन आपली गाडी पकडावी लागते. भाऊ म्हणाला “ बडनेऱ्याहून अमरावतीला गाडी ही ठराविक वेळेलाच जाते. आज बहुदा आपण बडनेऱ्याला उशिरा पोहचू, तो पर्यंत अमरावतीची गाडी निघून जाईल. किंवा अगदी जायला तय्यार असेल。 आपल्याला सर्व सामान घेऊन अमरावती गाडीच्या प्लॅटफॉर्म वर जावं लागतं. बघू पोहचल्यावर काय होतं ते. “सुदैवानं आम्ही पोहचलो तेव्हा अमरावती

a

गाडी उभीच होती. आम्ही घाई-घाईनं सामान एक दोन चकरा करून त्या प्लॅटफॉर्म वर गेलो. भाऊ म्हणाला. ‘ गाडी अगदी निघण्याच्या बेतात आहे. मी आधी सर्व सामान गाडीत चढवतो. तू सामानाजवळ खालीच रहा. यदा कदाचित मी आत असताना गाडी निघाली तर तू आहे तिथचं प्लॅटफॉर्म वर उभा रहा. घाबरू नको. ही गाडी थोड्यावेळात परत वडनेऱ्याला येते. मी सामानासह अमरावतीला न उतरता ह्याच गाडीनं परत बडनेऱ्याला तुला घ्यायला येईन. थोडा वेळ लागला तरी तू तिथंच बसून रहा.’ दुर्दैवानं झालं तसंच. दोन पिशव्या अन मी खालीच राहिलो अन गाडी सुरू झाली. मग तासाभरानं ती गाडी परत बडनेऱ्याला आली. भाऊनं उतरून मला आत घेतलं. परत अर्धा तास बडनेऱ्याला थांबावं लागलं, कारण मेन लाइनची आणखी कोणती तरी गाडी येणार होती. तिचेही प्रवासी घ्यायचे होते. रात्री तीनला अमरावतीला पोहचणारे आम्ही, सकाळी पाच वाजता अमरावतीला पोहचलो. तेही बरंच झालं म्हणा. नाही तर परत तिन वाजता त्या निर्मनुष्य रस्त्यानं होस्टेलला जावं लागलं असतं. अर्थात भाऊ बरोबर असल्यानं भीती वाटली नसती म्हणा. असा झाला माझा पहिला ट्रेनचा प्रवास.

प्रि यूनिव्हर्सिटी च्या परीक्षेत आमच्या रूम मधून मी अन सावजी पास झालो. आमच्या ग्रुप मधले, दुसाद, कुटे, भारंबे हे नापास झाले. बाकी आम्ही सर्व जण पास झालो. हे वर्ष आमचं बी.एससी. पार्ट-1 चं वर्ष होतं. ह्यात चांगला परफॉर्मेंस आला तरच पुढे इंजीनियरिंग किंवा मेडिकल ला जाता येणार होतं. त्यामुळे अभ्यासू मित्रच रूम पार्टनर म्हणून निवडायचे होते. आता

a

वरच्या मजल्यावर खोली मिळणार होती. आम्ही म्हणजे मी, मार्कंडे, दुधे अन अम्भोरे चौघांनी मिळून एक खोली घेतली० ग्रुप मध्ये दंदाले, उमाळे. हरणखेडकर असे आणखी नविन मित्र आले. दंदाले आमच्या गावाकडचा होता. तो पहिल्या वर्षी हॉस्टेल मध्ये नव्हता. तो अभ्यासू होता, तसाच बिनधास्त ही होता. नेहमी आमच्या गावाकडचे शब्द त्याच्या बोलण्यात यायचे. त्याच्या बोलण्यात 'खटका' हा शब्द नेहमी यायचा. 'ह्याचा खटकाच बसून टाकतो' म्हणजे एकदाचा बंदोबस्त करून टाकतो. असं तो नेहमी म्हणायचा. आम्ही त्याचं नाव 'खटका'चं पाडलं. आता आमची मेस ही बदलली होती व बरी होती. सर्वात चांगली मेस सीनियरस ची होती. तिथे सदाशिव म्हणून एक स्वयंपाकी होता. तो खूप छान भाज्या करायचा. अन पोळयाही. मी भाऊ च्या मित्रांबरोबर दोन-तिन वेळा त्या मेस मध्ये जेवलो होतो. बाकी आमच्या मेसची दादूची , मंगळवारची खिचडी-कढी मी अनेक वर्ष विसरलो नाही. माझं लग्न झाल्यानंतर मी बरेच वेळा माझ्या बायकोला तशी कढी करायला सांगायचो.

हॉस्टेल मध्ये गणपती च्या वेळी अन् वार्षिक स्नेहसंम्मेलना च्या वेळी बरीच चहल-पहल असायची. काही सांस्कृतिक कार्यक्रम, जसे वादविवाद स्पर्धा, गायनाच्या स्पर्धा (भावगीत अन् सीने संगीत), मिमिक्री, नाट्यछटा ई. ईस्ट, वेस्ट, अन् गर्लस होस्टेलचे मिळून कॉमन व्हायचे. हे कार्यक्रम मग कॉलेज च्या सेंट्रल हॉल मध्ये होतं. आमच्या वर्गातला सुदेश दासगुप्ता मुकेशची गाणी अगदी मुकेश सारखी गायचा. त्याचं ते 'नजराना' पिक्चर

a

मधलं ‘ एक ओ भी दीवालीथी, एक ये भी दीवाली है. उजडा हुआ गुलशन है, रोता हुआ माली है. ‘ हे गाणं मला अजूनही आठवतं. त्याची मोठी बहीण सुलेखा दासगुप्ता एम.ए. ला होती. ती गर्ल्स होस्टेल मध्ये राहायची. ती लता मंगेशकरच गाणी इतकी सुरेख गायची की कॉलेज मध्ये तिला प्रति लता मंगेशकर च म्हणत. ‘अनपढ’ चित्रपटातलं ‘ आपकी नजरोने समझा, प्यार के काबिल मुझे ’ हे गाणं आजही ऐकलं की तिची आठवण होते. खास करून ‘जी, हमे मंजूर है, आपका ये फैसला’ ही ओळ म्हणताना ‘जी’ नंतर ती जो छोटा pause घ्यायची तो अजूनही कानात घुमतो. अर्थातच, हे भाऊ-बहीण स्पर्धेत नेहमी पहिलेच असायचे. तसेच ईस्ट होस्टेल मध्ये राहणारा भुतडा म्हणून एक मुलगा होता. तो ही एका गाण्या साठी मला अजून आठवतो. देवानंदचा जुना चित्रपट ‘मंजील ‘त्याच्या गाण्यासाठी अन् एस.डी. बर्मनच्या म्यूझीक साठी खूप गाजला होता. त्यात मन्ना डे नं गायलेलं ‘ हटो काहेको झुटी, बनाओ बतीयां. हटो--------,’ हे गाणं खूप छान होतं। हे पूर्ण गाणं भुतडा हुबेहूब मन्ना डे सारखं गायचा. खूप मजा यायची ऐकताना. स्नेहसंम्मेलनात अन् इतर वेळी झालेल्या वादविवाद स्पर्धेत आम्हाला सीनियर असलेले विद्यार्थी वक्ते म्हणजे बी.टी.देशमुख, ( पुढे, जे सलग पाचदा आमदार म्हणून निवडून आले ) उषा ठाकूर, राजेश्वरी सिन्हा, बबन मेटकर, बबन तोटे ह्या मंडळीचं भारावून टाकणारं, फर्ड वक्तृत्व ऐकणं म्हणजे परवणी असायची. ह्यांचे परीक्षक , आमचे प्राध्यापक, प्रसिद्ध साहित्यिक के.ज.पुरोहित (शांताराम), कवी शंकर वैद्य, नातूबाई ,विजया जोशी(डबीर) ही मंडळी

असायची. त्यांची ही भाषण ऐकण्याची मजा असायची. हॉस्टेल मध्येच राहत असल्यामुळे, सेंट्रल हॉल मध्ये रात्र-रात्र होणारी हिन्दी कवी, मराठी कवी, संमेलनं ही आम्ही बऱ्याच वेळा ऐकायला जायचो. एकूणच व्ही.एम.व्ही. मधलं दोन वर्षाचं होस्टेल लाइफ खूप छान गेलं.

बी,एससी.पार्ट-1 झाल्यानंतर, आम्हा सर्वांची फाटफुट झाली. पुढे आयुष्यात फक्त एकदा, मी औरंगाबाद इंजीनियरिंग कॉलेज मध्ये प्राध्यापक असताना कस्तुरे भेटला. तो नांदेडच्या यशवंत महा विद्यालयात बॉटनी चा प्राध्यापक होता. दोनदा मार्कंडे भेटला. तो महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट मध्ये मेकॅनिकल इंजीनियर म्हणून काम करत होता. त्याच्या कडून कळलं की दुधेनं बी.एससी. व पुढे कुठला तरी कोर्स करून बीएसएनएल मध्ये सर्विस धरली. अम्भोरे पुढे डिप्लोमा कररून पीडब्ल्यूडी मध्ये काम करत असल्याच कळलं. दंदाले व अरुण सावजी डॉक्टर झाले. बी.एससी.पार्ट-1 नंतर मला गवर्नमेंट कॉलेज ऑफ इंजीनीअरिंग औरंगाबाद येथे प्रवेश मिळाला. त्या वेळी अमरावतीचं इंजीनियरिंग कॉलेज सुरू झालं नव्हतं. तेव्हा विदर्भात राज्य सरकारचं इंजीनियरिंग कॉलेजच नव्हतं. फक्त नागपूरला रीजनल इंजीनियरिंग कॉलेज होतं. त्यातल्या फक्त निम्या जागाच विदर्भाच्या विद्यार्थ्यांसाठी असायच्या. बाकी राष्ट्रीय पातळीवर भरल्या जायच्या. त्यामुळे विदर्भाच्या 40-50 विद्यार्थ्यांना आलटून-पालटून ,एक वर्ष औरंगाबाद तर एक वर्ष कराड-सांगली ल प्रवेश द्यायचे. आमच्या वेळी विदर्भाच्या 40-45 विद्यार्थांना औरंगाबादला प्रवेश मिळाला. औरंगाबादला माझी राहण्याची काहीच सोय

a

नव्हती. त्यामुळे इंजिनियरिंग कॉलेज च्या होस्टेल मध्ये प्रवेश मिळण अत्यंत आवश्यक होतं. गावात बाहेर खोली घेऊन राहणं परवडण्या सारखं नव्हतं. मी सारखी देवाची प्रार्थना करत होतो की देवा मला होस्टेल मध्ये जागा मिळू दे. अन् परमेश्वराने कृपा केली अन् मला औरंगाबादच्या इंजिनियरिंग कॉलेज च्या होस्टेल मध्ये प्रवेश मिळाला.

a



**औरंगाबाद इंजिनियरिंग कॉलेज होस्टेल**



a






**Group of Hostel friends at G.C.O.E, Aurangabad**

**Standing: (Left to Right):** Arun Gorde, Gajanan Deshpande, Madhukar Hiwase, Manik Wasatkar

**Sitting: (Left to Right):** Lalit Mayani, Narayan Vyas, Manohar Shende, Bankat Jajoo, Kanchan Mahashur, Gulab Shah

a

# इंजीनियरिंग कॉलेज होस्टेल

विदर्भातून आलेल्या आम्हा सर्वांनाच होस्टेल मध्ये प्रवेश मिळाला. आम्हा 40-45 जणांपैकी नागपूर, चंद्रपुर, वर्धा, अमरावती, यवतमाळ. खामगाव, मल्कापुर अशा सर्व ठिकाणचे लोक होते. सर्वात मोठा ग्रुप अर्थात नागपूरचाच होता. होस्टेल मध्ये 93 खोल्या होत्या॰ त्यापैकी दोन खोल्यांची एक कॉमन रूम व एका खोलीचं ऑफिस केलं होतं॰ तीन मजली होस्टेलच्या प्रत्येक मजल्यावर मुलांसाठी तिस-तिस खोल्या होत्या. सर्वात खालच्या मजल्यावर आम्ही सर्व प्रथम वर्षाचे विद्यार्थी राहायचो. प्रथम वर्षाला F.E., दुसऱ्या वर्षाला S.E. तर अंत्य वर्षाला B.E. म्हणत.(आमच्या वेळी इंजिनियरिंग चा कोर्स तीन वर्षाचाच होता.) S.E. चे विद्यार्थी मधल्या तर B.E चे तिसऱ्या मजल्यावर राहायचे. FE ला प्रत्येक खोलीत तीन जणांना राहावं लागायचं. साधारणतः: आप-आपल्या गावाची मुलं रूम पार्टनर असायची. माझ्या खोलीत अमरावतीचाच जी.एम.देशपांडे अन् अमरावतीला शिकलेला वरुडचा ए.के.गोरडे हे माझे पार्टनर होते. औरंगाबादला गेल्यावरच आमची ओळख झाली होती॰ बाजूच्या खोलीत खामगावचे तीन जण राहायचे. तर

समोर अमरावतीचे दोन व एक चंद्रपूरचा अन त्यांच्या बाजूच्या खोलीत मल्कापूर जवळचे तीन जण रहायचे. ह्या चार खोल्यांचा आमचा बारा जणांचा एक चांगला जवळचा ग्रुप झाला. तो पुढे तिन्ही वर्षे टिकून होता.

हॉस्टेल मध्ये, आमच्या बॅचचे आणि आधीचे असे, मुंबई चे ही बरेच विद्यार्थी होते. त्यात पारशी, गुजराती, सिंधी, पंजाबी असे बरेच होते. खऱ्या अर्थानं आमचं औरंगाबादचं होस्टेल कॉस्मोपोलिटन होतं. मराठवाड्याचे अन विदर्भातून आलेले बहुतेक विद्यार्थी मराठी भाषिकच होते. मुंबईहून आलेली ही मंडळी नेहमी इंग्रजीत बोलून आम्हा इतरांवर इम्प्रेशन मारायचा प्रयत्न करायची. ते स्वत:ला खूप स्मार्ट अन् आम्हाला गावंढळ समजायचे. ते खूप फर्ड इंग्रजी बोलायचा भास निर्माण करायचे. पण हळू हळू आमच्या लक्षात यायला लागलं की ते चुकीचं इंग्रजी बोलायचे. मग आम्हीही त्यांची टर उडवायचो. शिवाय आम्ही अभ्यासातही वरचढ असायचो त्यामुळे बऱ्याच वेळा असाइनमेंटस किंवा ड्रॉइंग, सबमिशन वर्क करतताना ते आम्हाला विचारायला यायचे. तेव्हा त्यांची नागी पडलेली असायची. पुढे SE, BE ला मिक्स ग्रुप होत. पण FE ला साधारणतः मुंबई-मुंबई , विदर्भ-विदर्भ, मराठवाडा-मराठवाडा असेच ग्रुप असायचे. अर्थात तसे एकाच वर्गातले असल्यानं होस्टेल मध्ये वातावरण खेळी मेळीचं असायचं. त्या वेळा आमच्या हॉस्टेल मध्ये रॅगिंग हा प्रकार अजिबात नव्हता. तो त्रास आम्हाला कधी झालाच नाही. पण इतक्या वेगवेगळया ठिकाणची मुलं असल्यानं, स्वभावाचे अन् सवयींचे अलग अलग नमुने पाहायला मिळायचे. खरं म्हणजे अशा

वेगवेगळ्या लोकांनी आपसात बरोबर राहणं हीच होस्टेल जीवनाची खरी शिकवण असते. हाच मोठा फायदा असतो. व्यक्तिमत्व घडवण्यात ह्या गोष्टीचा मोठा भाग असतो.

इथेही आमच्या दोन मेस होत्या. एक नोनव्हेज अन् एक व्हेज. ह्या मेसेस ही क्लब सिस्टम नी चालायच्या. मेस सेक्रेटरी, मेस कमिटी असायची。ती मंडळी किराणा, भाजीपाला, आणण्या पासून हिशोब ठेवण्यापर्यंत सर्व पहायची. मेस मधले स्वयंपाकी, इतर काम करणारे नोकर ह्यांचा पगार वगैरे तेच पहायचे. मेस मध्ये जेवण चांगलं असायचं. आठवड्यातून एक दिवस चेंज असायचा अन रविवारी दुपारी फिस्ट असायची. कधी लिमिटेड गोडधोड तर कधी अनलिमिटेड असायचं. फ्रूट-सॅलड वगैरे असलं की लिमिटेड तीन-चार वाट्या मिळायचं. पण आम्हा काही जणांना ते ही जास्त व्हायचं. कोणाला तीनचं वाट्या पुऱ्या व्हायच्या. आमच्या समोरच्या रूम मध्ये राहणारा आमचा एक मित्र, सबनीस जोरदार खवैया होता. आम्ही सर्व त्याला सबनीस पहिलवानच म्हणायचो. मग ज्याला ज्याला जास्तीची वाटी खायची नसेल तो ती घेऊन सबनीसला द्यायचा. अशा तेरा-चौदा वाट्या सबनीस खायचा. आम्ही त्याला नेहमी चिडवायचो की तू इतकं कसं खातोस अन पचवतोस. त्याचं नेहमी हसत हसत एकच उत्तर असायचं. “ हमारे चाचाने कहा है ,बेटा खाते-खाते मरो. “ आम्ही प्रथम वर्षाला होतो तेव्हाची गोष्ट. मला वाटतं आम्ही जॉइन झाल्यावर पाच-सहा महिन्यांनी देशभर शास्त्री सोमवार सुरू झाला. म्हणजे सोमवारी सर्वांनी फक्त एकच वेळ जेवायचं. आमच्या हॉस्टेल

a

मध्येही शास्त्री सोमवार सुरू झाला. फक्त दुपारी जेवण मिळायचं . रात्री मेस बंद असायची. मग आम्ही संध्याकाळी भूक लागलीच तर कधी केळी कधी बिस्किट वगैरे खायचो. एका सोमवारी संध्याकाळी आम्ही काहीच खाल्लं नाही. पण अभ्यास करता करता रात्री दहाच्या दरम्यान मला खूप भूक लागली. माझ्याजवळ खायला काहीही नव्हतं. एवढ्या रात्री होस्टेलच्या आजूबाजूची दुकानं ही बंद झाली होती. मी देशपांडेला म्हणालो ‘ यार खूप भूक लागली, तुझ्याकडे काही आहे का खायला ?’ तो म्हणाला ‘ अरे मलाही भूक लागली आहे पण माझ्या ही जवळ खायला काही नाही. आता कसं करायचं?’ आमचा तिसरा पार्टनर गोरडे होता. तो फार हिशोबी होता. अगदी जपून खर्च करायचा. तो म्हणाला “ मी परवा अर्धा किलो शेंगदाणे विकत आणले होते. माझ्या जवळ आहेत. मी फारच फार तर चार-एक आण्याचे खाल्ले असतील.” त्याला काय म्हणायचं होतं ते आमच्या लक्षात आलं. त्या वेळी एक रुपयाचे अर्धा किलो शेंगदाणे मिळायचे. आम्ही म्हटलं, ‘आम्ही देतो तुला बारा आणे. दे शेंगदाणे.’ मग आम्ही रात्री त्या वेळी ते शेंगदाणे खाल्ले. आमचा गोरडे म्हणजे एक वल्लीचं होता. सतत काही तरी विचारात असायचा. आम्ही तिघं मिळून चहासाठी अर्धा लीटर दूध घ्यायचो. ते सकाळ दुपारला आम्ही आमच्या वातीच्या स्टोव्ह वर गरम करायचो. बऱ्याच वेळा गोरडे स्टोव्ह च्या बाजूच्या खुर्चीवर बसलेला असायचा. एखादं वेळी दूध गरम होऊन उतू जायला लागलं, तर तो वाती कमी करण्या ऐवजी ओरडायचा “ अरे जाजू, अरे देशपांडे दूध उतू चाललं ‘ मग आम्ही म्हणायचो ओरडतो कशाला? स्टोव्ह

कमी कर. एकदा तर त्यानं मजाच केली. टेबलवर स्टोव्ह पेटवला. चहाच्या भांड्यात पाणी टाकून त्यात चहाची पत्ती साखर टाकली. हे करतलांना तो एका हातात पुस्तक घेऊन वाचत होता. नंतर थोड्या वेळानं दुधाचा कप हातात घेतला अन चहाच्या पाण्याला उकळी आली असं वाटून दुधाचा कप उलटा केला. सरळ दूध स्टोव्ह च्या जळत्या वातींवर पडलं अन् फस्स आवाज झाला. त्यानं चहाचं भांडं आधी स्टोव्ह वर ठेवलंच नव्हतं. मग आम्ही अन् तोही खूप हसायला लागलो. कधी कधी तो असा हरवून जायचा.

आमच्या आजूबाजूला एक एक नमुने होते. बाजूच्याच खोलीत खामगावचे तीनजण रहायचे. एक कंचन महाशूर. तो फार अभ्यासू होता. अगदी निरागस अन् साधा भोळा. आमच्यापेक्षा वयानं लहान. दूसरा खालसा म्हणून सरदारजी होता. तो खूप बोलका होता. विनोदी बोलायचा. तिसरा मदन चौधरी. हा अतिशय फटकळ अन मोठ्यानं बोलणारा. तिघंही थोड्याच दिवसात आमचे चांगले मित्र झाले. आम्ही नेहमी बरोबरच असायचो. हा मदन एकदा सर्वांसमोर म्हणाला, ‘ अरे यार जाजू तुम्हारा चेहरा एकदम मेरे नाना ( आईचे वडील ) जैसा है. मै आजसे तेरेको नाना कर के ही पुकारुंगा.’ थोड्याच दिवसात माझं ’नाना’ हे नावं इतकं पॉप्युलर झालं की आमचे सगळे मित्र, क्लासमेट्स मला नाना च म्हणायला लागले.(आम्ही बरेचजण ह्या उतार वयातही एकमेकांच्या संपर्कात आहोत. अन् अजूनही ते मला नानाच म्हणतात.( जवळ जवळ 58 वर्षांनंतरही ). ह्या मदनची आणखी एक सवय माझ्या अजून लक्षात आहे. आम्ही आठ-दहा जण जेव्हा ग्रुप मध्ये फिरायला,

सिनेमाला किंवा गावात जात असतांना, ( आम्ही नेहमी पायीच फिरायचो-जायचो )बोलत बोलत जायचो. कधी चर्चा , कधी वाद, चालू असायचे. ह्या मदनाचा मुद्दा कोणाला नाही पटला किंवा कोणी त्याच्याशी वाद घातला की, तो चालता चालता ‘ कया बात कर रहे हो यार? ‘ असं म्हणत कमरेवर हात देवून उभा राहायचा. म्हणजे बाकी सगळे दहा पावलं पुढे, अन हा मागेच उभा. मग तो आमच्यापर्यंत चालत येई पर्यन्त आम्ही थांबायचो॰ आमच्या रूम समोर राहणारा व्यास खूप सुंदर हिन्दी कविता लिहायचा. अगदी एखाद्या प्रथित यश हिन्दी कवी सारख्या. मला कवितेची मुळातच खूप आवड होती. मी ही मराठी कविता लिहायचो. त्याच्या त्या हिन्दी कविता ऐकून ऐकून मी ही मग हिन्दीतून कविता लिहायला लागलो. ( 2011 मध्ये माझा ‘ विद्रोह ‘ हा हिन्दी कविता संग्रह प्रकाशित झाला. मला वाटतं 2012-13 ला व्यासचा ही ‘मनके पांखी’ हा कविता संग्रह प्रकाशित झाला. खरं म्हणजे तो खूप अगोदरच प्रकाशित व्हायला हवा होता.) व्यास अन् मी अजूनही चांगले मित्र म्हणून संपर्कात आहोत. थोडं विषयांतर होईल, पण माझं लग्नही व्यासमुळे जुळलं. माझं सासर अमरावती जवळच्याच आर्वीचं. व्यास ही आर्वीचाच. व्यासचे वडील पंडित/पुजारी होते. ते सत्यनारायणाच्या कथा, भागवत कथा करायचे. लग्न ही लावायचे. आमच्या सासरच्या घरी त्यांचं नेहमी येणं जाण होतं. इतकंच नाही तर ह्या दोन्ही घरांचा खूप घरोबा होता. आम्ही बी.ई. पास झाल्यावर मी अमरावतीच्या शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयात तर व्यास पैठणला जायकवाडी प्रोजेक्ट वर सर्विसला लागलो. आम्ही नेहमी

a

एकमेकांना पत्र लिहायचो. एका पत्रात त्यानं मला माझ्यासाठी आर्वीचं स्थळ सुचवलं. “ मुलगी माझ्या बहिणीसारखी आहे. खूप चांगली अन सुस्वभावी आहे. घरचे लोकही खूप चांगले आहेत,” ई. त्यानं पत्रात लिहलं अन माझ्या बद्दलही आमच्या सासरच्यांना लिहलं. पुढे रीतसर मुलगा-मुलगी पाहण्याचे कार्यक्रम झाले अन आमचं लग्न ठरलं.

तर असा हा व्यास माझ्या समोरच्या रूम मध्ये राहायचा. नेहमी खूप विनोदी बोलायचा. आम्ही आमच्या रूम साठी एक पाण्याची सुरई खरेदी केली होती. रात्री पाणी प्यायला सारखं मेस मध्ये जावं लागू नये म्हणून आम्ही रात्री ती सुरई भरून ठेवायचो. आम्हा तिघांना पुरेल इतकं ते पाणी असायचं. हा व्यास रोज रात्री दहा-साडेदहाला आमच्या रूम मध्ये येऊन सुरईतलं पाणी प्यायचा. पहिल्या पहिल्यांदा आम्ही काही म्हणालो नाही पण मग तो रोजच येऊ लागला. मी एक दिवस त्याला म्हणालो ‘ यार, तुम अपनी सुरई खरीदकर क्युं नही लाते? रोज-रोज हमरा पानी पी जाते हो. ‘ तो म्हणाला “अरे मै ब्राम्हण आदमी हूं. पानी पिता हूं तो तुमकों पुण्य मिलता है. “ नही पिउंगा तो तुम पापीयोको पुण्य कहासे मिलेगा ?” अशी ही वल्ली. ह्यांच्याच बाजूच्या रूममध्ये सबनीस पहेलवान अन वसतकार राहायचा. तो फार साधा होता. त्याला हिन्दी धड बोलता यायचं नाही. नेहमी काहीतरी गडबड करायचा. एकदा आम्ही सर्व व्हरांड्यात उभे होतो. तिकडून एक जण मोठ्यानं ‘ बहारो से कह दो, मेरे घर न आओ.’ हे गाण म्हणत आला. मि वसतकारला म्हटलं ‘ह्या गाण्याच्या ओळीचा अर्थ सांग बरं.’ तो म्हणाला ‘यार मला नाही

माहित.' मी म्हणालो ' अरे वसतकार, तो गाण म्हणतोय की बाहेरच्या ना सांगा की माझ्या घरी येऊ नका.' वसतकारनं गालावर हात ठेवला अन् सिरियसली म्हणाला 'अरे हो यार.' मग सगळे हसत सुटले. अशा ह्या गमती.

आमचा दिवाळीच्या सुटी पर्यंतचा काळ असाच सेट्ल होण्यात अन् मित्र जोडण्यात गेला. अर्थात कॉलेज मध्ये अन् होस्टेल मध्ये ही आम्ही फार व्यस्त असायचो. ड्रॉइंग, सर्वेईंग च्या शीट्स काढणं, जर्नलस लिहणं,असाइनमेंटस ह्यामुळे कॉलेज मध्ये तर सोडाच पण होस्टेल मध्येही फारसा फावला वेळ नसायचा. तरीही वेळात वेळ काढून आपापल्या ग्रुप बरोबर महिन्याला एकदा तरी गावात सिनेमाला जाण असायचंच . काही काही तर नियमित सिनेमा पहाणारे होते. आमच्या वर्गात एक अनंत तारे म्हणून विद्यार्थी डिप्लोमा करून डायरेक्ट सेकंड यिअर ला आला. तो फार हुशार होता अन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीनं अभ्यास करायचा. तो सेकंड यियर ला मेरीट पहिला अन फायनलला मेरीट दुसरा होता. हा तारे दर रविवारी गावात पायी सिनेमाला जायचा. अगदी परीक्षेच्या मध्ये रविवार आला , अन उद्या सोमवारी पेपर असला तरी तो रविवारी सिनेमाला जायचाच. आम्हाला आश्चर्य वाटायचं. आम्ही एकदा त्याला विचारलं ' तारे, यार तू परीक्षा सुरू असतानाही रविवारी सिनेमाला जातो. कमाल आहे.' तो म्हणाला कमाल-बिमाल काही नाही. माझ्या अभ्यासाच्या वेळी मी बरोबर अभ्यास करतो. त्या वेळी इतर काहीही भानगडी मी करत नाही. गप्पा मारत नाही. त्यामुळे माझं सर्व झालेलं असतं.' ह्या तारे चा काळे म्हणून रूम पार्टनर होता. तो बी.एससी. केल्यानंतर

a

एक वर्ष शिक्षक म्हणून नोकरी करून मग इंजिनियरिंग ला आला. आम्ही त्याला काळे मास्तर म्हणायचो. तो अभ्यासात यथातथाच होता. अन तारे खूप हुशार. मी काळेला नेहमी चिडवायचो ‘ अनंत तारे आकाशी, अन आम्ही धरेवर काळे मास्तर。 ‘आमच्या होस्टेल मध्ये दर महिन्या-दीड महिन्यांनंतर रवीवरच्या रात्री म्यूजिक नाईट व्हायची . साधारणतः: तीन तास तरी हा कार्यक्रम चालायचाच. पूर्ण मेस हॉल खचाखच भरलेला असायचा. आमच्या होस्टलेचा ऑर्केस्ट्रा खूपचं चांगला होता. आमचे होस्टेलरच पट्टीचे गायक-वादक होते. मला आठवतं, फायनल यीयरचा, मुंबईचा एक जिंदानी म्हणून सिंधी मुलगा होता. तो खूपच सुरेख व्हायलिन वाजवायचा. अगदी प्रॉफेशनल वादका सारखा. त्याचं ते ‘प्रोफेसर’ सिनेमा मधलं, ‘ऐ गुलबदन, ऐ गुलबदन, फुलोकी महक. काटोकी चुभन। तुझे देखके कहता है मेरा मन ----‘ हे गाण सर्वांना खूपच आवडायचं. अजूनही हे गाणं कुठे ऐकलं की जिंदानी माझ्या डोळ्यासमोर उभा राहतो. अमरावतीचाच एक मधुकर पेंढारकर आमच्याच वर्गात होता. आम्ही सर्व त्याला मध्याच म्हणायचो. तो बुलबुल तरंग (बेंजो) अप्रतिम वाजवायचा. सर्व कठीण-कठीण गाणी त्यांच्या मधल्या म्यूजिक सह इतकी सुरेख वाजवयाचा की बस रे बस. ‘ सुवर्ण सुंदरी ‘ ह्या सिनेमातलं ‘ कुहू कुहू बोले कोयलिया--- हे गाण तर त्यातल्या सर्व राग दारी व शास्त्रीय संगीतासह अप्रतिम वाजवायचा. प्रत्येक वेळा मुलं त्याला हे गाणं वाजवायलाच लावायचे. तसंच ‘ चोरी चोरी ‘ मधलं ‘आजा सनम, मधूर चाँदनी मे हम’ किंवा ‘संगम’ मधलं ‘ बोल राधा बोल ‘ ही गाणी त्या मधल्या

संगीता सह अगदी उत्कृष्ट वाजवायचा. त्याला तितक्याच प्रॉफेशनली, आमच्याच हॉस्टेल मधला एक थीमय्या म्हणून विद्यार्थी होता, तो साथ द्यायचा. हा थीमय्या तबला व ढोलक समोर ठेवून ज्या वेळी जे लागेल त्या वेळी ते तो अगदी उत्तम वाजवायचा. तो इन्स्ट्रूमेंट्स वाजवणाऱ्यांनाच नाही तर गाणाऱ्यानाही साथ करायचा. उदगीर जवळचा आम्हाला एक वर्ष सीनियर असलेला एक मुलगा (मला आता नाव आठवत नाही) खूप छान हार्मोनियम वाजवायचा. तो मुकेशची गाणीही खूप छान गायचा. त्याचं ही एक गाण सर्वांचं खूप आवडतं होतं, " भुली हुयी यादो, मुझे इतना न सताओ, अब चैनसे रहने दो मेरे पास न आओ. " दरवेळा सर्व जण त्याला हे म्हणायला लावायचे. तसंच किशोर मिस्कीनचं होतं۰ ( किशोर मिस्कीन, म्हणजे नंतरचा प्रसिद्ध मराठी फिल्म निर्माता ) किशोर, रफीची गाणी खूप छान गायचा. पण त्याचं सर्वांना खूप आवडलेलं गाणं म्हणजे कोहिनूर सिनेमातलं ' मधुबन मे राधिका नाचे रे, गिरधर की मुरलीया बाजे रे ' अप्रतिम गायचा तो. आम्हाला एक वर्ष सीनियर असलेला शिरूर ही मन्ना डे ची गाणी तर् ईतरही गाणी सुरेख गायचा. त्याचं वन्स-मोर चं गाण म्हणजे-' लागा चुनरीमे दाग, छुपाऊ कैसे ". माझ्याच वर्गातला उस्मानाबाद जवळचा एक हीराळकर म्हणून मुलगा खालच्या मजल्यावर आमच्याच विंग मध्ये राहायचा۰ तो ' बैजू बावरा ' मधलं ' ओ दुनिया के रखवाले, सून दर्द भरे मेरे नाले ' हे गाण फारच छान म्हणायचा. विशेषत: अगदी शेवटी रफी नं ते जसं उंच स्वरात नेलं आहे, तसं च तसं हीराळकर न्यायचा. आमच्या कॉलेज च्या वार्षिक स्नेह सम्मेलनात ही मंडळी

तर असायचीच. ह्या व्यतिरिक्त हॉस्टेल मध्ये न राहणारी, चांगलं गाणारी मुलं ही असायची. आमच्या प्राध्यापकांपैकी काही उत्कृष्ट वादक होते. श्याम कुलकर्णी सर, तबला आणि बासरी ही खूप छान वाजवायचे. परांजपे सर ही बासरी छान वाजवायचे. अन चौधरी सर, अत्रे सर, गडहिंगलजकर हे तिघं ही व्हायलिन छानच वाजवायचे. त्यामुळे गॅद्रिंग मध्ये मजा यायची.

मला आठवतं, आम्ही दिवाळीच्या किंवा उन्हाळयाच्या सुटीवरून होस्टेलला परत आलो की कॉलेज तर दुसऱ्याच दिवशी पासून सुरू व्हायचं. पण आमची होस्टेल मेस आम्ही आल्या नंतर पाच-सहा दिवसांनी सुरू व्हायची. कॉलेज च्या बाजूला उसमानपुरा म्हणून वस्ती होती. (अजूनही आहे ), तिथे खानावळ किंवा जेवायला मिळेल अशी हॉटेलस नव्हती. त्यामुळे परत आल्या नंतरचे पहिले पाच सहा दिवस आमचा सर्व ग्रुप एकत्र , कधी गावात गुलमंडीवर तर कधी रेल्वे स्टेशन ला जेवायला जायचो. सर्व जण पायी जाण येणं करायचो. पूर्ण थाळी आम्हाला रोज परवडण्या सारखी नसायची. गुलमंडीवर मेवाड व कामाक्षी अशी समरासमोर दोन चांगली हॉटेलस होती. तिथे रुपया सव्वा रूपलात बटाट्याची भाजी अन् पाच पुऱ्या मिळायच्या. पुऱ्या बऱ्यापैकी मोठ्या असायच्या, त्यामुळे तेवढ्यात आमचं भागून जायचं. रेल्वे स्टेशन जवळ एक शेरे पंजाब म्हणून हॉटेल होतं. तिथं पोळया मिळायच्या. एका रुपयाला तिन. बहुधा आम्ही भेंडीची भाजी घ्यायचो। ती एका रुपयात मोठी प्लेट भरून यायची. ती आम्ही दोघात शेअर करायचो. हा दर सुटी नंतर चा प्रकार, आम्ही तिन्ही वर्ष केला. पाच सहा दिवसात मेस सुरू

व्हायची. आमच्या मेस मध्ये रोजच्या जेवणात, ताटात कराळयाची, जवसाची चटणी बहुधा रोज द्यायचे. मुंबई च्या सिंधी-पंजाबी मुलांना कराळा, जवस हा प्रकार माहीतच नसायचा. कधी हॉस्टेल चे वार्डन राऊंड वर आले आले की मुलं छोट्या-मोठ्या तक्रारी सांगायचे. असंच एकदा वार्डन कडे तक्रार करतांना मुंबईचा एक सिंधी विद्यार्थी त्यांना म्हणाला, ‘ Sir everyday in mess they do not give us pickle, but they give us that iron filings as chatani. ‘ आमच्या वार्डनला काही कळलं नाही. मग आम्ही त्यांना सांगितलं ‘ सर तो कराळयाच्या चटनीला आयर्न फाईलींगज असं म्हणतो आहे. रूम मध्ये इलेक्ट्रिक हीटर वापरायला बंदी होती. चहासाठी किंवा गरम पाणी करण्यासाठी हीटर वापरता येत नसे. त्याची ताबडतोब तक्रार व्हायची. मग हीटर जप्त व्हायचं अन दंडही व्हायचा. त्यामुळे आम्ही वर्षभर थंड पाण्यानंच आंघोळ करायचो.

आमच्या वेळी विद्यापीठाची वार्षिक परीक्षा असायची. ती नेहमी एप्रिल महिन्यात व्हायची. दहा-अकरा विषयांची परीक्षा सलग व्हायची, मध्ये रविवार सोडून एकही दिवस सुटी नसायची. त्यामुळे मार्च-एप्रिल महिन्यात रात्रभर हॉस्टेलच्या सर्व खोल्यांचे दिवे सुरूच असायचे. शिवाय आमच्या वेळी ATKT हा प्रकार नव्हता. विद्यार्थी एकाही विषयात नापास झाला की त्याचं वर्ष गेलं. त्यामुळे आम्ही रात्र रात्रभर अभ्यास करत असू. वर्षभर टर्मवर्क, असाइनमेंटस, सबमिशन सुरूच असायचं. त्यामुळे आम्ही नेहमी व्यस्त असायचो. पण ईतरही अॅक्टीविटीज सुरू असायच्याच . स्पोर्ट्स मध्ये टेबल

टेनिस , क्रिकेट ह्या मध्ये आमच्या कॉलेज च्या टीम्स फायनल पर्यन्त पोहचायच्या. क्रिकेटच्या मॅचेस तर गावात शिवाजी मैदानावर व्हायच्या. ते आमच्या कॉलेज पासून 4-5 किलोमीटर दूर होतं. तरीही आमच्या हॉस्टेलची मुलं तिथे चीअर करायला जायची. फायनल जिंकलो तर गाव भरातून नाचत हॉस्टेल ला यायची. कॉलेज मध्ये कल्चरल अॅक्टीव्हिटीज ही वर्षं भर सुरू असायच्या. त्यातही हॉस्टेलची खूप मुलं भाग घ्यायची. एकमेकांना प्रोत्साहन द्यायची. वार्षिक स्नेह सम्मेलनात ही आमचा भाग असायचा.

मला नाटकाची खूप आवड होती. पहिल्या वर्षी सम्मेलनात आम्ही पु.ल.देशपांडेंची ‘ विठ्ठल तो आला आला ‘ ही मोठी एकांकिका केली. मला तिच्यात भटजीचा महत्वाचा रोल मिळाला. मला आठवतं आमचे सी.बी.देशपांडे सर व आंबेगावकर सर आमचे दिग्दर्शक होते. सात-आठ दिवस तालमी झाल्यानंतर एक दिवस देशपांडे सर म्हणाले ‘ आपण हया वर्षी सम्मेलनात एक नवीन प्रयोग करू. प्रा..वसंत कानेटकरांचं ‘ रायगडला जेव्हा जाग येते ‘ हे खूप सुंदर नाटक आहे. त्यामधले तीन चार चांगले प्रसंग आम्ही निवडले आहेत. ह्या प्रसंगांचं वाचन तुम्ही करायचं. हे नाट्यवाचन आहे. स्टेज वर खुर्च्यांवर बसून तुम्हाला आप आपल्या पात्राचे डायलॉग वाचायचे आहेत. पडदा उघडाच राहील. अभिनय न करता, फक्त संवादाच्या फेकीवरून अन आवाजाच्या चढ-उतारावरून परिणाम साधायचा आहे०’आम्ही म्हणालो सर गॅद्रिंग चा मूड असतो. कोणीही ऐकणार नाही अन सगळं फ्लॉप होईल.’ सर म्हणाले’ तेच तर पहायचं आहे. अरे तुम्ही एवढे पट्टीचे वाचणारे आहात.

बरोबर पकड घ्याल. फक्त अर्ध्या तासाचं वाचन आहे. आपण करूच.’ मग सरांनी , शिवाजी, संभाजी, येसूबाई, सोयराबाई, हंबीरराव व राजाराम ह्या सहा पात्रांसाठी आमची सहा जणांची निवड केली. मला शिवाजी महाराजांचं वाचायला निवडलं० मग रोज एकांकीची तालीम झाल्यानंतर आमच्या नाट्य वाचनाची तालीम व्हायची. तिन-चार दिवसांच्या वाचनानंतर आम्हालाही ते आवडू लागलं. मग आम्ही सगळे आणखी जीव ओतून वाचायला लागलो. आमच्या एकांकीच्या आणि नाट्य वाचनाच्या रंगीत तालमी च्या 2-3 दिवस अगोदर, सरांनी फायनल यिअर च्या व्हायलिन वाजविणाऱ्या त्या जिंदानीला व्हायलिन घेऊन नाट्य वाचनाच्या वेळी बोलावलं. तो आल्यावर सर त्याला म्हणाले “ जिंदानी ये हमारे लडके गॅद्रिंग मे आधा घंटा यह नाटक पढने वाले है. आज तुम ठिकसे सब सुनलो. कलसे ये पढेंगे तब, सिच्युएशन कों सूट हो ऐसा बॅकग्राऊंड मुझिक तुमको बजाना है. ”त्यादिवशी जिंदानीनं ते सिरियसली ऐकलं. आमचं झाल्या नंतर आम्ही जेव्हा हॉस्टेलला परत चाललो होतो, तेव्हा मी त्याला विचारलं, ‘ जिंदानीसाब, हम तो मराठीमे पढ रहे है. और मराठी तो आपको समझता नही. फीर आप कैसा म्यूजिक देंगे? ‘ तो म्हणाला ‘ अरे यार जाजू , तुम लोग ईतना अच्छा पढ रहे हो की मेरे सब समझ मे आरहा है. अब कल देखना मेरा कमाल.’ अन दुसऱ्या दिवशी त्यानं खरंच आमच्या चढावा-उताराप्रमाणे वाजवलं. ही आमच्या यशाची मोठी पावतीच होती. सरांनाही खूप आनंद झाला. आमची रंगीत तालीम खूपच चांगली झाली अन आमचा आत्मविश्वास वाढला. सम्मेलनाच्या रात्री आम्ही इतकं जीव ओतून वाचलं

a

की त्या मूड मध्येही आम्ही सर्व श्रोत्यांना अर्धा तास खिळून ठेवलं. आमच्यासाठी तो एक अविस्मरणीय प्रसंग होता. त्यात ही आम्ही होस्टेलर च जास्त होतो. मग ते कितीतरी दिवस होस्टेल मध्ये सुरूच होतं. इतकंचं नाही तर ते नाटक मला इतकं आवडलं, की त्यातले, संभाजी-येसूबाई, शिवाजी-येसूबाई ह्यांच्या मधले आग्र्याहून सुटकेच्या प्रसंगाचे डायलॉग्ज मी पाठच करून टाकले. नंतर माझ्या जीवनात ते मी अनेक प्रसंगी स्टेज वर करून ही दाखवले आहेत. अगदी अजून पर्यंत मी ते करतो.

सेकंड यिअरला मात्र मी मराठी नाटकात काम करू शकलो नाही. एफ.ई. ला माझं एक अंकी मधलं आणि नाट्य वाचनाचं काम आम्हाला दोन विषय शिकवणारे प्रा.बाहेती ह्यांना खूप आवडलं. ते हिन्दी नाटकाचे प्रभारी प्राध्यापक होते. एस.ई.ला त्यांनी मला आधीच सांगून ठेवलं होतं की ह्या वर्षी ‘तुला हिन्दी नाटकात काम करावं लागेल. तुझ्यासाठी मी त्यात रोल ही पक्का करून ठेवला आहे.’ मग मी त्या वर्षी हिन्दी नाटकात काम केलं.

सेकंड यियर वरुन आठवण झाली. आमचा प्रथम वर्षाचा निकाल खूप टफ लागला. आमच्या ग्रुप मधून आम्ही दहा पैकी चार जणच पास झालो. आमच्या प्रथम वर्षाच्या वार्षिक परीक्षेत झालेला एक प्रसंग मला अजूनही आठवतो. आमच्या वर्गात अजय विरानी अन संजय विरानी असे दोन सख्खे भाऊ होते.(नावं बदलली आहेत्) अजय मोठा अन संजय धाकटा होता। ते आमच्या हॉस्टेल मध्ये एकाच रूम मध्ये राहायचे. दोघंही काही फारसे अभ्यासू

नव्हते. श्रीमंत बापाची मुलं ती. मौज मस्तीच जास्त चालायची. त्यातल्या त्यात अजय चांगला खेळाडू होता. आमच्या वार्षिक परीक्षेत प्रत्येक विषयाच्या पेपर मध्ये दोन सेक्शन असायचे. एक सेक्शन-- A आणि दूसरा सेक्शन- –B. प्रत्येक सेक्शन मधून, तिन-तिन प्रश्न सोडवावे लागत. अन त्या दोन्ही सेक्शन च्या उत्तर पत्रिका वेगवेगळया असायच्या. (मला वाटतं अजून पर्यन्त ते तसंच चाललं आहे) ए सेक्शन ची उत्तरं ए च्या उत्तर पत्रिकेत, अन बी सेक्शन ची बी च्या उत्तर पत्रिकेत लिहायला लागायची. विद्यपीठाकडे त्या उत्तर पत्रिका तशाच वेगवेगळया बंडल मध्येच जायच्या. ह्याची माहिती वर्षाच्या सुरवातीलाच आम्हाला द्यायचे. कारण आमच्या कॉलेजच्या टर्म एंड परीक्षेतही तसंच करावं लागायचं. ह्या गोष्टीचा गैर फायदा आमच्या ह्या विरानी बंधुनी अगदी डोकं लढूवून घायचं ठरवलं. अर्थात त्यांची युक्ति त्यांनी कोणालाही न सांगता अगदी गुप्त ठेवली. ते असं करायचे की, अजय फक्त ए सेक्शन चा अभ्यास करायचा अन संजय फक्त बी सेक्शन चा. म्हणजे प्रत्येक विषयाचा निम्मा अभ्यास एकजण करायचा अन उरलेला निम्मा दूसरा करायचा. त्यांना माहीत होतं की विद्यापीठाचे परीक्षेसाठी येणारे रोल नंबर त्यांचे आगे मागेच येणार. म्हणजे ते परीक्षेला आगेमागेच बसणार. मग एकानं आपला ए तर दुसऱ्यानं आपला बी सेक्शन सोडवायचा अन् नंतर हळूच इनव्हीजिलेटर च लक्षं नसतांना ते सेक्शन अदलाबदल करायचे.व कॉपी करून दूसरा सेक्क्शन लिहायचे. ही योजना त्यांनी कोणालाही न सांगता आपल्यामध्येच गुप्त ठेवली होती. पण परीक्षेच्या वेळी त्यांचे दोघांचे रोल नंबर

a

एका पाठोपाठ न येता त्यांच्या दोघांच्या मध्ये दोन दुसरी मुलं आली. अर्थात ह्या दोघांचे आडनाव ‘व’ वरून सुरू होणारेच होते. त्यापैकि एक राज होता. अन् दूसरा भास्कर. ( ही चार ही नावं मुळची नाही. मी ती पूर्णपणे बदलली आहेत ) मग दोघा भावांनी राज आणि भास्कर ह्या दोघांना विश्वासात घेऊन त्यांना विनंती केली की असा एकाचा सेक्शन दुसऱ्या भावाकडे पास करायला त्यांनी मदत करावी. त्यात राज थोडा बेफिकीर होता. तो तयार झाला. पण भास्कर साधा-सरळ होता. तो तय्यार होईना. ह्या दोन्हीही भावांनी त्याला गळच घातली. ‘ तुला काहीही होणार नाही. आम्ही काळजी घेवू. हे आपल्या चौघांनाच माहित असेल. आणखी कोणालाही आम्ही सांगणार नाही. ‘ शेवटी भास्कर तयार झाला. परीक्षा सुरू झाली. अन पहिल्या दोन पेपरला त्यांची ही योजना यशस्वी झाली. तिसऱ्या पेपरला जे दोन इंव्हिजिलेटर आले, त्यातले एक प्राध्यापक खूप कडक होते. ते चतुराईनं कॉपी पकडतात अशी त्यांची ख्यातीच होती. ते सारखे रूम मध्ये चकरा मारायचे व विद्यार्थ्यांवर बारीक नजर ठेवायचे. त्या दिवशी सेक्शन ची अदलाबदल करताना ह्या चौघांमध्ये काहीतरी गडबड आहे हे त्यांच्या लक्षात आलं. ह्यांच्या हालचाली बंद झाल्यानंतर पाचेएक मिनिटांनी ते समोरच्या विरानी जवळ गेले. त्याच्याजवळची उत्तर पत्रिका पाहीली. तर दोन्ही सेक्शन बी च्याच. एकीवर त्याचा नंबर अन दुसरीवर वेगळाच नंबर. मग ते ज्याचा तो नंबर होता त्याच्या जवळ गेले. तिथेही तोच प्रकार. त्यांच्या लक्षात ही गडबड आली. त्यांनी त्या दोघांनाही आपआपल्या जवळ असलेल्या उत्तर पत्रिका घेऊन ऊभं केलं अन्

मधल्या दोघांनाही. मग त्या चारही जणांना घेऊन ते प्राचार्यांकडे गेले. तिथे प्राचार्यांनी त्यांना खूप दाटलं व खरं खरं सर्व उगाळायला लावलं. त्या सर्वांकडून कबुली जबाब लिहून घेतला. अन ताबडतोब ऑर्डर काढून, दोघा विरानी बंधूंना दोन वर्षासाठी तर राज अन् भास्करला एक वर्षासाठी डीबार केलं. त्यात भास्कर ने खूप गयावया केली, विनंती केली. 'मी गरीब घरचा व खेडत्यातून आलेलो आहे. माझं वर्ष विनाकारण जाईल सर. मी हे काही करायला तयार नव्हतो. ह्या लोकांनी माझ्यावर दबाव आणला.' असं परोपरीनं प्राचार्यांना सांगून पाहीलं. आमचे प्राचार्य फार कडक शिस्तीचे होते. त्यांनी काही एक ऐकलं नाही.

पुढे बहुदा विरानी बंधू इंजीनीअरिंगला आलेच नाही. राज सिविल इंजीनीअरिंग करून आर्मड फोर्सेस मध्ये गेल्याचं कळलं. भास्करही यशस्वी रित्या मेकॅनिकल इंजीनियर झाला. त्यालाही पुढे चांगली नोकरी मिळाली. असा हा किस्सा. ह्यात भास्कर बद्दल आम्हा सर्व वर्ग मित्रांना खूप वाईट वाटलं. ह्या सर्व प्रकारात त्याचा नाहक बळी गेला. सेकंड यियरला मी आणि देशपांडे आम्ही जुनेच परत रूम पार्टनर झालो. आम्हाला मधल्या मजल्यावर दोन सिटर रूम मिळाली. एस.ई.ला आम्हाला आमच्या चॉइस च्या ब्रांचेस मिळायच्या. अर्थात मेरीट प्रमाणे. सर्वात जास्त प्रिफरन्स मेकॅनिकल ला असायचा. नंतर इलेक्ट्रिकल, सिविल असे असायचे. मला आणि देशपांडे दोघांनाही मेकॅनिकल मिळालं. एस.ई.ला मग आणखी मोठा वेगळाच ग्रुप झाला. डिप्लोमा करून डायरेक्ट सेकंड यिअरला ॲडमिशन मिळायची. त्यात

सेकंड यिअर इलेक्ट्रिकल ला आलेला अनंत तारे हा आमचा ग्रुप फ्रेंड झाला. तो खूप हुशार होता. त्याच्याबद्दल मी आधी लिहलं आहे. सेकंड यियरला काही प्रॅक्टिकल्स करण्यासाठी आम्हाला आठवडाभर पुण्याच्या इंजीनीरिंग कॉलेजला जावं लागायचं. त्यावेळची एक मजा आठवली. मी अन माझा रूम पार्टनर देशपांडे आम्ही दोघं पुण्याला गेलो होतो. तिथलं काम झाल्यावर ज्या दिवशी आम्ही औरंगाबादला परत आलो, तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. आल्याबरोबर आम्ही हात तोंड धुवून सरळ मेस मध्ये जेवायला गेलो. जेवून आल्यानंतर, लवकरच म्हणजे रात्री नऊलाच झोपलो. अन चक्क दुसऱ्या दिवशी दुपारी अडीच वाजता उठलो. रेकॉर्डब्रेक झोप काढली. मेस वगैरे सर्व बंद होवून गेली होती. देशपांडे म्हणाला आज आपण रूमवर शिरा करू. आमच्या जवळ चहाची साखर होती. मग उस्मान्पुऱ्यात जावून एक पावशेर रवा अन थोडं डालडा तूप घेऊन आलो. शिरा कसा करायचा हे आम्हा दोघांनाही बरोबर माहीत नव्हतं. मग आम्ही स्टोव्ह पेटवून त्याच्यावर पातेलं ठेवलं. तूप टाकलं. ते गरम झाल्यावर रवा टाकला. तो लालसर होईपर्यंत भाजला. इथपर्यंत ठीक होतं. मग आम्ही त्याच्यात साखर टाकली. आम्हाला वाटलं आता साखरेला मिसळता मिसळता पाणी सुटेल. म्हणून फूल स्टोव्हवर खूप वेळ हलवत बसलो. आम्ही पाणी किंवा दूध काहीच टाकलं नव्हतं.(रूममध्ये दूध तर नव्हतंच) थोड्यावेळानं पातेल्यात सर्व जळून कोळसा झाला. अन ते सर्व काळं पातेल्याला चिकटलं. दोघांनी कपाळावर हात मारून घेतला. परत उस्मान्पुऱ्यात जाऊन ब्रेड आणली अन् पाच वाजता ती खाल्ली.

a

पुढे घरी आल्यावर कळलं की शिरा कसा करायचा. एस.ई.ला आम्ही सर्व जण व्यवस्थित पास झालो. नंतर बी.ई. फायनलला आम्ही हॉस्टेलच्या तिसऱ्या मजल्यावर गेलो. देशपांडे, महाशूरचा पार्टनर झाला. अन् मी अन शेंडे रूम पार्टनर झालो. तो एफ.ई.ला आमच्या समोरच्या रूम मध्ये व्यासचा पार्टनर होता. आमची रूम आता देशपांडे-महाशूर ह्यांच्या रूम समोर होती. शेंडे पहिल्या पासूनच आमच्या ग्रुप मध्ये होता. तो चंद्रपुर जिल्ह्यातल्या भद्रावतीचा. खूप अभ्यासू होता. अन् कोणाच्या आध्यात नाही मध्यात नाही असा. आमची दोस्ती मग खूप जमली. शेंडे गाणी छान म्हणायचा. विशेषत: मुकेशची गाणी. सकाळी उठल्या उठल्याच अंथरुणातच त्याचा मुकेश सुरू व्हायचा. तो मेस मध्ये जेवताना खूप सावकाश जेवायचा. आम्ही त्याला नेहमी चिडवत असू की तू काय खरंच एकेक घास 32 वेळा चावतो की काय. बरेच वेळा मग मेस मध्ये जेवायला जाताना आम्ही त्याच्या 10 मिनिट अगोदर निघायचो. म्हणजे मग आमचं सर्वांचं जेवण बरोबर संपायचं. खास करून रात्री आम्ही असं करायचो. कारण जेवल्या नंतर आम्ही सर्व 10-15 मिनिट फिरून यायचो. मला आठवतं, फायनल यिअर ला मी आजारी पडलो. मला मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटल मध्ये 15-20 दिवस ॲडमिट केलं होतं. आमच्या हॉस्टेल पासून ते हॉस्पिटल 4-5 किलो मीटर दूर होतं. शेंडे एक-दोन दिवसा आड सायकल भाड्यानं घेऊन मला दवाखान्यात भेटायला यायचा. येताना कधी फळं तर कधी बिस्किट तर आणायचाच, पण माझे अन्डर विअर-बनियन धुवून आणायचा. इतर मित्र ही यायचे. पण त्या वेळी शेंडेनं माझ्यासाठी खूप

केलं. आमची ही मैत्री अद्याप पर्यंत टिकून आहे. तसे आमच्या ग्रुप मधले आम्ही सर्वच मित्र अजूनही संपर्कात आहोत. माझ्या अडीअडचणीत मला नेहमी मदत करणारा माझा आणखी एक मित्र म्हणजे खामगावचा गुलाब शाह. मी प्रथम वर्षाला असतांनाच माझे वडील वारले. त्याच वर्षी माझा मोठा भाऊ अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात लेक्चरर म्हणून नोकरीला लागला. माझे वडील वारल्यानंतर माझ्या ह्या मोठ्या भावानं आमच्या घरच्यांना सांगितलं की 'आता बंकटला (म्हणजे मला) दर महिन्याला मी पैसे पाठवत जाईन. तुम्ही घरून पाठविण्याची काही आवशकता नाही.' मग तो दर महिन्याला 70-80 रुपयांची मनी ऑर्डर पाठवायचा. तेवढ्यात माझा महिन्याचा खर्च भागायचा. एखाद वेळा मनी ऑर्डरला उशीर झाला अन् मेसचं बिल भरायची शेवटची तारीख आली, तर गुलाब शाह माझं बिल भरायचा. मधून कधी लागले तर पैसे द्यायचा.

एकदा तर मजाच झाली. आम्हाला कॉलेज मध्ये दुपारी सव्वा बारा ते साडे बारा असा 15 मिनिटांचा ब्रेक असायचा. ब्रेक मध्ये आम्ही नेहमी रूमवर यायचो. व पुढच्या तासांची नोट बुक्स- बुक्स घेऊन जायचो. एक दिवस मी आणि शेंडे असंचं ब्रेक मध्ये रूम वर आलो. रूमचं कुलूप उघडायला जशी चाबी लावायला गेलो. तर कुलूप तोडलेलं होतं. आम्ही दोघांनी घाईनं दार उघडलं अन् पहातो तर चोरी झालेली. आमच्या बाजूचे रूमवालेही जमा झाले. मग सर्व जण म्हणाले वार्डनना सांगा अन उस्मानपुरा पोलिस स्टेशन मध्ये तक्रारही द्या. मग ते सर्व करायला शेंडे गेला. सर्व जण मला म्हणाले पोलीस

a

येईपर्यंत तू कशालाही हात लावू नको. मी वरवर पाहीलं, तर माझ्या लक्षात आलं की माझी पेटी उघडी आहे व त्यातली माझी एक नवी पॅंट अन शर्ट चोरानं नेला. माझ्या टेबल वरचं माझं अलार्म वॉच गेलं. दोनचार दिवसांपूर्वीच आम्ही खिडकीच्या पडद्यांसाठी ( ऊन येत होतं म्हणून ) आणून ठेवलेलं नवीन कापडही गेलं. आमच्या कॉमन टेबलवर असलेलं चहाचं भांडं अन् आमचा वातीचा स्टोव ही गेला. नशीब, दुधाच्या पातेल्यांत थोडं दूध होतं म्हणून की काय ते चोरानं नेलं नाही. (खरं म्हणजे ते दूध पिऊन पातेलं तो घेऊन जाऊ शकला असता. बहुदा त्याच्या डोक्यात हे आलं नाही). थोड्या वेळात शेंडे पोलीसांना घेऊनच आला. तो आल्या नंतर कळलं की त्याचे तीस-चाळीस रुपये ड्रावर मध्ये होते ते गेले. पोलिसांनी मग आमच्या वॉचमनला बोला ऊन खूप दाटलं. तुम्ही झोपा काढत असता वगैरे त्याला म्हणाले. मग काय काय चोरीला गेलं ह्याची आम्ही सांगितल्या प्रमाणे यादी केली. पंच नामा केला. माझी पेटी तोडली होती म्हणून ती ही घेऊन गेले. माझ्याजवळ असलेले थोडेफार पैसे माझ्या खिशातच होते म्हणून बरं. त्या दिवशी दुपारच्या पिरीयड्सना आमच्या विंग मधले कोणीच गेलो नाही. आमचीच एकटी खोली फोडली होती. ती का ? हयाच्यावर चर्चा झाली. आमची विंग एका कोपऱ्यात होती अन् विंग मध्ये सहा खोल्या होत्या. अन सगळ्यात गरीब खोली आमचीच होती. ती सोडून दुसरी कुठली ही रूम फोडली असती तर चोराला भारी कपडे, बऱ्यापैकी पैसे व इतर सामान मिळालं असतं. म्हणजे चोर, आमची माहिती असलेला नव्हता एवढं सिद्ध होत होतं. मग माझ्या लक्षात

आलं कि सर्व खोल्यांपैकी आमच्याच खोलीचं कुलूप तकलादू व लवकर तोडता येण्यासारखं होतं. मी बाकी सर्वांची कुलूपं घेऊन आलो. सर्वांनी ती पाहील्या नंतर माझं म्हणणं त्यांना पटलं. पण जे झालं ते झालं. पुढे त्या चोरीचा काही पत्ता लागलाच नाही. उलट पोलिस माझी पेटी घेऊन गेले ती ही परत मिळाली नाही. हे सर्व एवढ्यावरून आठवलं की, चोरी झाल्यानंतर परत सर्वात आधी गुलाब शाह आमच्या मदतीला आला. आमच्या रूम वर येऊन तो म्हणाला ‘ नाना, मेरे पास दो अच्छे स्टोव है और चायके बरतन भी दो है मेरे पास. मै तुमको मेरा एक स्टो और एक बरतन लाके देता हू. ‘ आणि खरंच तो घेऊन आला. माझ्याजवळ काही फारसे कपडे नव्हते. त्यातल्या त्यात चांगला पॅंट,शर्ट चोरानं चोरून नेला.

कॉलेज मध्ये नाही तरी रोज खाकी पॅंट अन् पांढरा शर्ट हा युनिफोर्म घालून जावं लागायचं. आमचे प्राचार्य नगरकर इतके कडक होते की दूरवरूनही त्यांना कोणी युनिफॉर्म न घालून आलेला दिसला की ते हात हलवून त्याला जवळ बोलवायचे अन खूप दाटून घरी पाठवायचे. हयावरून एक कीस्सा आठवला. एक दिवस त्यांनी असंच एकाला बोला ऊन खूप दाटलं अन् कपडे बदलून यायला सांगीतलं. त्यांचं दाटून झाल्यावर ती व्यक्ति म्हणाली ‘ सर मी मेकॅनिकल डिपार्टमेंट मध्ये लेक्चरर आहे. ह्याच वर्षी लागलो. ते दिसायलाही ठेंगणे अन् सडपातळ होते. मग प्राचार्य त्यांना म्हणाले ‘ असं होय? मग आधी का नाही सांगितलं ?’ आम्ही विद्यार्थी व्हरांड्यातून ही गम्मत पाहत होतो. प्राचार्य गेल्यानंतर आम्ही त्या जूनियर सरांकडे गेलों

अन म्हणालो ‘ सर आता स्टाफ साठीही युनिफॉर्म ठेवला पाहिजे. आमच्यातला एक जण हसून म्हणाला ‘ सर, तुम्हा लोकांसाठी पांढरा पॅंट अन् खाकी शर्ट हा युनिफॉर्म कसा राहील? ‘ मग सर्व जण हसायला लागले.

फायनल यिअरला कॉलेज सुरू झाल्यावर महिन्या भरात विद्यार्थ्यांच्या इलेक्शन च्या तारखांची नोटीस लागली. स्टुडंट्स यूनियन मध्ये अध्यक्ष, सचिव, स्नेह सम्मेलन सचिव, स्पोर्टस सचिव, मॅगझिन सचिव, सांस्कृतिक कार्यक्रम सचिव, सर्व वर्गांचे प्रतिनिधी अशी बरीच पदं असायची. आमच्या ग्रुपनं आमचा वर्ग प्रतिनिधी अन मॅगझिन सेक्रेटरी साठी आमचा एक मयानी म्हणून मित्र अन् व्यासला मॅगझिन साठी उभं केलं. आमचं ही शेवटचं इलेक्शन होतं म्हणून आमचा जास्तीच उत्साह होता. आम्ही सर्व जणांनी मग व्यासला निवडून आणायचा चंग बांधला. व्यास आता सेकंड यिअरला होता. आम्ही रात्र-रात्र भर माझ्याच खोलीत व्यासचे पोस्टर्स तयार करायचो. शेंडेचं हस्ताक्षर, देशपांडेचं ड्राइंग खूप चांगलं होतं. मी शेर-शायरी अन् सिनेमाच्या गाण्यांच्या चालीवर पॅरोडी(कविता) लिहून द्यायचो. इतर मित्र ते पोस्टर्स कॉलेज मध्ये जाऊन चिकटवायचे. अशी धूम, आठ-दहा दिवस सुरू होती. शेवटी एकदाचा आमचा व्यास निवडून आला. मी नेहमीच सिनेमांच्या गाण्याची पॅरोडी करत गाणी जोडायचो. मला आठवतं, असंच एकदा आम्ही ‘ आरजू ‘ हा चित्रपट पाहायला आमच्या ग्रुप मधले आम्ही फायनल चे सर्व मित्र अन आता सेकंड यिअरला असलेले आमचे हॉस्टेल मधले मदन, सरदार खालसा, व्यास, वसतकार असे सर्वजण गेलो होतो. आम्हाला चित्रपट तर

आवडलाच , पण त्यातली गाणीही खूप आवडली. आम्ही ती गुणगुणतच कॉलेज मध्ये आलो. रात्रीही माझं, त्यातलं " छलके तेरी आखोसे, शराब और जियदा " हे गाण गुणगुणनं चालूच होतं० दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्याच माझ्या डोक्यात ' छलके तेरी आखोसे –' ची पॅरोडी ( खरं म्हणजे विडंबनच ) डोक्यात आलं. मी ब्रश अन् टुथपेस्ट घेऊन बाथरूमच्या बेसीन वर चुळ भरून बाथरूम च्या बाजूला असलेल्या मोठ्या ग्रीलच्या खिडकी जवळ उभं राहून मोठ्यानं 'आरजू' च्या त्या गाण्याच्या चालीवर गायला लागलो. " खालसा तेरी पगडीमे, खटमल है आज देखा " खालसा तेरी-----' नेमकं त्याच वेळी आमच्या खालच्या मजल्याच्या ग्रील जवळ खालसा(सरदार) उभा होता. त्यानं माझं ते गाण ऐकलं अन् खालूनच तो जोरानं ओरडला " अबे वो नान्या के बच्चे , क्या बक रहा है ? " मी वरून ओरडलो ' कुछ नही यार, ऐसेही गा रहा था.' तो परत ओरडला ' अबे वो हसरत जयपूरी के बाप, तेरेको मै ही मिला क्या गाना लिखने के लिये? ' तेवढ्यात खाली-वर आमचे आणखी दोन-चार मित्र जमा झाले. सर्व जोरजोरानं हसायला लागले. मार्चच्या महिन्यापासून तर आम्ही रात्री दोन-तिन वाजे पर्यंत अभ्यास करायचो. त्यामुळे रोज रात्री दहा-सव्वा दहाला आम्ही उस्मान्पुऱ्याच्या शिवाजी टी स्टॉल वर चहा घ्यायला जायचो. तेव्हाही रोज जातायेतांना अशी एकमेकाची खिल्ली उडवण चालूच असायचं. बऱ्याच वेळा खालसाच टार्गेट असायचा. एक तर तो सरदार. मग सरदारजींचे जोक्स वगैरे सांगून काहीही त्याच्या नावावर खपवलं जायचं. दुसरं म्हणजे खालसाही इतरांची खूप खिचाई

a

करायचा. तो ही वस्ताद होता. पण रोजच्या त्या अर्ध्या तासाच्या ब्रेकमुळे आम्ही सर्व फ्रेश होऊन परत रात्री अभ्यासाला बसायचो. शेवटच्या वर्षी तर आजारात माझा महिना दीड महिना गेला. त्यामुळे माझा अभ्यास खूप बुडाला. शेवटी शेवटी तर मी जवळ जवळ रात्र रात्र भर अभ्यास करायचो. नेहमी डोकं दुखत राहायचं. अमृतांजन तर कायम माझ्या उशीच्या बाजूला असायचं. ह्या डोके दुखी मुळे मी त्रस्त होऊन एकदा मेडिकल कॉलेज च्या सीनियर डॉक्टर चारी ह्यांना दाखवायचं ठरवलं. पण त्यांना दाखवायला आम्हाला प्राचार्यांची नोट(चिठ्ठी) न्यावी लागायची. आमच्या हॉस्टेल समोरच प्राचार्यांचा बंगला होता. नगरकर सर एकटेच राहयचे. त्यांचं कुटुंब पुण्यालाच राहायचं. मी त्यांच्याकडे गेलो अन् त्यांना सर्व सांगीतलं. ते म्हणाले “ डॉ. चारींकडे जायची काही आव शकता नाही. तुझं पोट बरोबरनाही. तुला अपचन आणि कॉन्स्टीपेशन चा त्रास आहे. रोज सकाळी आपल्या ग्राऊंडला दोन चकरा मारत जा. आणि ह्या दोन प्रकारच्या गोळया लिहून देतो. त्या एक सकाळी अन एक जेवणानंतर घेत जा. दहा दिवस घे. तुला काहीही त्रास राहणार नाही. मला अजूनही त्या गोळयांची नावं आठवतात. मी त्या दहा दिवस घेतल्या. मला फरक ही जाणवला. रात्रीच्या जागरणामुळे ग्राऊंडला चकरा मात्र मारू शकलो नाही. ह्या आजारपणात वेळ गेल्यामुळे मला माझ्या बऱ्याचशा ॲक्टिविटीजना लगाम लावावा लागला. तरी आपले जे आवडते छंद असतात ते माणसाला कसे ओढून घेतात आणि अशात जर विद्यार्थी दशेत आपण

हॉस्टेल मध्ये राहत असलो, तर आपल्या होस्टेलची ही मित्र मंडळी आपल्याला कसं प्रोत्साहन देते, ह्याचं एक मजेदार उदाहरण मला आठवतं.

मी वर आधीच लिहलं आहे की मला नाटकात काम करायची खूप आवड अन हौस होती. वर सांगितल्या प्रमाणे मी प्रथम अन् द्वितीय दोन्ही वर्षी नाटकात काम केलं. मला तर त्यात खूप आनंद मिळायचाच, पण माझ्या सर्व मित्रांना अन प्राध्यापकांनाही माझं काम खूप आवडायचं. स्नेहसम्मेलन झालं की चार सहा दिवस त्या नाटकाच्या धुंदीत जायचे. मित्रांकडून आपलेच डायलॉगज ऐकण्यात मजा यायची. फायनल यिअरला मात्र, आजारपणात माझा महिना दीड महिना गेल्यामुळे मी ठरवलं की आता ह्या वर्षी नाटकात काम करायचं नाही. त्यात, त्या वर्षी सरांनी बाळ कोल्हटकरांच ‘ मुंबईची माणसं ‘ हे तिन अंकी नाटक करायचं ठरवलं होतं. त्याच्या रोजच्या दोन-तिन तासाच्या तालमी, अन ते ही वीसेक दिवस. त्यात माझा खूपच वेळ जाणार म्हणून मी नाट्य वाचन अन पात्रांचं सिलेक्शन होणार होतं त्या दिवशी तेथे गेलोच नाही. सरांनी आठवण केली म्हणे . पण माझ्या ट्रायल ला गेलेल्या मित्रांनी त्यांना जाजू ह्या वर्षी नाटकात काम करणार नाही असं सरांना सांगितलं॰ सरांनी मला दुसऱ्या दिवशी बोलावून विचारलं. ते म्हणाले ‘ अरे ह्या नाटकातला हीरो च्या बापाचा म्हणजे त्या कोल्हापूरी पाटलाचा रोल मी तुझ्यासाठी ठेवला होता. चांगला रोल आहे तो तुझ्यासाठी. ‘ मी सरांना खरं कारण सांगून माझा खूप अभ्यास बुडेल हे पटवून दिलं. मग त्यांनीही फार गळ घातली नाही.

a

एक दोन दिवसातच त्यांच्या तालमी सुरू झाल्या. रात्री कॉलेज मध्येच त्या व्हायच्या. त्या नाटकातलं श्यामचं म्हणजे हीरोचं काम आमच्या होस्टेल मधलाच माझा एक मित्र, धर्माधिकारी करणार होता. तिन,चार दिवसांनी तो मला म्हणाला ‘चल आज आमची प्रॅक्टिस बघायला.’ मी त्या दिवशी त्याच्याबरोबर गेलो. त्यांची तालीम सुरू झाली. पहिल्याच अंकात त्या पाटलाचं पण काम होतं. आम्हाला एक वर्ष जुनियर असलेला, पंतोजी नावाचा मुलगा ते काम करत होता. पाटलाच्या तोंडचे ते डायलॉगज ऐकून माझ्या मनात चल बिचल सुरू झाली. वाटलं, खरंचं हे काम आपण करायला हवं होंतं. त्या वेळी त्यांची तालीम पाहून, थोडा अस्वस्थच होऊन रूम वर परतलो. आमच्या दोन विंग च्या मध्ये मोठा कॉरीडोर होता व त्याच्या शेवटी एक मोठी ग्रीलची खिडकी होती. संध्याकाळी बऱ्याच वेळी आमच्या विंगमधले 4-5 जण त्या खिडकीत बसून गप्पा मारत. मी तालीम पाहून परत आलो तेव्हाही तिथे 4-5 जण बसलेले होते। मला पाहताच एक मित्र म्हणाला ‘काय नाना कुठे जाऊन आला?’ मी म्हटलं ‘ यार धर्माधिकारी बरोबर नाटकाची प्रॅक्टिस पाहायला गेलो होतो. ‘ ते म्हणाले ‘ नाना तुझ्या डोक्यातून ते नाटक जाणार नाही. ‘मी म्हटलं ‘ खरच यार, आज परत वाटायला लागलं की आपण काम करायला पाहिजे होंतं. सालं त्यांची प्रॅक्टिस पाहून बेचैन झालो। पण आता उशीर झाला यार. ‘ मग एकजण म्हणाला ‘ सालं तू ह्या वर्षी एक छोटंस एकपात्रीच करून टाक. अजून दहा अकरा दिवस आहेत. तुझं तर काय सात-आठ दिवसातच बसेल. आपण ईथंच रूम वर एक तास प्रॅक्टिस घेत जाऊ.

त्यात तुझे जास्त दिवस अन् जास्त वेळही जाणार नाही. अन् हा एक नवीन प्रयोग होईल. तुलाही नाटक केल्याचं समाधान मिळेल. चलो. उद्या आपण पु.लं.देशपांडे, जयवंत दळवी, वसंत सबनीस ह्यांच्या काही विनोदी एकांकीकांची पुस्तकं आणू अन् त्यातून सर्वांना आवडेल ते निवडू.' माझ्यापेक्षा माझ्या मित्रांच्याच अंगात खूप उत्साह संचारला होता. त्यांचा तो उत्साह पाहून माझ्याही अंगात वारं भरलं. मग दुसऱ्या दिवशी आम्ही गावात जाऊन दोन-तिन मोठे बूक शॉपस धुंडाळले. आमच्या सुदैवानं आम्हाला पु.लं.चं एक, दळवि चं एक अन् बसंत सबनिसांचं एक अशी तीन पुस्तकं मिळाली. हॉस्टेलवर येऊन आम्ही ती चाळली. अन् मग त्यातला विनोद, एकांकीला लागणारा वेळ, त्यातली पात्रांची संख्या ह्या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही सर्वानुमते वसंत सबनीसांची ' चोर आलेच पाहिजे ' ही एकांकीका निवडली. ती साधारणतः: तीस- पसतीस मिनिटं चालणारी होती. तिच्यात पाच पात्र होती. एक मध्यम वर्गीय अन् पन्नाशीच्या दरम्यान वय असलेलं जोडपं, दोन चोर अन् एक हवालदार अशी पाच पात्र होती. अर्थातच ही पाचही, आवाज बदलून, त्या त्या पात्राला साजेसा अभिनय मला करावा लागणार होता. एकपात्री करायची माझी ही पहिलीच वेळ होती. पण पूर्वी शाळेत मी अशा अनेक पात्र असलेल्या नकला करायचो. नाट्यछटा करायचो. त्यामुळे जमून जाईल असा विश्वास होता. मग दुसऱ्या अन् तिसऱ्या दिवशी मी आधी पाठांतर केलं. ज्या आवाजात संवाद म्हणायचे होते तशाच प्रकारे मी पाठ करताना वाचत होतो. थीम ही मजेदार होती. त्यामुळे मला पकड घ्यायला

a

वेळ लागला नाही. थोडक्यात थीम अशी होती की ‘ तो मध्यम वर्गीय गृहस्थ आपल्या बायकोच्या दागिन्यांचा विमा करून घेतो. दुकानावर परत विकण्यापेक्षा दागिन्यांच्या विम्याचे पैसे आपल्याला जास्त मिळतिल असं तो आपल्या बायकोला पटवून देतो. मग विमा काढल्यावर ते दागिन्यांचा डबा कापडात बांधून कपाटात न ठेवता, बैठकीच्या खोलीतल्या उघड्या फडताळात ठेवतात. म्हणजे तो चोरांना सहज सापडेल अशा रिती नं. अन् मग रोज रात्री ते देवाची प्रार्थना करतात की ‘ देवा चोर येऊ दे. अन त्याला हे दागिने चोरून घेऊन जाऊ दे.’ अन् मग एक दिवस खरंच दोन चोर येतात. ह्यांना ते कपाटाच्या च्याब्या मागतात. मग हे दोघं चोरांना गाईड करतात. चोरांना डबा मिळाल्यावर हे त्यांची विनवणी करतात की ‘दागिने खरे आहेत. तुम्ही घेऊन जा चोर दादा.’ मग त्या चोरांची खात्री होते की हे दागिने नकली असावेत. म्हणूच हे नवरा-बायको ते आपल्याला सहज घेऊन जायला सांगताहेत . चोर म्हणतात ‘ तुम्ही आम्हाला बनवता काय? आम्हाला नको हे दागिने.’ एवढ्या रात्री ह्यांचे मोठमोठ्या नी चाललेलं बोलणं ऐकून गस्त घालणारा हवालदार ही तेथे येतो. अन् आणखीच मजा होते. ‘ अशी ही थीम.

मग मी दोन दिवसांनी संध्याकाळी आमच्या रूम मध्येच चार-पाच मित्रांसमोर प्रॅक्टिस करायला लागलो. चार पाच दिवसात माझं एकपात्री चांगलं व्हयायला लागलं. आमच्या ग्रुपला खूप आवडायला लागलं. स्नेहसम्मेलन आता चार-पाच दिवसांवर आलं तसे सर्व जण म्हणाले ‘ आज नाटकाच्या प्रभारी प्राध्यापकांना सांगून त्यांच्या कडून तुझ्यासाठी अर्धा तास

मागून घेऊ. मग त्याच दिवशी आम्ही सरांना भेटलो. मी म्हणालो ‘ सर मी एक अर्ध्या तासाचं एकपात्री बसवलं आहे. वसंत सबनीसांच विनोदी आहे सर. चांगलं बसलं आहे. तुम्ही बघा सर. अन् नाटकाच्या दिवशी मला तीन अंकी नाटकाच्या आधी किंवा नंतर अर्धा तास द्या सर.’ सर म्हणाले ‘ जाजू मी ते पाहायची काही आवश्यकता नाही. तू चांगलंच करशील. पण तीन अंकी च्या आधी तर आम्ही तुला वेळ देऊच शकत नाही. कारण आमचा सेट लागलेला असेल. अन तो आम्ही नाटक सुरू होण्याआधी उघडा करणार नाही. नंतर म्हणशील तर नाटकानंतर 15-20 मिनिट तर आमचं स्टेजच रिकामं होणार नाही. रात्र झालेली असेल. कोणीही तुझ्या एकपात्री साठी थांबणार नाही. अन तुझी मेहनत वाया जाईल. त्यापेक्षा तू स्टुडंट्स नाईट मध्ये कर. प्रा.ताम्हणकर इनचार्ज आहेत. त्यांच्या कडून अर्धा तास मागून घे.’ देशपांडे सरांनी बरोबरच सांगीतलं . प्रा.ताम्हणकर सिव्हिल डिपार्टमेंट चे होते. आमचा त्यांचा विशेष परिचयही नव्हता. पण आम्ही तीन चारजण त्यांच्याकडे गेलो अन त्यांना सर्व सांगून विनंती केली. ते म्हणाले ‘ मुळीच नाही. आमचा सर्व कार्यक्रम पॅक आहे. तुम्हाला द्यायला माझ्या जवळ वेळ नाही. अन असं एलेवंथ आवरला यायचं का ? आधी आले असता तर विचार करता आला असता.’ त्यांचाही बरोबर होतं. आम्ही आधी न सांगता ओव्हर कॉन्फिडन्सनं जास्तच शहाणपणा करून बसलो होतो. पण आता काहीतरी मार्ग काढणं आवश्यक होतं. मग आमच्या पैकी एकजण म्हणाला ‘आपण असं कारू, स्नेहसम्मेलनाच्या प्रभारी प्राध्यापकांनाच भेटू. केमिस्ट्री डिपार्टमेंट चे हेड, बक्षी सर इनचार्ज आहेत. ते

a

फार चांगले आहेत. ते नक्की आपल्याला मदत करतील. आम्ही सर्व म्हणालो, चलो. बक्षी सरांना सांगितलं की आम्ही सर्व फायनल चे विद्यार्थी आहोत. हे आमचं शेवटचं गॅद्रिंग आहे॰ ते म्हणाले 'बोला. कशाला आलात तुम्ही?' मग त्यांना पहिल्यापासून सर्व सांगीतलं. म्हटलं, ' सर, मी आधी तुमची किंवा नाटकाच्या सरांची परवानगी घेतली नाही , हे माझं चुकलं सर. पण मी ठरवलं होतं की आपलं एकपात्री चांगलं बसलं तरच आपण सरांना भेटू. सर मी मेहनतीनी चांगलं बसवलं आहे. अर्ध्या तासाचंच आहे. मी तुम्हाला करून दाखवतो सर. तुम्हाला आवडलं तर मला कोणत्याही दिवशी अर्धा तास द्या. ' बक्षी सर म्हणाले ' मी तुझी मागची नाटकं पाहीली आहेत. तू चांगलं करशील हे मला माहित आहे. पण आता वेळेवर, अन् सर्व कार्यक्रम फिक्स झाल्यानंतर तुला कुठून वेळ द्यायचा? बरं, एक करूया. परवा रात्री तिन अंकी नाटकाची रंगीत तालीम आहे. मी प्राचार्य नगरकर सरांना अन् सर्व विभाग प्रमुखांना रंगीत तालीम पाहायला बोलावलं आहे. त्या दिवशी नाटकाची तालीम संपल्यानंतर तू तुझं एकपात्री करून दाखव . सर्वांना आवडलं, तर मी तुला कुठे तरी अॅडजस्ट करीन. मी त्या दिवशी तालमी नंतर सर्वांना अर्धा तास थांबण्याची विनंती करीन.' मी म्हटलं थँक यू सर. मी परवा तय्यार राहीन.' आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. आम्ही होस्टेल वर आल्यावर सर्व जण मला म्हणाले ' नान्या, अब एकदम अच्छा करना यार. अब अपनी ईज्जत का सवाल है. '

रंगीत तालमी च्या दिवशी आम्ही आमचे कपडे, थोडी लागणारी प्रॉपर्टि थोडा मेकअप वगैरे घेऊन कॉलेज मध्ये स्टेज जवळ गेलो. आमचा सर्व ग्रुप होताच. आधी 'मुंबईच्या माणसाची ' रंगीत तालीम झाली. आमचे प्राचार्य अन् सर्व विभाग प्रमुख होतेच. नाटकाचा दुसरा अंक संपला तेव्हाच बक्षी सरांनी माझ्या विषयी सांगून शेवटी अर्धा तास थांबण्याची विनती केली होती. त्यांची तालीम संपल्याबरोबर आम्ही स्टेजवर गेलो. पाच मिनिटात सेटवर प्रॉपर्टि लावली. तीन मिनिटात देशपांडेनं थीमची पार्श्वभूमी व पात्रांबद्दल सांगीतलं अन् लगेच मी सुरू केलं. बरोबर तिस बत्तीस मिनिटात माझं संपलं. मी वाकून सर्वांना नमस्कार करून उभा राहीलो. सर्वांनी कडाडून टाळ्या वाजवल्या. तसेच आमचे प्राचार्य उभे राहिले अन् म्हणाले ' बक्षी, कोण हो हा मुलगा? त्याला जरा खाली बोलवा. ' बक्षी सरांनी इशाऱ्यानेचं मला खाली बोलावलं अन् प्राचार्यांना माझं नाव अन् वर्ग सांगीतला. मी त्यांच्या पाया पडलो. ते बक्षी सरांना म्हणाले, ' खूप छान केलं हो ह्यानं. बक्षी, असं करा, परवा आपल्या उद्घाटनाला रणजीत देसाई प्रमुख पाहुणे आहेत. सहा वाजता उद्घाटनाच्या कार्यक्रमाला सुरवात होईल. तो दिड एक तास चालेल. नंतर आपण त्यांना होस्टेल च्या मेस मध्येच जेवायला घेऊन जाणार आहोत॰ तुम्ही उद्घाटनाचा कार्यक्रम आटोपल्या बरोबर प्रमुख पाहुण्यासमोरच ह्या मुलाचं हे एकपात्री ठेवा. मी त्यांना तशी विनंती करीन. अन ह्याचं संपलं की आपण त्यांना जेवायला घेऊन जाऊ. ठीक? ' बक्षी सर म्हणाले ' ठीक आहे सर.' मग मला म्हणाले ' आता परवा एकदम चांगलं कर ' मी परत त्या दोघांच्याही

पाया पडलो. होस्टेल वर आम्ही सर्व जण नाचतच आलो. स्टुड्ंट्स नाइटमध्ये ही अर्धा तास न मिळणाऱ्या मला आता चीफ गेस्ट समोर करायला मिळणार म्हणून सर्वांना खूप आनंद झाला होता.

गॅद्रिंगच्या दिवशी उद्घाटनाच्या कार्यक्रमाला जातानाच आम्ही सर्व तयारीनिशी गेलो. आमचं सर्व सामान आम्ही स्टेजच्या बाजूला असलेल्या रूम मध्ये ठेवलं. आधी स्वागत झालं त्या वेळीच ॲन्करनं, प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर माझं एकपात्री होईल हे अनाऊंस केलं. नंतर सचिवाचं अहवाल वाचन, प्राचार्यांचं स्वागतपर भाषण झालं . नंतर रणजीत देसाई हयांचं भाषण सुरू झालं. ते संपल्यावर आभार प्रदर्शन सुरू झाल्याबरोबर आम्ही विंगेत जाऊन उभे राहलो. ते सर्व जसे स्टेज वरून उतरले तसे आम्ही पडदा पाडला अन् अवघ्या पाच मिनिटात त्या गृहस्थाच्या बैठकीत जे समान असावं ते लावलं. देशपांडे पडद्यासमोर गेला. त्यानं ‘ वसंत सबनीस लिखित, विनोदी एकांकिका ‘ चोर आलेच पाहिजे ‘ ही आता आमचे मित्र बंकट जाजू ,एकपात्री म्हणून सादर करतील. ह्या एक अंकी मध्ये पाच पात्र आहेत ती पाचही पात्र जाजू करतील. फक्त अर्ध्या तासाचा हा एकपात्री प्रयोग तुम्हाला आवडेल हा मला विश्वास आहे.’ असं सांगीतलं. तो आत आला. मी रंग देवतेला अभिवादन केलं. अन् पडदा वर गेला. मी पहिल्या दोन-तीन डायलॉग मध्येच पकड घेतली. अन ईश्वर कृपेनं पुढे पुढे ते रंगत गेलं. बरोबर बत्तीस मिनिटात मी संपवलं अन वाकून सर्वांना नमस्कार केला. कडाडून टाळ्या वाजल्या. प्रमुख पाहुण्यांनी हाताच्या इशाऱ्यानीच मला खाली बोलावलं. माझं अभिनंदन

करून म्हणाले 'खूप छान केलंसं तू.' मग त्यांनी आपली ब्रीफकेस उघडून तिच्यातून एक पुस्तक काढलं. अन् ते मला बक्षीस म्हणून दिलं. मी त्यांच्या पाया पडलो. आमच्या प्राचार्यांनीही माझ्या पाठीवर थाप मारली. नंतर प्रमुख पाहुणे, नगरकर सर अन् सर्व विभाग प्रमुख होस्टेल ला जेवायला गेले. आम्हा होस्टेल अन इतर सर्व मित्र मंडळीचा मग तास-दिड तास जल्लोष सुरू होता. त्यानंतर पाहुणे मंडळी होस्टेल हून परतल्या नंतर आम्ही सर्व जेवायला गेलो. त्या रात्री बारा-एक वाजेपर्यंत आमच्या गप्पा, गोंधळ चालूच होता. दुसऱ्या दिवशी तीन अंकी नाटक होतं. त्या दिवशी आम्ही तीन-चार मित्रांनी बक्षी सरांना भेटून त्यांचे आभार मानले. ते म्हणाले ' आमच्या प्राध्यापक मंडळीलाही तुझं एकपात्री खूप आवडलं.' ह्या आठ-दहा दिवसात माझा अभ्यास बुडाला. पण अजूनही मला ते सगळं आठवलं, माझ्या हॉस्टेलच्या मित्रांनी मला दिलेली साथ, त्यांचं प्रोत्साहन अन् आनंद आठवला की , त्या आठवणी मध्ये मी हरवून जातो.

हॉस्टलचे आम्ही सर्व मग फायनल च्या अभ्यासाला लागलो. बहुतेकांना पुढे नोकरीच करायची होती. नाही म्हणायला आमच्या वर्गातले देशपांडे, दत्ता लिमये, उकडगावकर, दूसरा बाहेर राहणारा देशपांडे, अन ईलेक्ट्रिकल मधला महाशूर हे पुढे एम.टेक.च्या अभ्यासाला जाणार होते. त्यांची तशी जोमानं तयारीही सुरू होती. फायनल ची परीक्षा होण्यापूर्वी आम्ही ग्रुपच्या दहा बारा जणांनी गावात प्रसिद्ध असलेल्या मेहमूद फोटो स्टुडिओत जाऊन छान ग्रुप फोटो काढला. त्याला , ' Departing for Better ' असं

a

नावही दिलं। परीक्षा संपली त्या दिवशी आम्ही चक्क दोन किलो पोहे, कांदे, कैऱ्या, हिरव्या मिरच्या, शेंगदाणा तेल, उस्मानपूऱ्यातून घेऊन आलो. हॉस्टेल मध्ये आमच्या मजल्यावर व्हरांड्यात रद्दी पेपरांवर कच्चा चिवडा केला. अन् सर्वांनी मिळून खाल्ला. संध्याकाळी, मला आठवतं, ' गंगा की लहरे ' हा सिनेमा पाहायला गेलो. दुसऱ्या दिवसापासून आपापल्या गावाला जाण्याची तयारी सुरू होणार म्हणून, सिनेमाहून आल्यावरही रात्री एक-दोन वाजेपर्यंत गप्पा करत बसलो। दुसऱ्या अन् तिसऱ्या दिवशी आम्ही आपापल्या गावी परत निघालो. अनंत आठवणी बरोबर घेऊन. मला आठवतं, 9 जून 1966 ल आमचा निकाल लागला. सर्वच जण चांगल्या प्रकारे पास झालो. निकालानंतर मार्क लिस्ट, टी. सी. घ्यायला जेव्हा कॉलेज ला आलो तेव्हा काही जण भेटले. नंतर मात्र इकडे तिकडे पांगलो. पण आम्ही कायम संपर्कात होतो अन् बहुतेक जण अजूनही संपर्कात आहोत. आम्हा सर्वांना सेवा निवृत्त होवून आता 20-21 वर्ष झालीत. आमच्या पैकी महाशूर, शेंडे, देशपांडे, मयानी हे नेल्को, टाटा मोटर्स, इंजिनीअर्स इंडिया लिमिटेड, एल.अँड टी. मधून उच्च पदावरून रिटायर झाले. व्यास, गोरडे, वसतकार, मदन चौधरी, खालसा, गुलाब शाह, सबनीस (पहेलवान) हे पी. ड्ल्यु. डी., इरिगेशन, बी.अँड सी. मधून, सुपरिनटेंडेंट , एक्झिक्युटीव इंजिनीअर्स म्हणून रिटायर झाले. मी आणि हिवसे एड्यूकेशन मध्ये येऊन, हिवसे शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथून प्राध्यापक म्हणून तर मी आमच्याच कॉलेजचा म्हणजे शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद चा प्राचार्य म्हणून निवृत्त झालो. ह्या

a

दरम्यान आम्ही बरेच जण बऱ्याच वेळा एकमेकांना भेटलो. भेटलो की आम्हाला खूप आनंद व्हायचा अन् आताही होतो. एक मजेदार भेट आठवते. मी 2000ला औरंगाबादला प्राचार्य असतांना, एक दिवस माझ्या चपराशानं माझ्या चेंबर मध्ये येऊन मला एक व्हीजिटिंग स्लिप दिली. म्हणाला, हे गृहस्थ तुम्हाला भेटायचं म्हणतात. मी नाव वाचलं ‘ व्ही.जी.सबनीस ‘ म्हणजे आमचा पहिलवान. मी चपराशाला म्हणालो. अरे बोलाव त्यांना. आम्ही कॉलेज सोडल्या नंतर आज प्रथमच भेटत होतो. सबनीस आत आला, तसं मी उठून समोर गेलो. गळा भेटलो. म्हटलं, ’ पहिलवान, 32 साल बाद ? कुठे असतोस आता? ‘तो म्हणाला यार, ह्याच वर्षी एक्झिक्युटिव इंजीनियर म्हणून रिटायर झालो. आता नाशिकला राहतो.’ मग इकडच्या तिकडच्या गप्पा, सर्वांच्या आठवणी झाल्या नंतर मी म्हणालो, ‘ आज कॉलेज मध्ये असा कसा आला तू? ‘ तो हसत हसत म्हणाला ‘ माझं टी.सी. घ्यायला आलो. आधी सरळ तुमच्या विद्यार्थी विभागात गेलो. अन त्यांना माझे डिटेल्स दिले. ते म्हणाले साहेब इतक जून रेकॉर्ड मिळण कठीण आहे. मग मी तुमच्या रजिस्ट्रारला भेटायला आलो तर बाजूच्या ऑफिसवर पाटी वाचली ‘डॉ. बी.एन.जाजू प्राचार्य ‘ मला वाटलं, हा तर आपला जाजूच दिसतो. मग तुला आत चिठ्ठी पाठवली. ‘ मी म्हटलं, ‘ पहिलवान तू आता रिटायर झाल्यावर टी.सी. घ्यायला आला? इतके वर्ष नेलंच नव्हतं? अन आता काय काम आहे तुला टी.सी.चं?’ तो हसत हसत म्हणाला, ‘ मी आता LLB ला पुणे विद्यापीठात ॲडमिशन घेतली आहे. अन त्यांना मायग्रेशन साठी माझं टी.सी.

a

पाहिजे.’ मी म्हटलं ‘ तू आता एलएलबी करणार? अन कशासाठी? ‘ तो म्हणाला’ यार बैठे बैठे क्या करेंगे ? सोचा,चलो एलएलबी करते है. जीये बचे तों प्रॅक्टिस भी करूंगा.’ मी म्हटलं ग्रेट. मग मी आमच्या विद्यार्थी विभागाच्या क्लार्कला बोलाऊन सांगीतलं, जुन्या रेकॉर्ड रूम मधून आमच्या बॅच चं रेकॉर्ड शोध. अन हयांचं टि.सी. तयार करून आण माझ्या सहीला. त्यानं तासभरात ते आणलं. तोंपर्यन्त मी त्याला कॉलेज चा सर्व विस्तार दाखवून आणला. आमच्या वेळी फक्त तीन विभाग होते. सिव्हिल, मेकॅनिकल, व इलेक्ट्रिकल. आता सात झाले होते. त्यामुळे प्रयोग शाळा, क्लास-रूम्स कम्प्युटर सेंटर, अशा अनेक इमारती झाल्या होत्या. ते सगळं पाहून त्याला मजा वाटत होती. मग पुन्हा एकदा सर्व मित्रांच्या आठवणींना उजाळा दिला. माझ्याजवळ ज्यांचे ज्यांचे फोन नंबर होते त्यांच्याशी आम्ही बोललोही. जवळ जवळ दोन तास सबनीस माझ्या बरोबर होता. असे हे हॉस्टेलच्या मित्रांचे बंध。




# टिस्कोज हॉस्टेल जमशेडपूर

एक जुलै 1966 ला मी अमरावतीच्या शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झालो. 1970 पासून कराडला असलेल्या टिचर्स ट्रेनिंग कॉलेजनं महाराष्ट्रातल्या चारही शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयातील (पुणे, औरंगाबाद, कराड,आणि

अमरावती)प्राध्यापकांना उन्हाळ्यात 3 महिने (एप्रिल,मे,जून) प्रॅक्टिकल ट्रेनिंग साठी, वेगवेगळ्या कारखान्यात पाठवायला सुरवात केली. हे सर्वांसाठी अनिवार्य नव्हतं. ज्यांना जायचं असेल त्यांना कराडच्या टी.टी.सी.ला अर्ज करावा लागायचा। मग ते भारतातल्या वेगवेगळ्या कारखान्यांशी संपर्क साधून ट्रेनिंग साठी प्लेसमेंट मिळवायचे आणि संबंधित प्राध्यापकाची ट्रेनिंगला जाण्यासाठी ऑर्डर काढायचे. प्रत्येकाला तिनशे रुपये प्रतिमहा भत्ता अन जाण्यायेण्याचा खर्च मिळायचा. ट्रेनिंगवर रुजू झाल्या दिवसापासून दर पंधरा दिवसाला , त्या 15 दिवसात झालेल्या ट्रेनिंग चा 10-15 पानी अहवाल कराडला पाठवावा लागायचा. 1972 च्या उन्हाळ्यासाठी मी ही अर्ज केला. अन मार्च 1972 च्या पहिल्या आठवड्यातच कराडहून, मी एक एप्रिलला जमशेडपूर (टाटा नगर) ला टाटा आयर्न अँड स्टील कंपनीत रूजू व्हावं अशी ऑर्डर आली. मी डोक्यावर हात मारून घेतला. कारण इतक्या दूर अन उष्ण भागात मला जायचं नव्हतं. मला वाटलं जवळपास कुठं मुंबई-पुण्याला आलं तर जाऊ. मग मी आमच्या प्राचार्यांकडे जाऊन त्यांना हे रद्द करण्याची विनंती केली. ते म्हणाले आता ते शक्य नाही. तुम्हाला जावंच लागेल. मग मी ३० मार्चचं बॉम्बे-हावरा एक्सप्रेसचं टाटानगरचं रिजर्वेशन केलं. बरोबर २४ तासांचा तो प्रवास होता.

जायच्या तीन-चार दिवसांपूर्वी पासूनच माझ्या बायकोने माझी जायची तयारी सुरू केली. तिलाही प्रेग्नन्सीचा तिसरा महिना सुरू होता. पुढचे तीन महीने तिला एकटीला काढायचे होते. ती ही काळजी मला होतीच. ती

a

म्हणाली 'मी महिना दीड महिना माहेरी जाऊन येईन. 15-20 दिवस आपल्या खेड्यावर जाईन. 15-20 दिवस माझ्या बहिणीकडे. असे निघून जातील दिवस० तुम्ही काळजी करू नका. ' माझे कपडे थोडा चिवडा, फराळाचं, बाकी सामान टाकून तिनं सुटकेस व एक बॅग भरुन ठेवली. मी बरोबर 30 मार्चला सकाळी 11 वाजता ट्रेन मध्ये बसलो. दुसऱ्या दिवशी सकाळी 11 वाजेच्या दरम्यान टाटानगरला पोहचलो. तिथे मला जे.टी.आय. म्हणजे जमशेडपूर ट्रेनिंग इंस्टीट्यूट ला जायचं होतं. स्टेशन वरूनच एक सायकल रिक्शा केला. त्याला कुठे जायचं ते सांगीतलं. जे.टी.आय. फार मोठं होतं, अन् तिथे सर्वांना माहीत होतं. तिथे पोहचल्यावर मी त्यांच्या ऑफिस मध्ये गेलो. त्यांना माझी ऑर्डर दाखवली. त्यांनी मला आर.आर.पी. सिंग ह्या ट्रेनिंग ऑफिसर कडे पाठवलं. मी त्यांच्या कडे गेलो. माझं पत्र पाहून त्यांनी त्यांच्या रजिस्टर मध्ये माझे सर्व डीटेलस लिहले. माझ्या सह्या वगैरे घेतल्या. मला माझं ट्रेनिंग शेड्यूल दिलं. रोजची वेळ समजावून सांगितली. रोज सकाळी आठ वाजेच्या आधी फॅक्टरीत पोहचून तिथल्या ट्रेनिंग ऑफिस मध्ये रजिस्टरवर सही झालीच पाहिजे, हे बजावून सांगीतलं. ते झाल्यानंतर शेड्यूल मध्ये दिलेल्या शॉप मध्ये जायचं. म्हणजे फौंड्रि शॉप, स्मिथी शॉप, मशीन शॉप, रोलिंग मिल. शिट मेटल शॉप ई. मध्ये जायचं. दुपारी एक ते दोन लंच ब्रेक. परत दुपारी दोन ते पाच शॉप मध्ये. जातानाही रजिस्टर मध्ये सही करायची हेही सांगीतलं. मग ते मला म्हणाले ' इथून थोड्या अंतरावर, इनर सर्कल रोड वर आमचं एम्प्लोयीज अँड ट्रेनिंग होस्टेल आहे. तिथे तिसऱ्या मजल्यावर 75 नंबर ची

रूम तुम्हाला देण्यात आली आहे. तिथे खालीच होस्टेल वार्डनचं क्वार्टर आहे. त्यांच्या कडून रूमची चाबी मिळेल. माझा हा फॉर्म त्यांना दाखवा. हॉस्टेल मध्ये मेस आहे. मेस सेक्रेटरीला भेटा. तो सर्व सांगेल. तिथे होस्टेल् क्लर्क ही आहे. तो तुम्हाला गाइड करेल. इथून फाटकाच्या बाहेरून सायकल रिक्शा मिळेल. नाही मिळाला तर पायी जाऊ शकता. एक किलो मीटर आहे फक्त. मग मी बाहेर येऊन रिक्षा केला. व अगदी पाच मिनिटात होस्टेल ला पोहचलो.

खालीच वार्डनचं क्वार्टर होतं व तिथेच उजव्या बाजूला ऑफिस होतं. मी तिथे वार्डनना भेटून त्यांना सिंग सरांनी दिलेला फॉर्म दाखवला. माझ्या सुदैवानं ते महाराष्ट्रीय होते. त्यांचं नाव दाते होतं॰ मी अमरावतीहून आलो हे कळल्यानंतर ते माझ्याशी मराठीच बोलायला लागले. पर प्रांतात आपली भाषा बोलणारा भेटला की किती आनंद होतो. त्यांनी सांगीतलं एक माणूस बरोबर देतो. तो रूम उघडून तुम्हाला साफसफाई करून देईल. तशी रूम साफच आहे. मग मी त्या माणसाबरोबर तिसऱ्या मजल्यावर गेलो. त्यानं रूम नंबर 75 उघडून मला साफसफाई करून दिली पाण्याचा ग्लास, पाण्याचा जग सर्व धुवून आणलं. त्याला मी हिंदीतच विचारलं ‘ यहासे फॅक्टरी कितनी दूर है ? और वहा कल कैसे जाकते है? '

तो म्हणाला ' साब फॅक्टरी दो-ढाई किलो मीटर है. वैसे तो सायकल रिक्षासे जा सकते है. लेकिन रोज रिक्षासे जाना आना बहूत महेंगा पडेगा साब. यहा बाजूमे बस्ती है. वहा सायकल की दुकाने है. वो लोग 25 रुपये महिनेके

किराये पर सायकल देते है. सायकल अपने पासही नीचे हॉस्टेल मे रख सकते है. नीचे 25 नंबर रूम मे कुछ ट्रेनिंग वाले है. आप ऊनको पुछ सकते है. ठीक है साब. कुछ काम हो तो बुला लेना.' तो गेला तेव्हा दुपारचे तीन वाजत आले होते. मी दहा वाजता ट्रेन मध्ये नाश्ता केला होता. पण आता भूक लागली होती. बायकोनं दिलेल्या दशम्या होत्याच. आधी त्या खाल्ल्या. मग थोडा वेळ आडवा झालो. पाच वाजेच्या दरम्यान उठून हात तोंड धुतलं. आमच्या व्हरांड्याच्या टोकाला, माझ्या चार रूम नंतर मोठा बाथरूम ब्लॉक होता. तीन बाथरूम, दोन बेसीन आणि तीन संडास होते. चांगला वेल मेंटेण्ड ब्लॉक होता. माझी रूम सिंगल सिटर, चांगली मोकळी होती.

पाच साडे पाचला खालच्या मजल्यावर रूम नंबर 25 मध्ये गेलो. ती थ्री सिटर रूम होती. त्या रूम मध्ये दिल्ली इंजीनियरिंग कॉलेज चे फायनल यिअरचे तीन विद्यार्थी राहत होते. ते ही एक महिन्यापूर्वी ट्रेनिंग साठीच आले होते. त्यांचे आणखी दोन महीने राहिले होते. खरे, शिशू आणि मेहरा अशी त्यांची नावं होती. मी त्यांना माझा परिचय करून दिला. उद्या पासून ट्रेनिंग ला सुरवात होईल असं त्यांना सांगीतलं. अन मग त्यांना मेस बद्दल व सायकल बद्दल विचारलं० मी इंजीनियरिंग कॉलेज मध्ये प्राध्यापक आहे हे कळल्यावर ते माझ्याशी आदरानं बोलू लागले. ते मला प्रोफेसर म्हणूनच संबोधू लागले. ते म्हणाले " कुछ चिंता मत करो प्रोफेसर। अभी हम बाजूवाले बस्तीमे जा ही रहे है। वहा जाकर आपको पहले साइकल दिलवा देते है० वहा तिन महीनेका किराया याने 75 रुपये ऍडव्हांस मे देने पड़ेंगे। फिर वह साइकल 3 महीने अपने

a

पासही रहेंगी। और आनेके बाद हमारे मेस सेक्रेटरी को भी ऍडव्हान्स दे देंगे। सो आप आजसेही मेस जॉइन कर सकते है। सुबह सात बजेसेही मेस मे चाय-नाश्ता शुरू होजाता है. यहासे फ़ैक्टरी जानेको साइकल से 10-12 मिनिट लगते है। सो यू कॅन स्टार्ट एट 7.45 इव्हन। तो चलो चलते है। “ आम्ही मग बाजूच्या वस्तीत साइकलवाल्या कड़े गेलो. त्याने माझे सर्व डीटेलस त्याच्या रजिस्टर मध्ये लिहून घेतले. ऍडव्हान्स घेऊन रितसर पवती दिली. मग मला अगदि नविन वाटावी अशी साइकल दिली. त्याच्या बाजूच्या दुकानतून मी थोडं जुजबी सामान घेतलं. आम्ही हॉस्टेल ला परत येऊन सरळ मेस सेक्रेटरी च्या रूम मध्ये गेलो. त्यांनी माझे डीटेलस लिहून अॅडव्हान्स घेतला. त्या रात्री मेस मध्ये आणखी काही जणांच्या ओळखी झाल्या. जास्तीत जास्त लोक पंजाब, हरयाणा, दिल्ली, यू.पी. असे हिन्दी भाषिक होते. काही बिहार-बंगाल चे ही होते त्यांचा वेगळा ग्रुप होता. पण एकंदरीत वातावरण चांगलं वाटलं मला. जेवण करून रूम वर आलो अन् लवकरच झोपलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठलो. आंघोळ करून तयार होऊनच 7.15 ला मेस मध्ये गेलो. माझ्या आधी बरेच जण आलेले होते. चहा नाश्ता झाला. काल रात्री मेस मध्ये हरयाणाचा एक रामप्रसाद म्हणून टाटाचा एम्प्लोयी होता त्याचा परिचय झाला होता. तो ही चहा घेत होता. मला म्हणाला ‘ कैसे जा रहे हो फॅक्टरी? सायकल से ही ना?’ मी हो म्हणल्यावर तो म्हणाला ‘ मै भी सायकल से ही जाता हू. चलो मेरे साथ. अंदर तुमको जिस सेक्शन मे जाणा है वहा छोड दुंगा.’ मी मग त्याच्या बरोबरच गेलो. त्यानं

सांगीतलं हे पहिलं गेट आहे आत जायचं. अर्धाएक किलोमीटर पुढे गेलं की असंच एक मोठं एंट्री गेट आहे. त्याला बिश्टुपूर गेट म्हणतात. ह्या सगळ्या भागाला बिश्टुपूर असं म्हणतात. त्याच्या खूप पुढे, रेल्वे स्टेशन कडे जो भाग आहे त्याला जुगसलाई असं नाव आहे. अन मागे डाव्या बाजूला जो भाग आहे ते खरं जुनं-ओल्ड जमशेडपूर आहे. त्याचं नाव साक्षी असं आहे, पण त्याला ही सर्व बिहारी मंडळी साक्ची असं म्हणतात. आम्ही मग सेक्युरिटीला ओळख पत्र दाखवून आत गेलो. तिथून तो मला आतल्या ट्रेनिंग ऑफिसमध्ये घेऊन गेला. मला म्हणाला रोज आधी इथे येऊन रजिस्टर मध्ये आपल्या नावासमोर सही करायची. आज रजिस्टर मध्ये आपलं नाव एंटर करून घ्या. आल्याची वेळ टाकायची. परत जाताना ह्याच रजिस्टर मध्ये जाण्याची वेळ टाकून सही करायची. फक्त रविवारला सुटी असते. एक वाजता लंचला जाताना किंवा लुंचहून आल्यावर दोन वाजता सही करायची गरज नाही. मी त्याला थॅंक यू व्हेरी मच असं म्हणालो. तो म्हणाला ‘ इथल्या फॉरमॅलिटीज संपल्या की त्यांनाच फौंडरी सेक्शनला ला कसं जायचं ते विचारून घ्या.’ मी आत जाऊन ट्रेनिंग ऑफिसर ला भेटलो. त्यांनी माझे सर्व कागद पाहीले. माझं नाव रजिस्टर मध्ये लिहलं० थोडावेळ बसऊन ट्रेनिंग च्या पद्धती बद्दल सर्व सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितलं की ‘ तीन महिन्यात तुम्हाला फौंडरी, फोर्जिंग, शीट मेटल, रोलिंग मिल,लाइट अँड मीडियम स्ट्रक्चर मिल अन मशीन शॉप अशा सहा विभागात दोन दोन आठवडे जावं लागेल. प्रत्येक विभागातल्या फोरमन ला पहिल्या दिवशी रीपोर्ट करायचा व तिथल्या रजिस्टर

मध्येही रोज सही करायची. पहिल्या दिवशी प्रत्येक विभागाचे फोरमन तुम्हाला काय काय बघायचं, कोठे कोठे जायचं ते समजावून सांगतील. रोज तुमच्याबरोबर फॅक्टरी चा कोणी माणूस फिरणार नाही. तुम्हाला स्वत:ला सर्व पाहायचं आहे. तुम्ही तिथे कोणालाही काहीही माहिती , प्रश्न विचारू शकता. आपल्या नोट्स लिहू शकता. आकृत्या काढू शकता. प्रत्येक विभागा मधलं ट्रेनिंग संपलं की पुढच्या तीन दिवसाच्या आत, तुम्ही दोन आठवडे काय पाहीलं, काय शिकलात ह्याचा 10-15 पानी रीपोर्ट तुम्हाला ह्याच ऑफिसमध्ये सबमीट करावा लागेल व त्याची एक प्रत तुमच्या कराड च्या टी.टी.सी.ला पाठवावी लागेल. परवानगी शिवाय एकही दिवस तुम्हाला गैर हजर राहता येणार नाही. ‘ त्यानंतर मला फौंडरी सेक्शन मध्ये जायचं होतं तिथं कसं जायचं हे ट्रेनिंग ऑफिस च्या क्लार्कनं सांगितलं. तेथे मला त्या सेक्शनच्या फोरमनला रीपोर्ट करायचं सांगितलं. मी फौंडरी विभागातल्या फोरमनला जाऊन भेटलो. तिथे सही केली. त्यांनी त्या विभागत काय काय करतात , काय पाहायचं, आधी कुठे जायचं, नंतर क्रमानं कुठे जायचं हे सगळं सांगितलं. मी आमच्या कॉलेज मध्ये मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेसेस 1 आणि 2 हे विषय शिकवायचो. त्यामुळे मला हे सर्व माहित होतं. मग मीच माझा प्रोग्राम आखला. त्याप्रमाणे 15 दिवसात काय काय करायचं ते ठरविलं अन त्या दिवशीच सुरवात केली. टाटा आयर्न अँड स्टील कंपनी ही इतकी प्रचंड मोठी होती की एक एक विभाग म्हणजे एक इंडस्ट्री सारखा वाटत होता. मला आठवतं, 1972 ला त्यांचे कर्मचारी आणि वेगवेगळया ठेकेदारांचे कर्मचारी

a

धरून फॅक्टरीत अडतीस हजार लोक काम करत. एकदा आत आल्यावर आपण आपली सायकल घेऊन कुठेही फीरू शकत होतो. आत थोड्या थोड्या अंतरावर टॉयलेट ब्लॉकस होते. तशाच कॅंटीन ही होत्या. इतकंचं नव्हे तर थोड्या थोड्या अंतरावर छोटे छोटे स्टॉलस होते. त्यावर बटाटेवडा – सामोसा, जलेबी चहा कॉफी सगळं अगदी सब्सीडाइज्ड रेट वर मिळायचं। अगदी 5 नया पैशात एक बटाटेवडा किंवा समोसा किंवा जलेबी अन 10 पैशात चहा कॉफी, मिळायची. एकूण सर्व चांगलं होतं. ट्रेनिंग मध्ये ही अगदी वर्गात बसून काही करायचं नव्हतं. प्रत्येक विभागात ही एकदा रीपोर्ट केल्यानंतर रोज आपल्यावर देखरेख कोणी करणार नव्हतं. सर्व आपल्याला स्वत: शिकायचं होतं. पाहण्यासारखं, शिकण्यासारखं, खूप होतं. मी ते अगदी गांभिर्यानं करायचं ठरवलं. पुढे ते मला खूप उपयोगी पडणार होतं. पहिल्या दिवशी लंच पर्यन्त हेच सर्व चाललं होतं. बरोबर एक वाजता लंचला गेलो. मेस मध्ये आधी लोक होतेच. काल ओळखीचे झालेल्या , नंदा, रामप्रसाद श्रीवास्तव, ह्या मंडळी बरोबर बसलो. थोड्या वेळानं मेस च्या नोकरानं ताट वाढून आणलं. वरण, भात, पोळी, एक भाजी, दही, लोणचं असं सर्व होतं. मी वरणात पोळी टाकली अन माझ्या लक्षात आलं की वरण मुगाचं आहे. आपल्याला तुरीच्या वरणाची सवय. मी बाजूच्या नंदाला विचारलं ‘ यहा रोज यह ही दाल देते है कया? ‘ तो हसला अन म्हणाला ‘ प्रोफेसर, देखते जाव. यहा रोज अलग अलग दाल याने सात दिन सात दाले बनती है. जैसे, मुंग, मोठ, उडद, चना, अरहर(तूर), मसूर और एकदिन मिक्स. आचार भी रोज अलग मिलेगा.’ मी

म्हणालो ‘ ठीक है. वैसे आयडिया बुरा नही ‘ मग थोडा वेळ मेस मध्येच बिहार अन बंगाल हून आलेले ट्रेनी प्राध्यापक नारायण, आणि दास ह्यांची ओळख करून घेतली व त्यांच्याच बरोबर परत फॅक्टरीत गेलो. जाताना ते म्हणाले ‘ इथे आपल्याला शिकण्यासारखं खूप आहे. हे दिल्लीचे विद्यार्थी एकदा सह्या झाल्या की चाटा मारतात. इकडे तिकडे भटकतात. संध्याकाळी आम्ही दोघं अन आणखी दोन चार जण फिरायला जात असतो. तुम्ही आमच्या बरोबर येऊ शकता. रोज बिष्टुपूर मार्केट पर्यंत चक्कर मारतो.’ मी म्हटलं, येईन आज पासून. मग आम्ही आपापल्या विभागात गेलो. त्या दिवशी अन पुढच्या ती चार दिवसात माझ्या लक्षात आल की कारखान्यात काय काय पाहायचं आहे. प्रोसेसेस बद्दल, मशीन्स बद्दल काय काय विचारायचे आहे. शॉप फ्लोर वर काम करणारे सुपरींटेनडेंट, मेकॅनिक्स हे फार चांगले होते. विचारलेली माहिती ते नीट समजावून सांगत. ऑपरेशन्स समजावून देत. त्यामुळे मलाही इंट्रेस्ट यायला लागला. मी रोज रात्री त्या त्या दिवशी आपण काय पाहीलं, शिकलो ह्याच्या नोंदी करायचो.

हॉस्टेल मध्ये मेस मुळे जवळ जवळ सर्वांच्याच ओळखी झाल्या होत्या. मग मी संध्याकाळी कधी त्या प्रोफेसर मंडळी बरोबर कधी दिल्लीच्या विद्यार्थ्यांबरोबर तर कधी माझ्या रूम च्या आजूबाजूच्या मित्रांबरोबर फिरायला तर कधी सिनेमाला जाऊ लागलो. एक दिवस संध्याकाळी नंदा, श्रीवास्तव ह्यांच्या बरोबर फिरायला चाललो होतो. आमचा इनर सर्कल रोड फार मोठा होता. आजूबाजूची वस्तीही एकदम पॉश होती. बिश्टुपूर मार्केटही

a

मोठं होतं. तिथे सर्व प्रकारची दुकानं होती. आम्ही रस्त्यानं चाललो होतो. विरुध्द्ध दिशेनं एका मोटरसायकल वर समोरून दोनजण आमच्या बाजूने गेले. नंदानं त्यांना हात वर करून हाय केलं. त्यांनी ही हाय म्हणून ते पुढे निघाले तसा मी त्या मोटरसायकल च्या मागे धावत गेलो. थोडं धावलो अन् परत आलो. नंदा मला म्हणाला ‘ क्यु क्या हुआ? ‘ मी म्हणालो ‘ यार उस मोटर सायकल पर पिछे के सीट पर एक के उपर एक दो लडके बैठे थे. ‘ ते सर्व हसायला लागले. ते म्हणाले ‘ प्रोफेसर, तुमने अभितक इसको देखा नही? अरे ओ दो लडके नही. पिछे एकही लडका बैठा था. उसका नाम प्रदीप श्रीवास्तव है. ऊसकी उचाई एशिया मे सबसे ज्यादा है. 6 फुट 11 इंच. टाटा मे ही है. उसके शूज बाटासे स्पेशल ऑर्डर देकर बनवाते है. वह अपना बास्केट बॉल प्लेयर भी है. ओ अपने हॉस्टेल पर नही रहता. किसी दिन फिर दिखा तो तुमसे मिलवायेंगे. ‘ मला नवलच वाटलं. मी मग रोज ह्या किंवा आमच्या प्रोफेसर मंडळी बरोबर फिरायला जायला लागलो. बिश्टुपूर मध्ये एक दोन सिनेमा थिएटर अन साकची मध्ये तीन चार सिनेमा थिएटर्स होते. ह्या लोकांबरोबर मी तिथे काही चित्रपटही पाहीले. मला आठवतं, ‘ नदिया के ऊसपार ‘ हा सुंदर चित्रपट मी तिथेच पाहीला. त्यात सचिन हीरो होता अन साधना सिंह नावाची नटी हिरोईन होती. त्यातली गाणी खूपच छान होती. बहुतेक चित्रपट भोजपुरी घाटातला होता. गाणी तर सर्वच गोड , भोजपूरी घाटातली होती. ह्या भोजपूरी वरुन आठवलं, आमच्या होस्टेल मध्येच खाली समोरच्या भागात एक मोठी लॉन होती. दर शनिवारी रात्री जेवणानंतर होस्टेलची बरीच मंडळी दोन-तीन

तास ह्या लॉन वर बसून गाणी म्हणायचो, नकला करायचो, आप आपल्या विभागातल्या गमती जमती सांगायचो. काही जण आपली वाद्ये , जसं ढोलक, डफ, बुलबुल तरंग ही घेऊन यायचे. त्यात एक ग्यानचंद झा म्हणून बिहारी होता. तो स्वत:चा ढोलक आणायचा. खूप छान वाजवायचा. खूप छान भोजपूरी गाणी म्हणायचा. मला त्या भोजपूरी चाली अन् शब्द खूप आवडायच्या. मी शालेय जीवना पासून हिन्दी, मराठी कविता-गाणी लिहायचो. ग्यानचंदची ती भोजपूरी गाणी ऐकून मी एक दिवस एक भोजपूरी गाण लिहलं अन शनिवारी रात्री घेऊन गेलो. माझ्या परीनं ते मी गाऊन दाखवलं. मग ग्यानचंदनं माझा कागद घेतला आणि ढोलक वाजवत ते गाण त्यानं इतकं सुरेख गायलं की आम्ही नाचायला लागलो. आता ते गाण मला संपूर्ण आठवत नाही पण दोन कडवी आठवतात. ती अशी----

" इनकी बिघड़ल है चलनिया, कैसे सुधरे, ओ इनकी बिघड़ल है चलनिया कैसे सुधरे ?

सोना भाव मे चाँदी बिकत है, चाँदी भाव मे टीनsss

रूखी सुखी खाये गरीबवा, नमक मिर्च के बिनss

तोंद बढ़ावे है लीडरवा कैसे सुधरे ? ओ इनकी बिघड़ल है चलनिया कैसे सुधरे?

गयी है धोती, गयो है कुरता, आयी तंग पतलूनsss

a

एक अचम्बा हमने देखा, लड़की जाय सलूनsss

बाल कटावे बेसरमवा, कैसे सुधरे ? ओ इनकी बिघड़ल है चलनिया कैसे सुधरे ? “

अशी सर्व गम्मत दोन तीन तास सुरू असायची. ह्या बिहारी मंडळीच्या आणखी एका गोष्टीचं मला खूप हसू यायचं. हे लोक ‘र’ ला ‘ड’ अन ‘ड’ ला ‘र’ म्हणायचे. उदाहरणार्थ- ‘ पतली है कमर भारी है घडा ‘ हे गाण म्हणताना ग्यानचंद नेहमी ‘ पतली है कमड भाडी है घरा ‘ असं म्हणायचा. किंवा ‘हजारो साल नरगिस अपनी बेनुरी पे रोती है, बड़ी मुश्किलसे होता है चमन मे दिदावर पैदा' हा शेर ‘ हजाडो साल नडगिस अपनी बेनुडी पे डोती है, बरी मुश्किल से होता है चमन् मे दिदावड पैदा ‘ असा म्हणायचा. आणि आम्हाला मग खूप हसायला यायचं. मे च्या महिन्यात तर जमशेड्पूरला तापमान 47 किंवा 47.5 डिग्री सेल्शियस असायचं. त्यामुळे आम्ही शनिवारी बारा-एक वाजे पर्यंत लॉनवरच असायचो. इतर दिवशीही रात्री गरम असल्यामुळे 11-12 वाजे पर्यंत झोपच यायची नाही. मी तर काही वेळा बेड वर पाणी शिंपायचो. दिवसाही आम्ही तीन वेळा स्नान करायचो. एकदा सकाळी, एकदा पाच वाजता फॅक्टरीतून आल्यावर अन् एकदा रात्री दहा साडेदहा ला। सर्व एम्प्लोयी अन आमच्या सारखे ट्रेनीज असल्यामुळे झगडा तंटा, बदमाशी, बनवाबनवी हे प्रकार नव्हते. तरीही काही वेळा असे थोडेफार अनुभव यायचे. एकदा मी फॅक्टरीतून पाच वाजता परत आल्यावर रोजच्या ठिकाणीच माझी सायकल

पार्क केली. खोलीवर जाऊन फ्रेश वगैरे होऊन सहा साडे सहाला बिश्टुपूरला काही सामान आणायला म्हणून जायला खाली आलो. त्या दिवशी मी सायकलनं जायचा विचार केला. म्हणून सायकल काढायला गेलो. पाहतो तर माझी सायकल जागेवर नाही. खाली सगळं सायकल स्टँड धुंडाळलं. पण सायकल कुठेच नव्हती. मी घाबरून गेलो. वाटलं, गेली चोरीला सायकल. खालच्या मजल्यावर नंदा च्या रूम वर दोन चार जण गप्पा मारत होते. तिथे जाऊन त्यांना सांगीतलं. ते म्हणाले 'चोरी-वोरी कोई नही होती यहा. कोई अपना हॉस्टेलर ही लेकर गया होगा. थोडी देरसे लाकर राख देगा। कई बार अपने कुछ ग्रेट भाई लोग तार या किले से ताला खोल लेते है. अपना काम करके आते है. और सायकल जगह पर रख देते है. घबराओ मत प्रोफेसर. एखाद घंटेसे देखना.' तरी मी हॉस्टेल क्लार्क अन वॉचमनला जाऊन सांगीतलं. तेही तसंच म्हणाले. मग मी खालीच थोडा फिरून आलो. मेस मध्ये जाऊन जेवलो. नंतर जाऊन पाहतो तर माझी सायकल परत आपल्या जागी. मग माझा जीव भांड्यात पडला. दुसऱ्या दिवसा पासून मी सायकल दुसऱ्या ठिकाणी पार्क करू लागलो.

ट्रेनिंग ला येऊन दोन महिन्याच्या वर झाले होते. मी दर पंधरा दिवसानी बरोबर 20-25 पानी रीपोर्ट ट्रेनिंग ऑफिस ला सबमीट करायचो व एक कॉपी पोस्टाने कराड टी.टी.सी.ला ही पाठवायचो. त्या सगळ्यातही माझा बराच वेळ जायचा. शिवाय दर आठवड्यात किमान एक तरी पत्र बायकोचं यायचंच. कधी कधी दोन ही. तिला सविस्तर पत्र लिहायचो. जून च्या दुसऱ्या

आठवड्यात आमच्याकडेच राहणारा कुलकर्णी म्हणून एक ट्रेनी होता तो मला म्हणाला ‘ प्रोफेसर आता आपले थोडे दिवस राहीले आहेत. चलता का? आपण दोन दिवस कलकत्त्याला जाऊ. बघून येऊ.’ मी म्हटलं आपल्याला ते सुटी देणार नाहीत. तो म्हणाला रविवारी सकाळीच जाऊ. स्टील एक्सप्रेस तीन तासात कलकत्त्याला पोहचते. सोमवारी रात्री दहा पर्यन्त परत येऊ. सोमवारची सही मंगळवार ला करू. रोज कोणी चेक करत नही.’ मी तयार झालो. येणाऱ्या रविवारी आम्ही स्टील एक्सप्रेसनं कलकत्त्याला गेलो. कुलकर्णीला बरीच माहिती होती. त्यामुळे आम्ही तिथे सर्व प्रथम वाय.एम.सी.ए. च्या होस्टेल मध्ये जाऊन राहण्याची व्यवस्था केली. दोन दिवस तिथल्या महत्त्वा च्या पाहण्यासारख्या सर्व जागी गेलो. मजा आली. सोमवारी रात्री परत जमशेडपूर ला आलो. मंगळवारी सकाळी लवकरच सर्व आटोपून फॅक्टरीत गेलो. माझ्या मनात सारखी भीती होती की काल चेकिंग झालं असेल तर मेलो. सरळ रीपोर्ट कराडला जाईल. सुदैवानं तसं काहीच झालेलं नव्हतं. कलकत्त्याहून मी बायको साठी एक साडी खरेदी केली होती. पण मी जेव्हा जेव्हा बिशतुपूरला जायचो तेव्हा तिथल्या एका मोठ्या साड्यांच्या दुकानात, शो केस मध्ये एका मोडेल/पुतळ्याला जी साडी नेसवलेली होती ती मला फार आवडली होती. मी मग एक दिवस त्या दुकानात जाऊन ती साडी विकत घेतली. ती कॅलिको मिल्स ची होती. सेल्समन म्हणाला अशाच प्रिंटची दुसऱ्या रंगाची आतून आणतो. मी म्हणालो मला हाच रंग हवा. त्यानं मग मॉडेल ची काढून मला ती पॅक करून दिली. हॉस्होलवर आलो. माझ्या शेजारच्या रूम मध्ये कानपूरचा

एक अग्रवाल मुलगा राहायचा. तो टिस्कोचा एम्प्लोयी होता. मधून मधून माझ्या रूम मध्ये यायचा. मी त्याला ती साडी दाखवली. त्याचं लग्न ठरलेलं होतं. तो म्हणाला ‘ सर, मै बस यह ही साडी अपने होनेवाले वाईफ के लीये ले जाउंगा. अगले महीने जा रहा हू.’ आमच्या प्रोफेसर नारायण नी मला गायत्री मंत्र रोज का म्हणावा अन कसा म्हणावा हे शिकवलं. तो मी आजही म्हणतो. प्रोफेसर दासनी आपण भरपूर पाणी का प्यावं हे मला पटऊन सांगीतलं. ते छोटी कळशी भरून पाणी एका वेळी प्यायचे. एकूणच ह्याही हॉस्टेल मध्ये माझा वेळ आनंदात गेला. मला बरंच शिकायला मिळालं. कास्मापोलीटन वस्तीत अन हॉस्टेल मध्ये राहायला मिळालं. तो ही एक प्रकारचा अनुभवच होता. म्हणता म्हणता ट्रेनिंग संपत आलं. 30 जून च्या संध्याकाळचं अमरावतीचं परतीचं रिजर्वेशन करून ठेवलंचं होतं. 28-29 तारखेला होस्टेल भर सगळ्या मित्रांना भेटलो. मेस मध्ये ही सर्वांशी भेटलो. फक्त तीन महिन्यांच्या त्या होस्टेल च्या वास्तव्याच्या आठवणी होत्या. त्या घेऊन 30 ला परतीला निघलो. त्या आठवणी मनाच्या एका कोपऱ्यात अजूनही शाबूत आहेत. मधूनच एखाद दिवशी त्यांची उजळणी होते. ( कॅलिको मिल्स ची ती साडी माझ्या बायकोलाही खूप आवडली. तिच्या बहिणींनी , मैत्रिणींनी ही खूप तारीफ केली होती माझ्या चॉइस ची. ते ही आठवत राहतं. )




a

a



a

आय. आय. टी. बॉम्बे, होस्टेल 1 -कॉरीडोअर, लाउंज आणि मेस



# एच-1 - आय.आय.टी. बॉम्बे

एक जुलै 1966 ला मी अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे लेक्चरर म्हणून जॉइन झालो. मी ठरवून शिक्षकी पेशा पत्करला. मला हिंदुस्तान मोटर्स कलकत्ता येथेही नोकरी मिळाली होती .पण मला शिक्षकच व्हायचं होतं. मला त्याची आवड होती. आता ह्याच पेशा त राहायचं तर पुढे शिकून एम.टेक. व नंतर पीएच.डी. ही करण आवश्यक होतं. नोकरी सोडून स्वत:च्या खर्चानं पुढे शिकायला जाणही शक्य नव्हतं. कारण तेवढी आर्थिक परिस्थिती सुद्रूढ नव्हती. सरकारनं पुढे शिकायला डेप्युटेशन वर पाठविलं तरच शक्य होतं. आय.आय.टी.त ( Quality Improvement Program ) Q.I.P. असतो. त्यात एम.टेक.ला सरकार दोन वर्षासाठी डेप्युटेशन देतं. अर्थात एम.टेक.ला ॲडमिशन आपली आपल्याला मिळवावी लागते व नंतर सरकारला विनंती करावी लागते. त्यासाठी महाराष्ट्र लोक सेवा आयोगा तर्फे अधिव्याख्याता म्हणून सिलेक्ट झालेलं असणं आवश्यक आहे. मी कॉलेज तर्फे सिलेक्ट झालो होतो. मी रूजू झाल्यानंतर तब्बल आठ वर्षानी म्हणजे 1972ला लोक सेवा आयोगाची जाहिरात आली. मी अर्ज केला. लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीत सिलेक्ट ही झालो. ऑर्डर येता येता 1973 चा मार्च महिना आला. त्यातही अमरावती ला पोस्टिंग न येता माझं पुण्याला पोस्टिंग झालं. त्यामुळे पुण्याला रुजू झालो. पुण्याला भाड्याचं घर तीन चार महिने

a

शोधलं. मला परवडेल असं घर काही मिळेना. त्या वेळी माझी पहिलीच मुलगी फक्त पाच महिन्याची होती. त्यामुळे बायको-मुलीसह पुण्याला राहणं आवश्यक होतं. शेवटी मी कंटाळून माझी अमरावतीला बदली करावी अशी आमच्या संचालकांना विनंती केली. अमरावतीहून पुण्याला जायला माझा एक मित्र साठे, तयार होता. मग आम्ही दोघांनी म्युचवल ट्रान्सफर साठी विनंती अर्ज केला. सुदैवा नं माझी परत अमरावतीला बदली झाली. येवढ्यात 1973 गेलं. मुलगी आणखी एखाद वर्षानं मोठी झाल्यावर एम.टेक.ला अर्ज करायचा असं मी ठरवलं. अन् 1975 ला बॉम्बे आय.आय.टी. ला अर्ज केला॰ त्यांनी एम.टेक. साठी घेतलेल्या मुलाखतीत मी सिलेक्ट झालो. मग मी सरकारला डेप्युटेशन साठी अर्ज केला. सुदैवा नं सरकार नं मला पाठवायचं ठरवलं॰ तब्बल नऊ वर्षाच्या गॅप नंतर मी पुन्हा दोन वर्षासाठी विद्यार्थी होणार होतो. आय.आय.टी.चा अभ्यास ही भारी. त्यांच्या कडे सेमीस्टर सिस्टीम होती. पहिल्या सेमिस्टर च्या परीक्षेत 5.5/10 असा S.P.I. (Semester Performance Index ) आलाच पाहिजे नाही तर आय.आय.टी.तून हकालपट्टी. ह्यामुळे मला पहिल्या सत्रात खूप कसून अभ्यास करावा लागणार होता. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मी बायकोला समजावून सांगीतलं की पहिल्या सत्रात मी एकटाच मुंबई ला जातो. होस्टेल मध्येच राहतो॰ पहिल्या सत्राचा परफॉर्मेंस चांगला आला अन मी एकदा तिथे रूळलो की 'मी दुसऱ्या सत्रात वन रूम किचन का होईना , आय.आय.टी.त आकोमोडेशन पाहीन अन तुम्हाला घेऊन जाईन॰ तो पर्यंत तू एकटी इथे रहा किंवा काही दिवस माहेरी,

आमच्या खेड्यावर , असे काढ.' तिला ते पटलं. मला 25 जुलै १९७५ ल जॉइन व्हायचं होतं. माझ्या सुदैवानं माझ्याच विभागातला माझा मित्र देशपांडे हा ही तिथेच पीएच.डी० साठी जाणार होता. त्यानं तीन वर्षापूर्वी तिथूनच एम.टेक.केलं होतं. त्यामुळे त्याला तिथली सर्व माहिती होती. त्याप्रमाणे आम्ही २२ जुलैचं ट्रेनचं रिजर्वेशन करून ठेवलं. देशपांडेला मॅरीड रिसर्च स्कॉलर होस्टेल मध्ये फॅमिली आकोमोडेशन मिळालं होतं. पण 22 जुलै ला जाताना तो एकटाच येणार होता. तिथे थोडी व्यवस्था करून तो दहा बारा दिवसांनी त्याच्या मिसेस अन लहान मुलीला घेऊन जाणार होता. 15-जुलै पासून आम्ही तयारीला लागलो. मला लागणारं सर्व सामान माझे कपडे काही पुस्तकं वगैरे आटोपशीर पॅक करून ठेवलं. आमचं ठरल्या प्रमाणे माझी बायको अमरावतीचं आमचं भाड्याचं घर सोडून सर्व सामान घेऊन आर्वीला तिच्या माहेरी जाणार होती. मी मुंबईला गेल्यानंतर ती आणि तिचा भाऊ हे सर्व शिफ्ट करणार होते. माझी ती एक काळजी मिटली होती.

ठरल्याप्रमाणे 22 तारखेला मी आणि देशपांडे मुंबईला नीघालो. आम्हाला ठाण्यालाच उतरायचं होतं. तसं आम्ही उतरलो. तिथून स्लो लोकलनं आम्ही विक्रोळीला गेलो. फास्ट लोकल विक्रोळीला थांबत नाही. विक्रोळी स्टेशन ला बाहेर येऊन थोडंसं टेकडं चढून गेलं की उजव्या बाजूला सिटि बस स्टॉप होता. तिथून 392 नंबरची बस मिळते. ती आय.आय.टी. च्या कॅम्पस मध्ये जाते. अन 337 नंबर ही आय.आय.टी.च्या पहिल्या गेटला ( त्याला वाय पॉइंट असं म्हणतात ), किंवा दुसऱ्या गेटला ज्याला मेन गेट

a

म्हणतात तिथे बाहेरच थांबते. आत कॅम्पस मध्ये जात नाही. ह्या दोन्हीही गेटपासून आमचं होस्टेल-1 ( एच-1 ) हे साधारणतः: दीड किलो मीटर आहे. हे सर्व मला देशपांडेनं आधीच सांगून ठेवलं होतं. पहिल्याच वेळी गेलो तेव्हा आमचं दोघांचं सामानही खूप होतं. त्यामुळे आम्ही बस च्या भानगडीत न पडता सरळ टॅक्सी केली अन देशपांडेच्या हॉस्टेल ला गेलो. त्यानं थोड्या दिवसापूर्वी येवून आधीच त्याच्या वन रूम किचन ची चाबी घेऊन ते साफ सूफ करून ठेवलं होतं. तिथे फ्रेश वगैरे होऊन मग आम्ही माझी रूम घ्यायला एच-1 हॉस्टेल ला गेलो. तिथला हॉल मॅनेजर नेरूरकर हा देशपांडेच्या ओळखीचाच निघाला. मग त्याच्याकडे जाऊन आम्ही हॉस्टेल चा अॅडवांस वगैरे भरला. मला खालच्याच मजल्यावर थर्ड विंग मध्ये 56 नंबर ची खोली मिळाली. त्यानंच आम्हाला मेस सेक्रेटरीचं नाव व रूम नंबर सांगीतला. सेकंड ईयर एम.टेक.चा सीनियर रामू अग्रवाल मेस सेक्रेटरी होता. मेस, क्लब सिस्टम ने चालायची. रामूनं मला मग मेस विषयी सर्व सांगीतलं. सकाळी चहा-नाश्ता आठ ते साडे नऊ. नंतर एक ते दोन अडीच पर्यंत लंच. संध्याकाळी पाच ते सहा टिफिन म्हणजे समोसे, वडे, पॅटीस व चहा कॉफी असं अन रात्री आठ पासून दहा पर्यंत डिनर असं त्यानं सांगीतलं. शिवाय गुरूवारी रात्री ड्राय डिनर म्हणजे पॅटीस, ब्रेड बटर चिप्स चहा कॉफी अन रविवारी दुपारी फिस्ट अन रात्री नथिंग. त्याच्याकडे मेस चा अॅडव्हान्स भरला. तो म्हणाला ‘तुम आजसेही जॉइन कर सकते हो.’ म्हटलं करूंगा ही. तो म्हणाला ‘ अंदर जातेसे ही राइट की अपनी वेज मेस है. बायी ओऱ की नोनवेज मेस है । ‘ मेस च्या उजव्या

a

बाजूला एक मोठं लाउंज(कॉमन रूम) होतं. देशपांडे आत घेऊन गेला. म्हणाला “ बघ इथे टी.व्ही., रेकॉर्ड प्लेयर, कॅसेट प्लेयर सर्व आहे. ह्यांच्याकडे रेकॉर्ड्स अन कस्सेटचं कलेक्शन फार सुंदर आहे. सर्व जुन्या सिनेमांची गाणी, गझल, भावगीत, क्लासिकल व्होकल अन इन्स्ट्रूमेंटल सर्व आहेत. इथे खूप दर्दी मंडळी असते. कधी कधी तर रात्र रात्रभर ते गाणी लावून बसतात. हे बघ, तीन चार इंग्लिश तेवढेच हिन्दी, मराठी सर्व प्रकारचे वर्तमान पत्र अन् वेगवेगळी दहा बारा मासिकं, सर्व आहे वाचायला. नेहमी तुला लाउंज मध्ये सात आठ जण बसलेले दिसतील. हो अन् ह्या पी.जी. हॉस्टेल मध्ये , बाकी तुला हळू हळू सर्व कळेलच की लाउंज मध्ये बर्मुडा , पायजामा , लुंगी, नुसतं बनियान घालून येण्यास बंदी आहे. यू.जी. हॉस्टेल मध्ये हे सर्व चालतं. ह्याच्या पुढे हॉस्टेल-2 ते हॉस्टेल-11 अशी यू.जी.हॉस्टेलस आहेत. दोन हॉस्टेल मधलं अंतर बरंच आहे. समोर जिमखाना ग्राऊंड व इनडोअर आहेत. थोडं मेन बिल्डींग कडे जाताना उजव्या बाजूला चांगला स्विमिंग पूल आहे. आणखी पुढे गेलं की डाव्या बाजूला मेन बिल्डींग, लायब्ररी, कॅंटीन कम्प्युटर सेंटर व इतर डिपार्टमेंटसं आहेत. अन उजव्या बाजूला एक मोठा, म्हणजे अठराशे लोक बसतील एवढा मोठा कॉन्व्होकेशन हॉल आहे. बाकी तुला हळू हळू सर्व कळेलच “ मला माझ्या रूम ची चाबी मिळालीच होती. आम्ही स्वीपर ला घेऊन खोली चांगली साफ करून घेतली. छान होती रूम. सिंगल सिटर. आत कॉट, टेबल खुर्ची, एक कपाट , एका भिंतीला बुक रॅक. मागच्या दाराला एक

छोटीशी बाल्कनी. मग मी देशपांडेच्या क्वार्टर ला जाऊन माझं सामान घेऊन आलो. माझ्या जवळ उद्याचा आणखी एक दिवस होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून बाथरूम ला गेलो. तिथे स्टोरेज टाइप मोठा वाटर हिटर होता. पण सकाळी आंघोळ करणाऱ्यांची गर्दी असायची .त्यामुळे आपण आंघोळीला गेलो तेव्हा गरम पाणी मिळेल की नाही ह्याची काही शाश्वती नव्हती. मी काही जणांना आपल्या खोलीतून बकेट मध्ये गरम पाणी घेऊन येतांना पाहीलं. इमर्शन हीटरनं ते रूम मध्ये गरम करून आणायचे. मला वाटलं आपणही तो विकत आणावा. त्या दिवशी काही घाई नसल्यानं सावकाश मेस मध्ये गेलो. मी मागच्या वर्षी फायनल ला ज्याला शिकवलं तो अनिल शिंदे म्हणून माझा विद्यार्थीही एम.टेक. ला आला होता. त्याच्या बरोबर नागपूरहून आलेले, संजय खेर, संतोष जैन, सुशील नायक हे ही बसलेले होते. अनिलनं त्या सर्वांशी माझी ओळख करून दिली. खूप चांगली मुलं होती ती. अनिल बरोबर ते ही मला सर म्हणू लागले. मग आम्ही चहा- नाश्ता बरोबरच केला. ते सर्व पहिल्या विंग मध्ये राहणारे. पण पहिल्याच दिवशी आमची चांगली मैत्री झाली. शेवटी वर्ग मित्रच ते. तिथून उठून लाउंज मध्ये थोडावेळ बसलो. वाचायला खूप होतं. टी. व्ही. सुरू होता. मी जीवनात पहिल्यांदाच टी.व्ही. बघत होतो. त्यामुळे मला थोडं कौतुक होतं. मग ती सर्व मुलं माझ्या खोलीवर आली. म्हणाली ‘ सर ढेकूण खूप आहेत कॉट मध्ये. आज गादी वगैरे मागच्या बाल्कनीत उन्हात टाकून द्या अन हॉल मॅनेजर कडे स्प्रे आहे तो मारून घ्या. आम्ही कालच केला हा उद्योग. ‘ मी म्हटलं मलाही

रात्री जाणवलं ते. मी आज करतोच हे सगळं. मुलं म्हणाली, ‘ वाय पॉइंट ला चांगलं मार्केट आहे. तिथं सर्व मिळतं० एक दिड किलो मीटर आहे. पण संध्याकाळी सर्वच जातात गप्पा मारत मारत. चला संध्याकाळी. ‘ मी म्हटलं ठीक आहे जाऊ. मलाही थोडं सामान आणायचं आहे. पाण्याची बकेट, मग, इमर्शन हिटर , साबण ई. काही वह्या, रजीस्टर पण०’ ते म्हणाले सर, मेन बिल्डिंग ला मोठं कोऑपरेटीव्ह स्टोअर आहे. तिथे हे सर्व स्वस्त मिळतं. तिथे हे साबण, टुथ पेस्ट, ब्रश सर्व मिळतं. तिथूनच घ्याल हे सर्व. तरीही त्या दिवशी संध्याकाळी मी, शिंदे, खेर. नायक व सर्व फिरत फिरत वाय पॉइंट ला गेलो. तिथे गेटच्या आताच डाव्या बाजूला आय.आय.टी० मधलं पोस्ट व तार ऑफिस होतं. आतच डाव्या बाजूला एक मोठं पुस्तकाचं दुकान होतं. त्यात सर्व टेक्निकल पुस्तकं मिळायची. त्याच्याच बाजूला एक मेडिकल स्टोअर होतं. आतच किराणा, भाजीची ही दुकानं होती. गेट च्या समोरच सर्व काही उपलब्ध असलेलं एक मोठं दुकान होतं. त्याचं नाव छेडा स्टोअर असं होतं. बहु अंशी हॉस्टेलर्स छेडा मधूनच सामान घ्यायचे. त्या दिवशी मी ही बकेट, मग, इमर्शन हिटर आणखी निकडीच्या वस्तु घेतल्या. रात्री मेस मध्ये आमच्या सारखेच एम.टेक. ला आलेले, पुणे, सांगली, औरंगाबाद, कराड, गुजरात, मध्यप्रदेश मधले बाकी विद्यार्थी भेटले. माझ्यासारखे डेप्युटेशन वर आलेले, एक एम.पी. व एक गुजरातचा प्राध्यापक ही भेटले. गुजरात चा तर माझ्या शेजारी 55 नंबर मध्येच होता. आमच्या थर्ड विंग मधले बहुत अंशी एम.टेक. मेकॅनिकल चे च होते. आम्ही सर्व मिळून नवीन एम.टेक.ला आलेले 35 जण

होतो. बाकी मग एम.टेक चे सर्व विभागाचे सीनियरस , सर्व विभागाचे पीएच.डी. स्कॉलरस अशी खूप मंडळी होती. जेवण झाल्यानंतर बहुदा लोक लाउंज मध्ये टी.व्ही. बघायचे, वाचायचे. कधी गाणी सुरू असायची. हळू हळू मग ते पांगायचे. पण लाउंज जवळ जवळ रात्र भर उघडंचं असायचं. मेस बंद झाल्यावर मेस मधेच एक माणूस छोटं कॅंटीन चालवायचा. त्यात चहा, कॉफी, बोर्नव्हीटा, बिस्किट, चॉकलेट सर्व मिळायचं व ते रात्री 12 वाजे पर्यन्त उघडं असायचं.

25 ला सकाळी नऊला च इंस्टिट्यूट ला जायचं होतं. ती रोजचीच वेळ होती. रिस्क नको म्हणून मी सकाळी सहा साडे सहालाच उठलो. आठ पर्यंत आंघोळ वगैरे सर्व झालं. मग ॲडमिशन कार्ड बाकी सर्व कागद पत्रांची फाईल घेऊनच मेस मध्ये ब्रेकफास्ट ला गेलो. सर्व मित्र आलेच होते. बऱ्यापैकी खायला होतं पण चहा कॉफीच्या दोन्ही पिंपातून घेऊन पाहिलं तर अगदी पातळ रेल्वे प्लॅटफॉर्म वर मिळावा तसा चहा-कॉफी होतं. तो तुम्ही किती ही प्या. त्यावर काही बंधन नव्हतं. ते सर्व झालं अन मग इंस्टिट्यूट ला पायीच नीघालो. तसं एच-1 सर्वात जवळ होतं. अन् वॉकिंग डिस्टन्स होतं. बाकी हॉस्टेल चे व आमचेही काही जण सायकल नं चालले होते. पहिल्या दिवशी अगोदर ऑफिस मध्ये जाऊन काही फॉर्म्स भरले. तिथेच रोल नंबर मिळाला. मुख्य म्हणजे आयडेंटिटी कार्ड मिळालं. त्याशिवाय कुठेच काही कारण शक्य नव्हतं. लायब्ररी चं कार्ड, फिल्म क्लब चं कार्ड, कम्प्युटर सेंटर वर कार्ड सर्वांसाठी ID ची आवश्यकता होती. मग आमच्या डिपार्टमेंट ला गेलो. तिथे

a

पहिल्या सेमिस्टर चे कोर्स रजीस्टर करायचे होते. पाच पैकी दोन विषय कंपलसरी अन तीन ऑप्शनल घ्यायचे होते. सात दिवसाच्या आत ऑप्शनल बदलू शकत होतो. मी आधीच विचार करून, सीनियर्स बरोबर डिसकस करून ठरवून गेलो होतो. त्यामुळे फार वेळ लागला नाही. मग लायब्ररी मधल्या फॉरमॅलिटीज पूर्ण केल्या. कॅंटीन च्या बाजूलाच फिल्म क्लबचं ऑफिस होतं. त्याचं ही कार्ड काढून महिन्याचा अडीच रुपयांचा पास काढला. दर शुक्रवारी अन शनिवारी असे महिन्यातून चार सिनेमा कान्होकेशन हॉल मध्ये दाखवायचे. शुक्रवारी सर्व विद्यार्थ्यासाठी अन् शनिवारी प्राध्यापक, ऑफिस अन सपोर्टिंग स्टाफ व त्यांचे कुटुंबिय ह्यांच्या साठी तोच सिनेमा असायचा. पण हे अगदी फार हार्ड अँड फास्ट नव्हतं. अडीअडचणीत कोणत्याही वारी कोणीही जाऊ शकायचं. महिन्यात बहुदा दोन हिन्दी अन दोन इंग्लिश चित्रपट असायचे. त्या व्यतिरिक्त महिन्यातून एकदा मराठी चित्रपटही दाखवायचे. ह्या सिनेमाना सर्वजण हमखास जायचेच. अगदी धो धो पाऊस असला तरी. एच-1 कडून इंस्टिट्यूट ला गेलं की एक सात-आठ फुट रुंदीचा क्लोज्ड कॉरीडोर सुरू व्हायचा. तो एक दिड किलो मीटर लाम्ब होता. त्याच्या दोन्ही बाजूला वेगवेगळे विभाग होते, प्रयोग शाळा होत्या. बॉम्बे आय.आय.टी.ची ती स्पेशालिटी होती त्या कॉरिडोर च्या मध्य भागी एक भव्य कमान होती. तिच्यावर ‘ ज्ञान्म परमं ध्येयं “असं मोठ्या अक्षरात लिहलेलं होतं। मेन बिल्डिंगच्या मागच्या बाजूला एक प्रचंड मोठी लॉन होती. तिच्या एका बाजूला एक चार-पाचशे लोक बसतील असा सेमिनार हॉल होता. त्याला एल.

टी. म्हणजे लेक्चर थिएटर म्हणायचे. टेक्निकल सेमिनार व छोटे मोठे कार्यक्रम इथे व्हायचे. पहिल्या दिवसाचा लंच पर्यंतचा वेळ असाच सगळं बघण्यात गेला. रजिस्ट्रेशन डे होता म्हणून त्या दिवसापासून क्लासेस होणार नव्हते. मग एक वाजता लंचला गेलो. मेस मध्ये गर्दी होतीच. होस्टेल सारखंच सर्व जेवण होतं. पहिल्याच दिवशी काय कळणार? साधारण अडीच वाजता लायब्ररीत गेलो. प्रचंड मोठी, चार मजली लायब्ररी होती. माझ्या विषयाची काही पुस्तकं मी इश्यू करून घेतली. लायब्ररी सर्व दिवस, रात्री 11 पर्यंत उघडी असायची. रविवारी सुद्धा. 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी दोनच दिवस लायब्ररी बंद असायची.

दुसऱ्या दिवसापासून क्लासेस रेग्युलर सुरू झाले. अन आमचं रुटीनही. होस्टेल मध्ये रॅगिंग वगैरे काही प्रकार नव्हता. पण ते कदाचित आमचं पी.जी. अन रिसर्च विद्यार्थ्यांचं हॉस्टेल होतं म्हणून असावं. कारण मी जेव्हा अच्युत गोडबोलेंचं ' मुसाफीर ' हे पुस्तक वाचलं तेव्हा मला कळलं की आमच्या यू.जी. हॉस्टेल्स मध्ये खूप रॅगिंग व्हायचं. गोडबोले आय.आय.टी.त 1972-73 ला होते बहुदा. म्हणजे आमच्या दोन वर्ष अगोदरची गोष्ट. आम्ही हॉस्टेल मध्ये राहायला गेलो त्याच्या आठ-दहा दिवसांनी झालेली फ्रेशर्स नाइट मात्र मला चांगली आठवते. एक दिवस हॉस्टेल नोटीस बोर्ड वर नोटीस लागली ' की अमुक एका तारखेला फ्रेशर्स नाइट होईल. सर्व फ्रेशर्सनी तिला हजर राहणं कंपलसरी आहे. सर्वांनी आधी लाउंज मध्ये संध्याकाळी सात वाजता जमायचं. सर्व फ्रेशर्स नी आपला परिचय करून द्यायचा व लागलीच कुठलाही

a

एक आयटम करून दाखवायचा, म्हणजे गाण, डांस, नकला, जोक्स वगैरे करून दाखवायचं. नंतर फॅशन परेड होईल अन ब्युटि क्वीन ऑफ एच-1 फॉर द यियर निवडली जाईल. व नंतर मेस मध्ये फिस्ट-डिनर होईल. ' ठरल्या दिवशी सर्व फ्रेशर्स आणि सिनियर्स संध्याकाळी लाउंज मध्ये जमा झाले. मग एक एक फ्रेशर नं आपला परिचय देऊन आपला आयटम सादर केला. मजा येत होती. सर्व हसत टाळ्या वाजवत होते. माझी पाळी आली तेव्हा माझ्या परिचया नंतर मी म्हणालो " मै आप सबको मेरी एक हिन्दी कविता सुनाना चाहता हू। सिर्फ मेरी एकही रिक्वेस्ट है की कविता हास्य या व्यंग नहीं है। थोड़ी गंभीर है। पर मुझे विश्वास है की आप लोगोकों पसंत आएगी। " तेवढ्यात एक जण म्हणाला, ' नही पसंत आयी तो भी तालिया बजा देंगे. चिंता मत करो। ' मग मी अगदी एका मिनिटात कवितेची पार्श्वभूमी सांगितली. अन म्हणालो " कविता का शीर्षक है ' विद्रोह '

## विद्रोह

' असत्यके कंधोपर जब सत्यकी लाशको स्मशान जाते देखा,
तब अपनी चिता आप जलाकर, हमने नया जन्म लिया,
अपने आपसे विद्रोह किया।
अबतक जीया हमने जो जीवन,लगता है सब था व्यर्थ,
घिसापिटा हर वसूल था, हर अर्थ था एक अनर्थ.

a

हम सुनते थे उसके घर देर है अंधेर नही।
पर इतनी देरसे देखा हमने दूर होता अंधियरा,
जब उजाला देखनेको आखोमे रोशनी नही होती.
रोते रोते बितता जीवन सारा,
और तब आता हसने का क्षण,
जब थककर हारे प्राणोमे ,
हसनेकी शक्ति नही होती.
कैसे है यह देर, और कैसे नही अंधेर,
सोच सोच जब थककर हारे, घिसेपिटे अर्थ शब्द के,
जब न आये काम हमारे. सच्चाईकी राह पर अपनी परछाई न आयी साथ,
तब हमने सोचा अब करो आत्मघात।
अब पथ बदलो, और चलो कोई ऐसी राह,
जहा देर तक अंधेर न हो, जहा हेर हो या फेर हो,
सिर्फ वसुलोका ढेर न हो.
हम सुनते थे अंतिम विजय सत्य की है.
पर सत्य की विजय होंनेतक,
जब व्यक्ति का अंत होते देखा,
तब अपनी चिता आप जलाकर हमने नया जन्म लिया ,
अपने आपसे विद्रोह किया। “ ( विद्रोह हेच शीर्षक असलेला माझा एक हिन्दी काव्य संग्रह पुढे प्रकाशित झाला )

a

सर्वांनी कडाडून टाळ्या वाजवल्या. कविता सर्वांना आवडली होती. असं करत करत सर्व फ्रेशर्स संपले. हॉस्टेल सेक्रेटरीनं नंतर जाहीर केलं की आता ही जी दोन लांब टेबलं ठेवली आहेत त्याच्या भोवती सर्व फ्रेशर्स हळू हळू फिरतील. म्हणजे फॅशन परेड होईल. व ह्या फ्रेशर्स मधून ह्या वर्षीची हॉस्टेल क्वीन निवडण्यात येईल. त्यासाठी सेकंड एम.टेक.चे अग्रवाल व सरदार विर्दी हे दोघं ज्यूरी म्हणून काम पाहतील. त्यांचा निर्णय अंतिम राहिल. त्या दोन्ही ज्युरींना टेबलांच्या एका टोकाला खुर्च्यांवर बसवण्यात आलं。 मग ज्युरींनी सांगितल्या प्रमाणे आम्ही सर्वांनी दोन राऊंड घेतले. अन् थांबलो. त्या दोघांनी दोन मिनिट चर्चा केली अन् सरदारजी विर्दी उठून उभा राहिला अन् म्हणाला. जाजू (म्हणजे मी ) इज धिस यियर्स हॉस्टेल ब्युटि क्वीन . सर्वांनी टाळ्या वाजवल्या. मी पुढे होऊन ज्युरींनी दिलेलं गुलाबाचं फूल घेऊन हात उंचावून सर्वांना हायsss केलं. नंतर डीनरला मेस मध्ये जाताना सर्वांनी आणि खास म्हणजे आमचे शिंदे, खेर, नायक, जैन ह्यांनी मला हसत हसत Congratulations दिले. मग मेस मध्ये जेवताना मलाच का ब्युटि क्वीन निवडलं असेल याच्या वर चर्चा सुरू झाली. अर्थात गमती गमतीत。 मी त्या दिवशी काळा पॅंट अन काळे ठीबके असलेला पांढरा मनिला घालून गेलो होतो. त्या वेळी मी शोले मध्ये अमिताभ बच्चन चे असायचे तसे लांब केस ठेवायचो. मी म्हटलं, ज्युरींना हे सर्व आवडलं असेल. मग सगळे हसायला लागले. बस ही अशी झाली फ्रेशर्स नाईट. हयानंतर नो रॅगिंग. पण यू.जी. हॉस्टेल मधले अनेक किस्से मला अच्युत गोडबोलेंच्या मुसाफीर मधून आणि

आणखी काही ठिकाणाहून वाचायला, ऐकायला मिळाले. रॅगिंग चे नाही, पण आय.आय.टी.चे होस्टेलर्स किती ग्रेट असतात ह्याचे एक-दोन कीस्से मला इथे लिहावेसे वाटतात. गोव्याचे मुख्य मंत्री अन भारताचे संरक्षण मंत्री कैलासवासी मनोहर पर्रीकर आय.आय.टी. मुंबई चे विद्यार्थी होते. त्यांच्या एका टी.व्ही.वर च्या मुलाखतीत त्यांनी सांगीतले ला एक छोटासा कीस्सा मला आठवतो. ते म्हणाले ‘ हॉस्टेल मध्ये एक विद्यार्थी आपल्याच रूम मध्ये बर्मुडा बनियन मध्ये बसून ड्रिंक्स घेत होता. बरोबरच सिगारेट ही ओढत होता. त्याचा एक मित्र त्याच्या बाजूला बसून गप्पा मारत होता. तो मित्र काही ड्रिंक्स घेत नव्हता किंवा सिगारेट ही ओढत नव्हता. नेमके त्याच वेळेला त्या ड्रिंक्स् घेणाऱ्याचे वडील त्याला भेटायला आले. त्यांनी दारावर नॉक केलं. हयाने हातातली सिगारेट अॅश ट्रे मध्ये ठेवली, ग्लास टेबल वर ठेवला अन् दार उघडलं. पहातो तर समोर वडील. म्हणाला ‘ बाबा, तुम्ही कसे काय ? ‘ ते ग्लास अन सिगारेट कडे बघत बघत म्हणाले ‘आलो सहज तुला भेटायला. ‘ त्याच्या मित्राच्या ते लक्षात आलं. त्या मित्रानं लागलीच सिगारेट तोंडात धरली, दारूचा ग्लास उचलून हातात घेतला अन रूमच्या बाहेर निघून गेला. त्याचे वडील म्हणाले ‘ अशा मुलांच्या संगतीत राहत जाऊ नको. ‘ अशी ही ग्रेट मुलं. आणखी एक 1992 च्या बॅच चा घडलेला खरा कीस्सा वाचण्यात आला. तो इंग्रजीत जसा वाचला तसाच लिहतो आहे. मला वाटतं आता अशात मी वाचला.

"Once 4 students of I.I.T. Mumbai were playing cards till late night and could not study for the test which was scheduled for the next day. In the morning they thought of a plan.

They made themselves look dirty with grease and dirt. They then went up to the Dean and said that they had gone out to a wedding last night and on their return the tire of their car burst and they had to push the car all the way back and that they were in no condition to appear for the test.

The Dean said they could have re-test after 3 days. They thanked him and said they would be ready by that time.

On the third day they appeared before the Dean. The Dean said that as this was a _Special Condition Test _, all four were required to sit in separate classrooms for the test.

They all agreed as they had prepared well in the last 3 days.

The test consisted of only 2 questions with a total of 100 marks.

The questions were :

Q.1 Which tire burst ? (50 marks)

(a) Front Left :--------

(b) Front Right :-------

a

(c) Back Left :----------

(d) Back Right:----------

Q.2 Who sat where in the car ?(50 marks)

a) Front Left :--------

b) Front Right :-------

c) Back Left :----------

d) Back Right :--------

Note : Marks will be awarded only if all 4 answered both the questions exactly with the same response.

True story from I.I.T. Bombay Batch of 1992.

At the bottom it was written—

**Never underestimate tour teachers.**

**‘ गुरु गुरु ही रहेगा ‘**

असे अनेक नग असतात होस्टेल मध्ये. आमच्या होस्टेल मध्ये माझ्याच रूम च्या वर 156 मध्ये एक जी. डी. शर्मा म्हणून रिसर्च स्कॉलर राहायचा. ती एक वल्लीच होती. नेहमी खूप विनोदी बोलायचा. प्रासंगिक विनोद खूप छान करायचा. तो रोज रात्री त्याच्या बाल्कनीत उभं राहून हातात एक ताट घेऊन मोठ्या चमचा नं लांब बेल दिल्यासारखं वाजवायचा अन् नंतर ओरडायचा ‘

सुनो, सुनो भाईयो, रातके ग्यारह बज गये है. सब लोग मग्गा मारना बंद कर दो। और अपनी अपनी किताब बंद करके सो जाओ. चलो, फटाफट. ‘ एकदा तो मेस मध्ये माझ्या बाजूला जेवायला बसला होता. मेस सरव्हंटनं ताट-वाट्या आमच्या समोर आणून ठेवल्या. दूसरा वरण भाजी वाढायला आला तसा शर्मा त्याला म्हणाला, ‘ क्यु भाई सब्जीमे नमक, मिर्च, आलू सब डाल दिये है न ? ‘ मी म्हटलं, ‘ ये नमक, मिर्च तो ठीक है शर्माजी. पर ये आलू क्यु पुछ रहे हो ?’ तो हसत हसत म्हणाला ‘ अरे यार यह रामू की मेस है. यहा हर सब्जीमे आलू होता ही है. बैगन मे आलू, भिंडी मे आलू, टिंडेमे आलू और आलू मे भी आलू. लाइफ का आलू का सब कोटा इज मेस मे पुरा होजायेगा. आगे जिंदगीमे आलू खानेका काम ही नही. तुमने अभितक नोट नही किया ?’ तो म्हणत होता ते खरं होतं. बटाटा हा प्रत्येक भाजीचा अविभाज्य अंग होता. खरं सांगायचं तर आमच्या औरंगाबाद च्या इंजीनियरिंग कॉलेज च्या होस्टेल मेसचं जेवण आय.आय.टी. च्या मेस पेक्षा चांगलं होतं.

आमच्या होस्टेलच्या एंट्रीलाच एका बाजूला एक छोटी रूम होती. त्या रूम मध्ये एक फोन होता. त्या फोन मध्ये एक रुपयाचं नाण टाकून बाहेर फोन करता यायचा. अर्थात लोकल. बाहेरगावी करायला तर मेन बिल्डिंग मध्ये टेलिफोन एक्स्चेंज मध्ये जाऊन STD बुक करावा लागायचा. होस्टेल च्या फोन वर बाहेरून कोणाचा फोन आला तर सिक्युरिटी(वॉचमन) तो उचलायचा अन मग ज्या रूम चा असेल त्या विंग मध्ये जाऊन खालूनच तो रूम नंबर ओरडायचा. हे सिक्युरिटीवाले बहुदा नेपाळी किंवा यू.पी.चे भैय्या लोक

असत. ते मजाच करायचे. समजा रुम नंबर 180 चा फोन असेल तर ते खालूनच मोठमोठ्यानं वन एटी झीरो, वन एटी झीरो असं ओरडायचे. काही वेळा तर बाजूला उभी असलेली मुलं त्याला भलताच नंबर सांगून पाठवायचे. तो मुलगा आला की खूप वैतागून सिक्युरिटीलाच शिव्या द्यायचा. मी जॉइन झाल्यानंतर साधारणत: एका महिन्यानं ओलेम्पिक्स सुरू झाले. दिवसभर लाउंज मध्ये कोणी न कोणी ते टी.व्ही.वर बघतच असायचं. संध्याकाळी आणि रात्री ही संपूर्ण लाउंज भरलेलं असायचं. मी मेस मध्ये जाता येताना 15-20 मिनिट पाहायचो. बरेच वेळ आमची ही अमरावती-नागपूरची मुलं माझ्या रूम वर यायची. मला म्हणायची ‘ सर काय, तुम्ही नेहमी अभ्यासच करत असता. एवढे ओलेम्पिक्स चालले आहेत ते सुद्धा बघायला तुम्ही येत नाही. ‘ मी म्हणायचो ‘अरे तुमची गोष्ट वेगळी आहे बाबा. मला इतक्या वर्षाच्या गॅप नंतर आता फास्ट लिहता येत नाही. त्यात आधीच माझी लिहण्याची स्पीड यू.जी. च्या वेळीही कमी होती. तीन तासात माझे कधीच सहा प्रश्न सोडऊन व्हायचे नाहीत. साडेचार, जास्तीत जास्त पच व्हायचे. तेव्हाच मी खूप सफर झालो. आता ती रिस्क नको म्हणून मी वाचलेलं सर्व लिहून पाहतो. शिवाय कॅल्क्युलेशनस ची ही मला प्रॅक्टिस करावी लागते. अन माझा एस.पी.आय. 5.5 पेक्षा कमी आला तर मला आय.आय.टी. सोडून जावं लागेल अन माझी छि थू होईल. मला ओलेम्पिक्स साठी एवढा वेळ देणे शक्य नाही. ‘ मग ते हसत म्हणायचे ‘ सर तुम्ही विनाकारण फार टेंशन घेताय॰ ‘ माझ्या बायकोची नियमित पत्र यायची. मी ही तिला ताबडतोब ऊत्तरं द्यायचो. मागे मी हॉस्टेल

a

ची ब्युटि क्वीन म्हणून निवडला गेलो, हे तिला एका पत्रात लिहलं तर तिनं माझी चांगली फिरकी घेतली. मी फार बिझी असतो हे मी तिला नेहमी लिहायचो. ‘ चांगला अभ्यास करा तुम्ही. आमची काळजी करू नका असं ती लिहायची. तरीही तिनं एकदा करिश्मा केलाच. एक दिवस माझी कम्प्युटर ह्या विषयाची क्लास टेस्ट होती. फार काही चांगली झाली नाही माझी. त्या मुड मध्ये डिपार्टमेंटच्या बाहेर आलो, अन् समोर बघतो तर अकोल्याचा माझा मामेभाऊ उभा. तो माझा विद्यार्थी ही होता. मी म्हटलं, ‘अरे तू यहा कैसे? ‘ तो म्हणाला ‘ मुझे ऐसेही बंबई मे काम था, सो मै आया. साथ मे भाभी भी आई है. भाभी अकोलाही थी जिजी के यहा. मै मिलने गया था. मै ने ही भाभी को कहा, चलो भाऊ से मिलने. ‘ मी अवाकच झालो. म्हटलं ‘फिर कहा है वह?’ तो म्हणाला ‘हम सिधे तुमहारे हॉस्टेल पर गये. कमरा बंद था. लेकीन तुम्हारे बाजूवाला कमरा खुलाही था. सो ऊनको पुछा तो उन्होने बताया की तुमहारी 9 से 10 कॉम्प्युटर की टेस्ट , कॉम्प्युटर विभागमे ही है. बराबर 10 बजे तुम बाहर आकर मेकॅनिकल विभाग को जाओगे. मेरे को उन्होने कॉम्प्युटर डिपार्टमेंट के सामने वाले बडे दरवाजे पर खडा रहना ऐसा कहा. सो मै भाभी और गुड्डी को वहा ही छोडकर यहा आया हू.” मी म्हटलं, चलो. मग आम्ही होस्टेल वर गेलो. खरं म्हणजे मला तीचं असं अचानक येण आवडलं नव्हतं. मी आधीच खूप टेंशन मध्ये होतो. मला जराही वेळ नव्हता. पण आता मामेभावासमोर तिला काही बोलणं ही बरोबर नव्हतं. मला आनंद झाल्याचं नाटक करण आवश्यक होतं० मी बाजूच्या पंड्या म्हणून माझा मित्र होता

त्याच्या रूम वर गेलो. पंड्या म्हणाला ‘ यार मेस मे चाय नाश्ता चल ही रहा था. सो मैने मेस के आदमी को बोलकर रूम मे ही बुलाकर यहाही भाभी और गुड्डी को नाश्ता करावा दिया.’ मी म्हणालो. ग्रेट. थॅंक यू पंड्या. मग आमच्या रूमवर गेलो. भाऊ म्हणाला ‘ मला मुंबईला चीरा बाजार ला काम आहे. मी निघतोच. तसा आम्ही सकाळी व्ही.टी.ला चहा घेतलाच होता. आता मला काही नको.’ असं म्हणून तो घाईनं गेला. मग मी आधी गुडडीला घेऊन तिचा खूप लाड केला. थोडा वेळ आम्ही बोलत बसलो. मी किती ही नाटक केलं तरी ती आल्याचं मला आवडलं नाही हे तिच्या लक्षात आलं. ती म्हणाली आम्ही दोन तीन दिवसांनी परत जातो. मी म्हणालो ‘ तुम्ही असे आता परत गेलात तर मला ते आणखी टोचत राहिल अन माझं मन अभ्यासात लागणार नाही。 मी करतो आपली दहा बारा दिवसासाठी व्यवस्था. तू काळजी करू नको. मला मागे देशपांडेनं सांगीतलं होतं की त्यांच्या होस्टेल मध्ये एक वन रूम किचन चं क्वार्टर कोणाचे गेस्ट वगैरे आले तर राहण्यासाठी गेस्ट रूम म्हणून रिकामं असतं。 शिवाय त्या गेस्ट रूम चा हॉल मॅनेजर श्री कुस्नाळे हाही त्याच्या ओळखीचा आहे कारण एम.टेक.ला असताना त्याची मिसेस ही एकदा आली होती व त्या वेळी देशपांडे नं ती गेस्ट रूम घेतली होती. तिथे कॉट, अंथरुण पांघरूणही आहे.. तू असं कर, आता बाथरूम मध्ये कोणीच नसतं. गिझरमध्ये गरम पाणीही असेल. तेव्हा तू अन् गुड्डी आंघोळ करून घ्या. तुमचं झालं की देशपांडेला घेऊन कुस्नाळेला भेटतो” त्यांचं आटोपल्यावर मी डीपार्टमेंटला जाऊन देशपांडेला भेटलो. त्याला सर्व कल्पना

a

दिली. तो म्हणाला काही काळजी करू नको. आपण आताच कुस्नाळे ला भेटू. तो आधी एका आठवड्यासाठी देतो. नंतर 4-5 दिवस सहज एक्सटेंड करता येतं. मग आम्ही त्याच्याकडे गेलो. सुदैवानं गेस्ट रूम रिकामं होतं त्यानं सर्व रजीस्टर मध्ये नोंद करून मला चाबी ही दिली. मला खूप आनंद झाला. माझ्या रूम वर जाऊन बायकोला ते सांगीतलं. मेस ची वेळ होतच आली होती. मग मी तिला म्हणालो, ‘ आठ-दहा दिवस सहज राहता येईल. आपण रोज असं करायचं सकाळी आठ-सव्वा आठ पर्यंत गेस्ट रूम वरच आंघोळ वगैरे आटोपून हॉस्टेल ला यायचं. तिथे मेस मध्ये चहा नाश्ता करून मी क्लासेस ला जात जाईन अन् लंच ला परत येत जाईन. तो पर्यंत तुम्ही दोघी माझ्या रूम मध्येच राहायचं. इथे वाचायला खूप आहे. शिवाय तुम्ही हॉस्टेल गार्डन मध्ये बसू शकता. इथे काही बंधन नाही अन सर्व अगदी सेफ आहे. लंच नंतर मी तुला गेस्ट रूम वर सोडून क्लास ला जात जाईन. परत पाचला येऊन फ्रेश होऊन आपण टिफिनला हॉस्टेल मध्ये येत जाऊ व डिनर करूनच परत इकडे गेस्ट रूमला येत जाऊ. मी माझा अभ्यास, डेली असाईनमेंट इथे-तिथे बरोबर करत जाईन. ‘ तिला मग आल्याचा खूप पश्चाताप झाला. म्हणाली ‘ तुम्ही किती बिझी असता, किती अभ्यास असतो. अन् मी विनाकारणच येवून तुमचा ताप वाढवला. ‘ मी म्हटलं आता काही ही वाटू देऊ नको. मजेत रहा आठ-दहा दिवस. मी दहा दिवसा नंतर् चं तुझं परतीचं रिझर्व्हेशन करून ठेवतो. शनिवार– रविवार ला बाहेर थोडं मुंबई पाहून येऊ. मी ही अजून कॅम्पस च्या बाहेर पडलो नाही.’ मग आमचं रुटीन सुरू झालं. हॉस्टेल च्या बऱ्याच मित्रांशी

a

तिची ओळख ही झाली. माझी अडीच-तीन वर्षाची मुलगी खूप गोड अन बोलकी होती त्यामुळे सर्व जण तिच्या शी खेळायचे. माझी थोडी सर्कस झाली. पण दहा दिवस मजेत गेले. अर्थात मी माझा अभ्यास फार सफर होऊ दिला नाही. अकराव्या दिवशी तिला व्ही.टी.वर ट्रेन मध्ये बसवून आलो. गलबलून गेलो होतो. रूम मध्ये आल्या बरोबर तिला पत्र लिहायला घेतलं. ड्रावर उघडून पाहीलं तर तिनं माझ्यासाठी लिहून ठेवलेलं दोन पानी पत्र दिसलं. ते वाचलं अन् खूप रडलो. मग ताबडतोब तिला उत्तर लिहायला बसलो. असे गेले 11 दिवस० परत कंबर कसून तयारीला लागलो. आठवड्यात दोन तरी असाईमेंट असायच्या अन पंधरवाड्यात एका विषयाची टेस्ट० माझा अभ्यास चांगला सुरू होता. मला आठवतं, मी ओलेम्पिक्सचे गेम्स फार काही पाहीले नाहीत. पण त्यात, त्या वर्षी गाजलेली जिम्न्यशियम मधली नादीया कामनोच हिच्या सर्व कसरती, आमच्या तरुण मित्रांच्या आग्रहा खातर सर्व पहिल्या. ते ओलेम्पिक्स तिनं च गाजवलं होतं. पावसाळयाच्या दिवसात आय.आय.टी. मध्ये रस्त्यानं चालता चलता समोर साप दिसायचे. विशेषत: रात्री लायब्ररीतून परत येताना खूप केअरफुली चालावं लागायचं. एका रात्री खूप पाऊस झाला. आमच्या दोन विंग्ज च्या मधल्या भागात तलाव झाला. माझ्या रूमच्या मागच्या भागात तर पाण्यावर साप तरंगत होता. काही सिनीअर्स होते आमच्या विंग मध्ये. ते म्हणाले. डोन्ट वरी. वो अंदर नही आयेंगे. तरी भीती वाटायची. असं करता करता निम्मा ऑक्टोबर संपला. आमची पहिल्या सेमिस्टर ची परीक्षा 14 ते 29 नोवेंबर ला होती. मग डिसेंबर पूर्ण सुटी. नोव्हेंबर च्या 4

a

तारखेला आमच्या हॉस्टेल चं टर्म एंड फंक्शन होतं. हॉस्टेल च्या दोन्ही मेस हॉल मध्ये दोनेक तास करमणूकीचा कार्यक्रम व नंतर फिस्ट-डिनर असा तो कार्यक्रम होता. कार्यक्रमाच्या दोन-तीन दिवस आधी, रात्री माझ्या रूम मध्ये हॉस्टेल सेक्रेटरी, शर्मा, रामु अग्रवाल असे चार-पाच जण आले. म्हणाले ' जाजू साब, परसो टर्मएंड फंक्शन मे तुम्हारी एखाद हलकी फुलकी रचना सुना दो. हम तुम्हारा नाम लिस्ट मे लिख रहे है. ' मी म्हटलं ' यार, हलका-फुलका तो मै लिखता नही. गंभीर कहो तो कुछ सुना देता हू. ' ते म्हणाले ' यार कवी हो. इस फंक्शन के लिये कुछ हलका फुलका लिखलो.' मी म्हटलं, ' कोशिष करता हू. ' ते गेले. रात्री झोपण्यापूर्वी मनात विचार आला की आपल्या इंजीनियरिंग च्या प्रॅक्टिकल्स परीक्षांमध्ये नेहमी via-voce म्हणजे तोंडी परीक्षा होते. अशी तोंडी परीक्षा जर फिलॉसाफी किंवा सायकॉलॉजी च्या परीक्षेत घेतली तर कशी प्रश्न-उत्तरं होतील ह्यावर आपण एक व्यंग लिहावं. थोडावेळ विचार केला अन् विश्वास ठेवा, एका दमात ' व्हायवा ' ही कविता लिहून काढली. मलाच माझी आवडली. नंतर होस्टेल च्या एक-दोन मित्रांवर दोन शेर लिहले. त्यात माने नावाचा एक सीनियर होता. त्यानं खूप दाढी वाढवून ठेवली होती. त्याच्यावर एक शेर, अन दूसरा एक लाड म्हणून होता. तो नेहमी बोलतांना एखाद्या दारू पिलेल्या सारखं बोलायचा. त्याच्यावर एक लिहला. फंक्शनच्या वेळी जेव्हा माझं नाव पुकारलं तेव्हा माइक वर गेलो. म्हटलं, ' पहले अपने दो दोस्तोपर दो शेर सुनाता हू बादमे एक व्यंग-कविता सुनता हू.' इथे मी त्या लिहतो आहे. पहला शेर माने पर है.

'माना के माने ने दाढ़ी बढाई है,
खुद अपने हाथो अपनी जवानी जलायी है ,
अपने आप को माने ना समाजो बेसहारा यू,
कोई तो अपनी होगी? क्या सब पराई है?

और अब एक शेर लाड़ के लिए,

बहुत दिन से नजर आये लाड़, क्या फिर ठर्रा चढ़ाये हो ?
अरे यार अपनी बोली ही ऐसी है, मिया रोते क्यू? तो, सूरत ही वैसी है।

और अब एक कविता सुना रहा हू जिसका शिर्षक है ' व्हायवा '। और यह व्हायवा इंजीनीयरींग परीक्षा का नहीं। यह है सायकॉलॉजी का व्हायवा जिसमे ऊटपटाँग प्रश्नोत्तर हो रहे है। तो प्रस्तुत है

## व्हायवा

''सायकॉलॉजी के व्हायवा मे प्रोफेसरने हमको पुछा,
चेले अकल बड़ी होती है या भैस ?
हमने कहा गुरु, पुर्खों के जमानेमे अकल बड़ी हुआ करती थी।
आज तो भैस ही बड़ी है ।
क्यू की कल ही हमने देखा,
आप जैसी अकलमंद हस्ती,

a

भैस के मामुली धक्केसे निचे गिर पड़ी है.
गुरु बोले वाह,खूब कही।
मानाके भैस बड़ी सही।
अब दिमाग रखो ठंडा
और ये बताओ पहले मुर्गी या अंडा?
हमने कहा गुरु,
सवाल थोड़ा टेढ़ा है,
और अकल वालोने इसका संबंध जेब से जोड़ा है
कह गया है कोई अकल का पंडा,
जेबमे आठ रुपये हो तो पहले मुर्गी,
आठ आने हो तो पहले अंडा।
गुरु झल्लाए।
बोले क्या बकते हो?
ये कोई जबाब है ?
हमने कहा गुरु,
ऐसे सवालो का तो बस यही जवाब है।
गुरु, घिसेपीटे सवाल क्या पुछते हो ?
सवाल पुछो कोई ब्रण्ड न्यू
ये सायकॉलॉजी का व्हायवा है,
या पी।एस।सी. का इंटर्व्हिव ?
गुरु बोले देखलुंगा,
तुम्हें व्हायवा मे फेल कर दूंगा।
हमने कहा गुरु बी फेयर,

या फीर, लेट अस एक्सचेंज द चेयर
गुरु तेरी भी चुप, मेरी भी चुप,
इसमे दोनो की भली होती है।
वरना हर शेर के अपने दिन तो होते है,
पर हर बिल्ली की अपनी गली भी होती है। “

एवढं बोलून मी हात जोडले. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. वाह कया बात है, असे आवाज आले. एकूण कार्यक्रमच चांगला झाला. नंतर डिनर झालं. थोडा वेळ लाउंज मध्ये बसून रूम वर गेलो. परीक्षा जवळ येत चालली होती. मेकॅनिकल ला, पॉवर, प्रॉडक्शन, डिजाइन आणि इंडस्ट्रियल इंजीनियरिंग असे सर्व मिळून आम्ही एम.टेक.ला 40 विद्यार्थी होतो. त्या पैकी आम्ही 22 जण होस्टेल मध्ये राहायचो. माझ्यासारखे डेप्युटेशन वर आलेले आम्ही 4 जण होतो. आम्ही चारही जण नियमित अभ्यास करायचो. चौघांचं लग्न झालेलं होतं. चौघांचं ही एकच ध्येय होतं की पहिल्या सेमिस्टर चा रिझल्ट चांगला आला पाहिजे. आम्ही तीन म्हणजे जैन, मी, पटेल पॉवर ग्रुप ला होतो. अन पंड्या इंडस्ट्रियल इंजिनियरिंग ला. आम्ही नेहमी आपसात चर्चा करायचो. असाइंमेंट्स बरोबर बसून करायचो. माझ्या बायकोचा अन माझा पत्र व्यवहार नियमित सुरू होता. ती येवून गेल्या नंतर तिला मी किती व्यस्त असतो हे कळलं. सारखी मला एन्करेज करायची. फक्त तीचं एकच म्हणणं होतं की कसं ही करून दुसऱ्या सेमिस्टर पासून कॅम्पस मध्येच एखादं

वन-रूम किचनचं घर घेऊन आम्हाला तुमच्या बरोबर न्या. आय.आय.टी.त अशी आकोमोडेशन मिळायची. तिथले ऑफिस किंवा विभागाचे कर्मचारी जे बाहेर राहून आपल्या घरून रोज येणजाण करायचे, ते कॅम्पस मध्ये ही आय.आय.टी. चं कॉर्टर घेऊन ठेवायचे. आमच्या सारख्या विवाहित एम.टेक. किंवा पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना ते भाड्यानं द्यायचे. त्यांना भरावं लागणारं घर भाडं अन वर वीस-पंचवीस रुपये त्यांना द्यावे लागायचे. अर्थात यासाठी, आम्ही त्या कर्मचाऱ्या बरोबर क्वार्टर शेअर करत आहोत त्यासाठी ऑफिशियल परवानगी द्यावी अशी आय.आय.टी. ला विनंती करून, परवानगी मिळवावी लागायची. हे सर्व मला अन् माझ्या बायकोला देशपांडे नं अगोदर सांगितलेलं होतं. त्यानं एम.टेक.ला असं घर मिळवलं होतं. व तुलाही माझ्या ओळखीनी मदत करीन असं सांगीतलं होतं. त्यामुळे माझी बायको मला सारखं लिहायची० माझं फर्स्ट सेमिस्टर उत्तम रिती नं पास होणं ही माझी प्राथमिकता होती. अर्थात मी तिला हो हो म्हणायचो. करता करता 14 नोव्हेंबर आला. परीक्षा सुरू झाली. पहिले दोन पेपर चांगले गेले. मग थोडा आत्मविश्वास वाढला. परीक्षेचा शेवटचा पेपर झाला तो पर्यंत पहिल्या दोन पेपरचा निकालही (ग्रेड्स) नोटीस बोर्ड वर डिसप्ले झाला होता. आय.आय.टी.त पेपर तपासून झाल्या बरोबर प्राध्यापक आप आपल्या विषयाच्या ग्रेड्स डिस्प्ले करून टाकतात. मला एका विषयात A आणि एकात B ग्रेड मिळाली. आणखी एकात ए मिळेलच असा विश्वास होता. त्यामुळे आता आय.आय.टी. सोडायची पाळी निश्चित येणार नाही कारण SPI

a

नक्कीच 5.5 च्या वर राहणार याची खात्री होती. 30 नोव्हेंबरचं अमरावतीचं रिजरवेशन मी आधीच करून ठेवलं होतं. मग 29-30ला उरल्या वेळात देशपांडे बरोबर एक दोन कॉर्टर पाहून त्या त्या माणसाला भेटलो. त्या पैकी एक जमण्यासारखं होतं. त्याची थोडी जास्त अपेक्षा होती. त्याला म्हटलं एक जानेवारीला परत आल्यावर भेटतो. एक डिसेंबर ला आधी अमरावती आणि नंतर 60 किलो मीटर वर असलेल्या माझ्या सासराला गेलो. माझे पेपर चांगले झाले अन् दोनच्या कळलेल्या ग्रेड्स ऐकून बायको एकदम खुष झाली॰ क्वार्टरही जमेल असं सांगितल्यावर तर दुसऱ्या दिवसापासून काय काय सामान न्यावं लागेल ह्याची यादी करायलाही तिने सुरवात केली. डिसेंबर हा हा म्हणता निघून गेला. बायकोला म्हटलं मी शक्य तितक्या लवकर घराचं ठरवतो पण पक्कं झाल्याशिवाय रिसर्व्हेशन करू नको. तुझ्या धाकट्या भावाला बरोबर घेऊन ये कारण सामान बरंच राहिलं. अन् ठाण्यावरच उतरुन टॅक्सी करून न्यावं लागेल. ठाण्याला गाडी तीन मिनिटंच थांबते. मी तुला गेल्यावर सर्व सविस्तर कळविन. बरोबर एक जानेवारीला हॉस्टेल वर पोहचलो. सर्वात आधी इंस्टीट्यूटला जाऊन निकाल पहायची उत्सुकता होती. नेहमी प्रमाणे सकाळचं सर्व आटोपून डीपार्टमेंटला गेलो. कोर्स कोआर्डिनेटर च्या ऑफिस मध्ये जाऊन आधी ग्रेड कार्ड ( रिजल्ट व मार्कलिस्ट ) घेतलं. पाहून खूप आनंद झाला. दोन विषयांच्या ग्रेड्स अमरावतीला जाण्यापूर्वीच माहित झाल्या होत्या. अपेक्षेप्रमाणे आणखी एका विषयात ए ग्रेड मिळाली होती. पण उरलेल्या दोन विषयात आणि अर्ध्या विषयाचं वेटेज असलेल्या

एक्स्पेरीमेंटल लॅब मध्ये सी ग्रेड्स होत्या. सर्व मिळून SPI ( Semester Performance Index ) 7.8/10. आला। अन आणखी आनंदाची गोष्ट कळली ती ही की आम्हा 40 विद्यार्थ्यांमध्ये एस.पी.आय. प्रमाणे मी तिसरा होतो. मग त्याच वेळी दुसऱ्या सेमिस्टर च्या विषयांची निवड करून कोर्स रजिस्ट्रेशन केलं. ह्या सेमिस्टर मध्येही 5 विषय करायचे होते. दोन जानेवारी पासून क्लासेस अन् रुटीन सुरू झालं. बायकोला रिझल्ट लिहून कळवला. आता लव करात लवकर मी क्वार्टर पक्क करतो. ठरल्याप्रमाणे तू समानाची बांध बुंद सुरू कर. कूकिंग गॅस टर्मीनेट करून कागद पत्र घेऊन ठेव. ई. तिला लिहलं. कॅम्पस मध्ये लेक साईड ला एक क्वार्टर मिळण्या सारखं होतं. संबंधित माणसाला दोन-तीन वेळा भेटलो. ओफिशियल प्रोसीजर पूर्ण करून, त्यानं शेवटी माझ्याकडून तीन महिन्याचा ॲडवांस घेऊन 15 तारखेला क्वार्टर ची चाबी मला दिली. ' मी मधून मधून तुम्हाला भेटायला क्वार्टर वर येत जाईन. कोणी विचारलं तर मी ईथेच राहतो असं सांगत जा. ' असं त्यानं मला सांगून ठेवलं. मी त्याच रात्री बायकोला रिजर्वेशन करण्यासाठी लिहलं. अन बाकी सामान कसं आणायचं वगैरे सर्व सविस्तर लिहलं. मग मी मुलुंड ला जाऊन रेशन कार्ड काढलं. हॉस्टेलच्या स्वीपर ला बरोबर नेऊन एक दिवस क्वार्टर झाडून पुसून साफ करून ठेवलं. माझी पुस्तकं ठेवण्यासाठी काही लाकडी फळ्या ठोकल्या. शेजारची सर्व मंडळी फार चांगली होती. सहकार्य करणारी होती. मला आमच्या सिव्हील डिपार्टमेंट मध्ये पीएच.डी. करणाऱ्या एका मित्रानं सांगीतलं की माझ्या आधी त्या क्वार्टर मध्ये नगरकर म्हणून सिव्हील

मध्ये एम.टेक. करणारा एकजण राहत होता. तो आमच्या औरंगाबादचे प्राचार्य नगरकरांचा मुलगाच होता. त्यानं , तो राहत असताना त्यांच्या विभागातून एका 4 बाय 6 च्या पलंगा इतकी तीन इंच जाडी स्लॅब आणून त्याला सिमेंटचेच सिलेंडर सारखे चार पाय खाली लावून त्याचा छान पलंग करून ठेवला होता. तो बसायला अन् झोपायलाही खूप कामाचा होता. हे सर्व करायला मला वेळ मिळत होता कारण आमच्या वार्षिक स्नेहा सम्मेलनामुळे क्लासेस ही काही बरोबर होत नव्हते. आय.आय.टी. मुंबईत ह्या सम्मेलनाला 'Mood Indigo' असं म्हणतात. दर वर्षी मूड इंडिगो जानेवारी च्या चौथ्या आठवड्यात होतो. पहिल्या सत्रानंतर विद्यार्थी परत आलेले असतात. आल्याबरोबर मूड इंडिगोच्या तयारीची जोरदार सुरवात होते. बहुतांशी विद्यार्थी हॉस्टेल मध्येच राहतात. त्यामुळे सर्व हॉस्टेल चे मुलं-मुली, आमाचे एम.टेक.-पीएच.डी.चे विद्यार्थी मूड इंडिगोच्या तयारीत लागतात. त्याची एक मोठी कमेटी फॉर्म करतात. तीन-चार दिवस, दिवस रात्र भरगच्च कार्यक्रम कान्होकेशन हॉल, लेक्चर थिएटर, जिमखाना ग्राऊंड वर चाललेले असतात. दोन-तिन दिवस तर प्रसिद्ध इंव्हायटेड आर्टिस्टस चे कार्यक्रम असतात. मुला मुलींच्या गेम्स आणि स्पोर्ट्सच्या इंटर हॉस्टेल स्पर्धा जवळ जवळ 6-7 दिवस सुरू असतात. त्यालाही विद्यार्थी आपापल्या आवडी प्रमाणे हजेरी लावतात. विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमही खूप होतात. जसे, गायन, नृत्य, इंग्लिश एकांकिका इ. ह्या स्पर्धांसाठी तर बाहेरच्या कॉलेज चे केवळ मुंबईहूनच नाही तर बाहेरून म्हणजे दिल्ली, पाटणा, पुणे, वगैरे वरून ही विद्यार्थी भाग घ्यायला

a

येतात. चौथ्या दिवशी रात्री नोस्टालाजिया नाईट असते. त्या रात्री तर रात्रभर कॅम्पस मध्ये नाच-गाणे, म्यूजिक मस्ती सुरू असते. मूड इंडिगोचं बजेट फार मोठं असतं. त्यातला बराच सा भाग विद्यार्थी जाहिराती, इंडस्ट्री च्या लोकांकडून स्पोन्सोर्शिप, मधून जमा करतात. त्या त्या वर्षीच्या मूड इंडिगो अन वर्ष असं लिहलेल्या , दर वर्षी वेगळया रंगाच्या जर्स्या (टी शिर्ट्स), कमिटी ऑर्डर देऊन तयार करून घेते अन अशे हजारो टी शर्टस आमच्या व बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुप्पट किमतीनी विकतात. त्यातून ही बराच पैसा जमा होतो. शिवाय आय.आय.टी. देतेच. त्यामुळे सढळ खर्च सुरू असतो. बाकी विद्यार्थ्यांचे अन् इंव्हायटेड प्रोग्रॅम्स ही खूप उच्च दर्जाचे असतात. बरेच कार्यक्रम तीन-तीन ठिकाणी पॅरलल सुरू असतात. त्यामुळे आपले काही मिस ही होतात. जानेवारी महिन्यात मी हॉस्टेल मध्येच होतो. त्यामुळे सर्व कार्यक्रम पाहता आले. मला आठवतं, त्या वर्षी एका रात्री आशा भोसले, आर.डी बर्मन अन त्यांचा वाद्य वृंद आला होता. तीन-चार तास बहार दार कार्यक्रम झाला. ॲक्टर अमीर खानचे काका प्रोड्यूसर नासीऱ खान ह्यांचा मुलगा त्या वर्षी आय.आय.टी.त च विद्यार्थी होता. त्याच्या ओळखिनं ही सर्व बडी मंडळी आली होती अशी विद्यार्थ्यांमध्ये चर्चा होती. माझी बायको आली तो पर्यंत मूड इंडिगो संपला होता. मी हे सर्व तिला सांगीतलं तेव्हा ती फार खट्टू झाली. मी तिला म्हटलं, अजून पुढच्या मूड इंडिगोला आपण इथेच आहोत. तेव्हा तुला अन् गुडडीला बघता येईल. मूड इंडिगो झाल्या वर मी हळू हळू माझं सामान होस्टेल वरुन शिफ्ट करण सुरू केलं. होस्टेल मध्ये असलेली माझी

a

सायकल आता खूप कामी पडणार होती. कारण इथून डिपार्टमेंट 2-3 किलो मीटर होतं. हॉटेल मधला माझा टेबल् फॅन, बकेट्स बाकीचं बरंच समान मी 26 ला दुपारी नेण्याचं ठरवलं. 23-24 तारखेला होस्टेल च्या सर्व मित्रांना भेटलो व 26 पासून होस्टेल सोडून लेक साइड ला जातो हे सांगीतलं. हॉस्टेल वर येत राहीन, तुम्ही पण माझ्या घरी या असं सांगीतलं. आमचे अनिल, संजय, सुशील, जैन म्हणाले नक्की येऊ. गुड्डीला भेटायला तर येऊच. 26 जानेवारीला मी सकाळीच गाडी येण्यापूर्वीच ठाण्याला पोहचलो। गाडी प्लॅटफॉर्म वर येण्या आधीच माझ्या बायकोच्या भावा नं सामान गेट वर आणून ठेवलं होतं. 3-4 मिनिटात आम्ही सोळा डाग(नग) गाडीतून उतरवले. बाहेर आणून दोन टॅक्सीत सर्व बरोबर ठेवून क्वार्टरला घेऊन आलो. बायको आणि तिचा भाऊ क्वार्टर पाहून एकदम खुष झाले. त्याच दिवशी मी होस्टेल् चं सर्व सामान शिफ्ट केलं. अन हॉल मॅनेजर ला रूम दाखवून चाबी दिली. माझा हॉस्टेल-1 मधला मुक्काम असा संपला. एका सेमिस्टर साठी का होईना पण आय.आय.टी. च्या हॉस्टेल मध्ये राहीलो. अनेक गोष्टी अनुभवायला,शिकायला मिळाल्या. अनेक मित्र जोडता आले. त्या पैकी काही तर अजूनही, म्हणजे 47 वर्षांनंतर संपर्कात आहेत. पण आय.आय.टी. च्या एच-1 च्या माझ्या आठवणी एक मजेदार कीस्सा सांगितल्या शिवाय अपूर्ण राहतील. तो सांगतो. मी हॉस्टेल सोडून अडीच महिन्यांनंतर म्हणजे 8-10 एप्रिल ला एका संध्याकाळी एच-1 चा सेक्रेटरी, रामू अग्रवाल आणखी दोन जण माझ्या घरी आले. आम्ही दोघांनीही ही त्यांचं स्वागत केलं. म्हटलं

a

‘ यार आज इधर कैसे? ‘ ते म्हणाले ‘ जाजूजी आपको और भाभीजी को हॉस्टेल डे फंक्शनका इन्व्हिटेशन देने आये है. परसो श्यामको 7 बजे फंक्शन है. इस फंक्शन को अपने आय.आय०टी.के डाइरेक्टर चीफ गेस्ट रहते है। हम सारे हेडस ऑफ डिपार्टमेंट और कुछ एम.टेक.—पीएच०डी० के गाइडस को भी इंव्हाइट करते है। पहले थोडा एंटर्टेमेंट का प्रोग्राम होता है। फ़िर अपने होस्टेल के सालभर के जो इवैंट होंते है उसका डाइरेक्टर साब के हाथो प्राइज़ डिस्ट्रीब्यूशन होता है। और फ़िर डिनर. और जाजूजी आपको तो कंपलसरी आना ही होगा। क्यूंकी सर्वप्रथम होस्टेल क्वीन को ही प्राइज़ देते है० ‘ मी अन बायको दोघं ही हसलो अन म्हणालो, ' हम जरूर आयेंगे. ' ते थोडावेळ गप्पा करून निघून गेले. फंक्शन च्या दिवशी संध्याकाळी मी माझी बायको अन मुलगी सर्व जण होस्टेल ला गेलो. बरोबर सव्वा सात वाजता आमचे डायरेक्टर डे साहेब आले. प्रथम थोडे कार्यक्रम झाले. आमचा सीनियर, मेटालर्जी डीपार्टमेंटचा, शेनॉय अ‍ॅन्कर होता. प्राइझ डिस्ट्रिब्युशन सुरू करतांना तो म्हणाला ‘ Respected Director , all heads of the departments, faculty members and my friends we shall now begin the prize distribution for the various events we conducted in our hostel this year. I request our Director to please give away the prizes. Traditionally we begin with the prize to the Hostel Queen of the year. This year the Juries of Fresher’s Day program selected Mr. Jajoo as The Hostel Queen of the year. I invite

Mr.Jajoo to receive the prize. ‘ I went on the dais. Received my prize. It was a beautiful Ladies Purse. After I took my prize, I went to Anchor Mr.Shenoy and said ‘ Shenoy, could I speak for two minutes? ‘ He said ‘Yes. Why not? Please come.’ I went to mike and said ‘ Respected Director, Faculty members, my hostel friends, ladies and gentlemen, I am extremely thankful to you all. I especially thank the Juries of our Fresher’s Night program who selected me as the Hostel Queen of the year. Let me now share with you as to why the Juries Mr. Agrawal and saradar Virdi, who are my seniors, selected me as the Hostel Queen.

इसके लिये आप सब की इजाजतसे मै यहा दो शेर सुनाना चाहूँगा। पहला शेर है मिर्ज़ा गालिब का । और दूसरा शेर है मेरा। गालिब साब ने कहा है---

‘ आईना देखके मुह अपनासा लेके रह गये, हुजूर को अपना दिल न देने पे कितना गुरूर था,

कासिद को अपने हाथसे गर्दन न मारीये, उसकी खता नहीं है ये, तेरा क़ुसूर था। '

मतलब, गालिब साब ने कहा है की, हुजूर अपने आपको बहुत खुबसुरत समजते थे। अपना दिल न देनेपर उनको बहुत गुरूर था। पर जब आईना देखा

तो मुह अपनासा लेके रह गये। फिर उनको गुस्सा आया तो आईना फोड़ ने लगे। तब गालिब सब आगे कहते है ‘ अरे भाई आइनेपर गुस्सा क्यू निकाल रहे हो ? उसको क्यू फोड़ रहे हो ? आईना तो बेचारा एक कासिद ( संदेश वाहक याने मेसेंजर ) है। तुम जैसे हो वैसे उसने दिखा दिया। यह तो तेरा क़ुसूर था। उसकी खता नहीं है । इसलिये कासिद को अपने हाथसे गर्दन न मारीये। और अब मेरा शेर सुनाता हू------

“ आईना देख के अपने आप पर गुरूर आया,

के इस बदसूरत पे भी हुस्न का सुरूर आया,

पर अंदर की बात बता देता हू दोस्तो,

हमे होस्टेल क्वीन चुननेमे एक सरदारका दिमाग काम जरूरआया।“

दोस्तो मुझे, हमारे सीनियर, सरदराजी विर्दी ने, होस्टेल क्वीन चुना था। “

हे ऐकल्या बरोबर सर्व जण मोठ्यानं हसले अन टाळयांचा कडकडाट झाला. मी माझ्या जागेवर गेलो अन सर्वासमक्ष ती लेडीज पर्स माझ्या बायकोला दिली. नंतर सर्व कार्यक्रम संपल्यावर आम्ही सर्व मेस मध्ये डिनर ला गेलो. मेस मध्ये माझे सर्व मित्र माझ्या बायकोचं अभिनंदन करायला लागले. व तिला पार्टी मागू लागले. तिचाही सर्वांशी आधीचा परिचय होताच. थोडा वेळ गप्पा मारून आम्ही परत क्वार्टर ला गेलो。 फक्त सहा महीने का होईना पण मला आय.आय.टी. च्या होस्टेल मध्ये राहायला मिळालं . हॉस्टेल

a

सोडलं तरी पुढचं दीड वर्ष मधून मधून मी हॉस्टेल मध्ये जायचो. तो एक वेगळा अन् अविस्मरणीय अनुभव होता. बरेच नवीन मित्र जोडता आले. आज 47 वर्षांनंतर ही त्यातले बरेच अजून माझ्या संपर्कात आहेत. बऱ्याच नवीन गोष्टी पाहायला,शिकायला मिळाल्या. अजूनही मला ते दिवस आठवतात. पुढे मी तीन वर्षानंतर परत आय.आय.टी.त पीएच. डी. करायला आलो. पण त्या वेळी मला सुरवातीपासूनच फॅमिली आकोमोडेशन मिळालं म्हणून हॉस्टेल वर राहायची पाळी आली नाही. पण त्याही वेळी होस्टेल च्या जुन्या आठवणी यायच्या अन् मी बरेच वेळा होस्टेल ला जायचो.

# होस्टेल वार्डन म्हणून

माझ्या विद्यार्थी जीवनात जवळ जवळ सहा वर्ष मी तीन वेगवेगळ्या होस्टेल मध्ये राहीलो. त्याबद्दल मी आधी लिहलंच आहे. होस्टेल मध्ये राहण्याने विद्यार्थी अनेक जीवनावश्यक गोष्टी शिकतात. वेगवेगळ्या प्रांताच्या, गावाच्या, धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या विद्यार्थ्यांबरोबर आपण राहतो. हळूहळू ते आपले मित्र होतात. आपापसात कसं राहावं , कसं बोलावं, हे आपण शिकतो. त्या काळात खऱ्या अर्थाने आपण एकमेकांच्या सुख दु:खाचे भागीदार असतो. अडीअडचणीत कोणाला मदत कशी करावी हे, अन टीमवर्क ही शिकतो. खऱ्या अर्थानं होस्टेल आपल्याला पुढच्या जीवनासाठी घडवतं, तयार करतं॰ म्हणूनच माझ्या मुलाला, तो मुंबईला व्ही.जे.टी.आय. ला शिकत असताना मी होस्टेल मध्येच ठेवलं. इतकंच काय, पुढे, माझी नात (मुलीची मुलगी ) पुण्याला जेव्हा इंजीनियरिंगला गेली, तेव्हा पुण्याला माझ्या मुलीचं घर असून सुद्धा आम्ही माझ्या नातीला तिच्या कॉलेज च्या मुलींच्या होस्टेल मध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला. पहिली तीन वर्ष ती होस्टेल मध्ये राहिली. फक्त फायनल यियरला ती घरी राहिली. ह्यामुळे मुलांमध्ये झालेला

बदल मी प्रत्यक्ष अनुभवला आहे. अगदी रूढ भाषेत सांगायचं तर होस्टेल मध्ये राहिल्याने, मुलं माणसाळली. हा पालक म्हणून माझा अनुभव आहे.

मी तर ह्याच्या ही पुढे जाऊन , औरंगाबादच्या माझ्याच इंजीनियरिंग कॉलेज च्या, मी राहलेल्या होस्टेलचा वार्डन म्हणून तीन वर्ष काम केलं. तिथेच होस्टेल जवळ वार्डन क्वार्टर मध्ये राहलो. त्या वेळी तर मी 250 विद्यार्थ्यांचा पालक होतो. मी स्वत: माझ्या संपूर्ण विद्यार्थी दशेत होस्टेल मध्ये राहलेला असल्यामुळे मला वार्डनचं काम खूप चांगल्या तऱ्हेनं करता आलं. मला होस्टेल च्या विद्यार्थ्यांच्या अडचणी, प्रॉब्लेम्स, विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, त्यांची भांडण, त्यांच्या ट्रिक्स, सारं काही चांगल्या रीतीने माहित होतं. अर्थात होस्टेल वार्डनचं काम मी, काही फार आनंदानं किंवा उदात्त हेतूनी स्वीकारलं नव्हतं. मला ते पत्करावं लागलं. त्याचं असं झालं, 1978 ला, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयात जानेवारी महिन्यात माझं लेक्चरर ह्या पदावरून असोशिएट, प्रोफेसर ह्या पदावर प्रमोशन झालं, अन माझी अमरावतीहून औरंगाबादला बदली झाली. औरंगाबादला गेल्या गेल्या घर शोधलं. पण, एक महिनाभर शोध करूनही माझ्या बजेट मध्ये घरभाडं बसेल असं, तीन खोल्याचं घर मला मिळेना. घरभाडी अमरावतीपेक्षा खूप जास्त होती. नेमकं त्याच दरम्यान औरंगाबादच्या कॉलेज मधील, एका प्राध्यापकाची पुण्याला बदली झाली होती. ते होस्टेलचे वार्डन असल्यामुळे वार्डनच्या क्वार्टर मध्ये राहायचे. त्यांनी महिन्या भरात ते क्वार्टर रिकामं केलं. कॉलेजला ताबडतोब नवीन वार्डन हवा होता. पण कोणीही प्राध्यापक वार्डन म्हणून जायला तयार नव्हता.

कारण, ते काम फार जिकीरीचं अन कटकटीचं होतं. मला तर घर हवं होतं. मग मी माझ्या दोन-चार प्राध्यापक मित्रांना अन काही सिनियर्सना विचारलं. ते म्हणाले, नको. इथे हॉस्टेल मध्ये फार कटकटी आहेत. इथे वार्डन म्हणून काम करण, म्हणजे पाच वर्ष आपलं आयुष्य कमी करून घेण्यासारखं आहे. पण मी घर शोधता शोधता फार जिकीरीस आलो होतो. माझी दोन्हीही मुलं लहान होती , त्यामुळे त्यांना अमरावतीला एकटं बायकोच्या अंगावर टाकून देणे शक्य नव्हतं. मग मी सरळ प्राचार्यांकडे गेलो आणि वार्डन म्हणून माझ्या अनुमतीचा अर्ज दिला. ते म्हणाले ‘ नक्की येता न ? मी हो म्हटलं . ते म्हणाले ‘या सामान घेऊन. ‘ मग आम्ही सर्व, जून 78 ला सामान घेऊन औरंगाबादला आलो.

वार्डन झाल्यानंतर मी अगदी मन लावून ते काम करू लागलो. विद्यार्थ्यांच्या अनेक तक्रारी होत्या. लाइट्स , सफाईगार ह्या नेहमीच्या तक्रारी अन् काही आमच्या कॉलेज ची बाहेर राहणारी गुंड प्रवृत्तीची मुलं, होस्टेल मध्ये रहायची, त्यांचा धुडगूस, पत्ते खेळणं, मारा माऱ्या वगैरे. हळूहळू एकेक काम हाती घेतलं. सर्व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून, खेळीमेळीनं त्यांचा विश्वास संपादन केला अन् काम करत गेलो. हे करताना बरंच काही शिकलो. विशेष म्हणजे, शांत डोकं ठेवून मन ओतून काम केलं की सर्व घडी सुव्यवस्थेत बसवता येते हे अनुभवावरून शिकलो. मी वार्डन म्हणून रूजू झाल्यानंतर एक आठ-दहा दिवसातच होस्टेल चे रेक्टर अन् दुसरे वार्डन ह्या दोघांनाही कॉलेजच्या जवळच्या सरकारी वसाहतीत ,सरकारी क्वार्टर मिळालं. त्याची ते

a

वाटच पाहत होते. त्यांनी ताबडतोब होस्टेल सोडून त्या सरकारी क्वार्टर मध्ये शिफ्ट होण्यासाठी प्राचार्यांना विनंती केली. प्राचार्यानी त्यांना सांगीतलं की ' असं एकट्या जाजू वर होस्टेलचं काम मला टाकता येणार नाही. शिवाय ते होस्टेल मध्ये आताच आले आहेत. तेव्हा तूर्तास मी, तुम्हा दोघांपैकी ज्याला, अगोदर, सरकारी क्वार्टर अलॉट झालं त्याला म्हणजे रेक्टर ला आधी परवानगी देतो. त्याप्रमाणे रेक्टर क्वार्टर सोडून गेले. रेक्टरचं क्वार्टर वार्डन क्वार्टर पेक्षा मोठं होतं. तो एक स्वतंत्र बंगलाच होता. आमच्याकडे इलेक्ट्रिकल डिपार्टमेंटला प्राध्यापक बी.ए. पाटील म्हणून बरेच सीनियर असलेले असोशीएट प्रोफेसर होते. ते ज्या घरात भाड्यानी राहत होते ते घर त्यांना छोटं पडत होतं. अनायासे आता हा रेक्टरचा बंगला रिकामा झाल्यानं त्यांनी रेक्टर म्हणून यायचा विचार केला. बंगला पाहूनही गेले. आमचे प्राचार्य गणेशराव ह्यांना जेव्हा ह्या गोष्टीची कुणकुण लागली तेव्हा त्यांनी पाटलांना बोलावून गळच घातली. कारण पाटील खूप काम करायचे. त्यांची पर्सनॅलिटी ही चांगली होती व ते विद्यार्थी प्रिय होते. प्राचार्यांच्या गुड बुक मध्ये होते. मग पाटील दोन-चार दिवसातच रेक्टर म्हणून आले. अगदी थोड्या दिवसात माझी अन् त्यांची चांगली मैत्री झाली. ( आता ते 84 वर्षाचे आहेत. जयसिंगपूर ला त्यांच्या गावी राहतात. अन् मला 80 वर्ष चाललंय. मी पुण्यात राहतो. अजूनही आमची मैत्री इतकी घट्ट आहे की अजूनही आठ दिवसातून एकदा आम्ही अर्धा अर्धा तास मोबाईल वर बोलतो. ) एवढंच नाही तर पाटील वाहिनी आणि माझी बायको ह्या खूप चांगल्या मैत्रिणी झाल्या. तसंच त्यांच्या

माझ्या मुलांचं ही. पुढे 15-20 दिवसानीच अमरावतीचे आणखी एक प्राध्यापक श्रो कान्हेड औरंगाबादला बदली होऊन आले. ते माझे मित्रच होते. अतिशय सज्जन माणूस आणि कोणत्याही कामाला सदा तत्पर. शिवाय डॅशिंग नेचरचा. कान्हेड रुजू झाल्यानंतर माझ्या घरी आले. तेही घराच्या शोधात होते. मी म्हणालो ' कान्हेड, येता का माझ्या शेजारी वार्डन म्हणून? हे बाजूला प्राध्यापक कुलकर्णी राहतात, त्यांना सरकारी क्वार्टर मिळालं आहे. त्यांना हे क्वार्टर सोडायचं आहे. रेक्टर बी.ए.पाटील आहेत. ते ही खूप चांगले आहेत. तुम आगये तो अपनी तीनो की अच्छी टीम बन जाएंगी. ' जास्त आढेवेढे न घेता ते हो म्हणाले. मग मी त्यांना अन् कुलकर्णींना घेऊन प्राचार्यांकडे गेलो. प्राचार्यांनी लागलीच तशी ऑर्डर काढली. त्यानंतरच्या शनिवारी रविवारी कान्हेड अमरावतीला गेले अन् वाहिनी, त्यांची मुलगी अन् सामान घेऊन आले. आमच्या तिघांची मग खूप छान टिम झाली. आम्ही जरी कामाची वाटणी केली असली तरी सर्व कामं आम्ही तिघं ही मिळून करायचो. होस्टेल ॲडमिशन मात्र फक्त मीच करायचो. मी विद्यार्थ्यांमध्ये जास्त वावरायचो त्यामुळे रूम अलॉटमेंट, रूम पार्टनर्स मीच ठरवायचो. कोणत्या रूम मध्ये कोणती तीन मुलं आहेत, कोणत्या वर्गाची आहेत इतकंच काय, त्यांची नावं ही माझ्या लक्षात असायची. त्यामुळे मी फ्रेंडली असलो तरी मुलं मला वचकून असायची.

सर्वात आधी आम्ही हॉस्टेल च्या मेंटेनन्सचं काम हाती घेतलं. जे सिविल वर्क असेल ते आम्हाला बी.अँड सी. कडून करून घ्यावं लागतं अन्

इलेक्ट्रिकलचं MSEB कडून. मग मी आणि कान्हेडांनी सर्व रूम्स, लॅटरीन-बाथरूम ला चक्कर मारून कुठे काय तुटलं, पडझड झाली ह्याची सविस्तर यादी तयार केली. बी.अँड सी.च्या डेप्युटी इंजीनियर आणि त्यांच्या माणसांना आणून सर्व दाखवलं अन ते काम लवकरात लवकर करून द्या नाही तर विद्यार्थी तुमच्या कडे मोर्चा घेऊन येतील असं त्यांना सांगीतलं. त्यानंतर सतत पाठपुरावा करून आम्ही ते करून घेतलं. तोच प्रकार आम्ही इलेक्ट्रिकल फिटिंग्ज बद्दल केला. आणि लटकत असलेले बल्ब, ट्यूब, केसींग सर्व रिपेयर करून, बदलून घेतलं.

दूसरा मुख्य प्रॉब्लेम होता तो साफ-सफाईचा आमच्याकडे 5 सफाई कामगार म्हणजे स्वीपर होते. एकाला एक मजला असे तीन स्विपरनी तीन मजल्याचं काम, एकला मेस हॉल, कॉमन रूम, समोरचं अन् आजूबाजूचं आंगण, अन् एकाला प्राचार्य, रेक्टर, वार्डन ह्या सर्वांचे क्वार्टर अशी कामाची वाटणी करून दिली होती. व दर महिन्याला ह्यात बदल केला जाईल हे ही सांगून ठेवलं होतं॰ पण ही स्वीपऱ मंडळी दिलेलं काम व्यवस्थित करायची नाही. काही रूम्स सोडून देत तर कधी संडास-बाथरूम अर्धवट साफ करून पळून जात. हयाबद्दल विद्यार्थ्यांच्या कायम तक्रारी असायच्या. मग आम्ही प्रत्येक विंग चा एक एक सेक्रेटरी विद्यार्थ्यांकडून निवडून घेतला. त्यानं त्या मजल्याचे, विंगचे व्हरांडे, लॅटरीन- बाथरूम साफ झाल्याचं पाहून त्या त्या स्वीपऱ च्या कागदावर तशी नोंद करून सही करावी असं सांगीतलं. तसंच प्रत्येक रूम मधील, कोणीही एका जणानं स्वीपऱ च्या कागदावर रूम नंबर

लिहून त्याच्या समोर क्लिंड ऑर नॉट असं लिहून नाव व सही करायची अशी नोटीस लावली. मग सर्व स्वीपरना एक एक वही दिली. व रोज तारीखवार त्यात ह्या सर्व सह्या घेऊन ती वही माझ्या घरी दिलीच पाहिजे अन् दुसऱ्या दिवशी सकाळी कामाला सुरवात करताना ही घेऊन गेलीच पाहिजे असं ताकीद देऊन सांगीतलं. ज्या दिवशी ही वही सर्व नोंदीसह माझ्या घरी आली नाही त्या दिवशी त्या स्वीपऱ ची बिन पगारी रजा धरण्यात येईल असं सांगीतलं. मी रोज लक्ष घालून ह्या वह्या तपासायचो. मला जवळ जवळ सर्व रूम मधल्या विद्यार्थ्यांची नावं माहीत होती त्यामुळे बनवा बनविला स्कोप नव्हता. शिवाय हॉस्टेल क्लार्कला ही रोज राऊंड घेऊन मला रीपोर्ट करायला सांगीतलं. याचा चांगला परिणाम झाला. तरी ही सफाईगार मंडळी त्यांच्या ट्रीक्स चालूच ठेवायची. आम्ही असं ऐकलं होतं की ही मंडळी चुगल्या करून वार्डन्स मध्ये बेबनाव निर्माण करायची. अन् मग, वो सर ने ऐसा बोला असं दुसऱ्या वार्डनला सांगून चाटा मारायचे. आमच्याकडे एक इस्माईल म्हणून( मी नाव बदललं आहे ) स्वीपऱ होता. तो बरेच वेळा दारू प्यालेला असायचा. एक दिवस सकाळी मी हॉस्टेल च्या राऊंड वर असताना तो मधल्या मजल्यावर काम करत होता. मी त्याला म्हटलं, ‘ क्यु इस्माईल ठिकसे चल रहा न काम ? ‘ तो म्हणाला ‘ हा साब. साब आप कितनी अच्छी तरहसे बात करते है, समझाकर बोलते है, वो दुसरे वार्डन तो हरदम गरम होकर बोलते है, गालिया देते है। हम भी ऊनको देख लेंगे.’ मी त्याच्याकडे रोखून पाहिलं, अन म्हणालो, ‘ इस्माईल, वार्ड्न लोगोमे झगडे लगाकर मौज करनेके ये तरीक्के

बहुत पुराने हो चुके है. वो साब और मै एकही जगहसे आये है. और ऊनको मै पिछले दस साल से जनता हू. और ऊनको तुम क्या देख लोगे, मै ही तुमको देख लुंगा. हरदम शराब पिकर कामपर आते हो, एखाद दिन पोलिस को बुलाकर, सरकारी अस्पताल मे तुम्हारी जाच करवाऊंगा तो सस्पेण्ड हो जाओगे. ये सब बंद करो. कामसे काम करो तो तुमको कुछ भी तकलीफ नही होगी. ‘ मी वर गेलो की विद्यार्थ्यांशी बोलायचो. त्यामुळे त्यांचं ही सहकार्य मला मिळू लागलं.

आता महत्त्वाचा प्रॉब्लेम राहिला होता, तो म्हणजे पॅरासाईट्सचा. काही विद्यार्थ्यांची हॉस्टेल मध्ये अॅडमिशन नसूनही ते हॉस्टेल मध्ये चोरून, आपल्या मित्रांना पटवून राहायचे. पत्ते खेळायचे. रात्री उशिरापर्यंत धिंगाणा करायचे. मी, कान्हेड आणि पाटील साहेब रात्रीही राऊंड घ्यायला लागलो. पहिल्यांदा काही होस्टेलर ना विश्वासात घेऊन कोण कोणत्या रूम मध्ये ही मंडळी राहते, कोणत्या रूम मध्ये पत्त्यांचे डाव सुरू असतात ह्याची माहिती काढली. हे खेळणारे लोक दादागिरी करायचे. त्यामुळे इतर विद्यार्थी त्यांची तक्रार करायलाही भ्यायचे. हे आम्ही आधी काही दिवस पाहीलं. मग आम्ही तिघांनी ठरवलं की एक दिवस रात्री 11 वाजता काहीही आवाज न करता, दोन वॉचमन बरोबर घेऊन ज्या रूम मध्ये पत्ते खेळणं चालू असतं त्या रूम वर धाड मारायची अन् रंगे हात पकडून त्याच्या त्या वेळी ज्या दोन मुलांची ती रूम आहे त्यांना हॉस्टेल सोडायला लावायचं. काही ही दयामाया न दाखवता. माझ्या माहिती प्रमाणे त्या रूम मध्ये फायनल यीयर चे दोन विद्यार्थी राहायचे.

a

खरं म्हणजे त्या दोघांपैकी एक हॉस्टेल मध्ये न राहता बाहेर राहणारा होता. त्यानं त्या दुसऱ्याच्या, ज्याचं नाव राठी असं होतं. (नाव मी बदललं आहे) त्याच्या सांगण्यावरून हॉस्टेल मध्ये ॲडमिशन घेतली होती अन् त्याच्या ऐवजी त्या राठीचा कॉमर्स कॉलेज मध्ये असलेला, धाकटा भाऊ तिथे राहायचा. ह्या राठीचे एक दूरचे मामा खासदार होते म्हणे. म्हणजे, असं तो सगळी कडे सांगायचा. ही सर्व माहिती आम्ही आधीच काढली होती. आमचे काही वॉचमन पूर्वी मिल्ट्री मध्ये काम केलेले होते. त्यांना एक्स सर्व्हिसमन म्हणायचे. मग एका रात्री त्या रूम मध्ये डाव चाललेला आहे, हे कन्फर्म करून आम्ही तिघं दोन वॉचमन ना अन एका खालच्या मजल्यावरच्या विद्यार्थ्याला बरोबर घेऊन त्या रूम वर गेलो. त्या विद्यार्थ्याला आधीच सांगून ठेवलं होतं की तू त्यांच्या रूमचं दार ठोठावायचं अन् आतून कोण आहे रे असा आवाज आला की , मी च आहे रे. उघड. एवढं बोलून ताबडतोब निघून जायचं. ठरल्या प्रमाणे सर्व घडलं. आत पाच-सहाजण पत्ते म्हणजे जुगारच खेळत होते. आम्हा तिघांना अन वॉचमन ना पाहून ते गडबडून गेले. मग मी राठी ला म्हणालो, ‘राठी काय चाललं हे?’ तो आमच्या मेकॅनिकलचाच विद्यार्थी होता. मला वचकूनच होता. तो म्हणाला ‘ काही नाही सर . एखाद्या वेळेला बसतो सर. ‘ मी म्हणालो ‘तुझा रूम पार्टनर मुंदडा कुठे आहे ?’ मग त्याच्या भावाकडे पाहून म्हणालो, हा कोण बाहेरचा? ‘ तो म्हणाला ‘ मुंदडा त्याच्या नातेवाईकाकडे गेला आहे. अन हा माझा धाकटा भाऊ मला भेटायला आला आहे सर.’ मी म्हटलं ‘किती खोटा बोलशील राठी ? आम्ही सर्व माहिती काढून आलो आहे.

a

आम्हाला माहीत आहे की मुंदडा हॉस्टेल मध्ये राहतच नाही अन् त्याच्या ठिकाणी हा तुझा भाऊ राहतो. तुम्ही नेहमी ह्या रूम वर पत्ते खेळत असता. ' मग कान्हेड सरांनी त्यांची सर्वांची नावं अन् वर्ग लिहून घेतले. ते सर्व आमचेच पण बाहेर राहणारे विद्यार्थी होते. मग पाटील साहेबांनी राठीला खूप दाटलं. अन् आत्ताच्या आत्ता तू रूम सर्व सामाना सहित रिकामी कर,असं त्याला सांगीतलं. तो म्हणाला, ' सर, असं परत होणार नाही. ह्यावेळी माफ करा.' आम्ही त्याचं काही एक ऐकायला तय्यार नव्हतो. एव्हाना आणखी होस्टेलर ही तिथे जमा झाले. तो म्हणाला ' सर एवढ्या रात्री आम्ही दोघं कुठे जाणार? आम्ही सकाळी सोडतो वाटल्यास. ' आम्ही म्हटलं नाही. वॉचमन ना त्याच्या गादीची वळकटी वगैरे घेऊन खाली जायला सांगीतलं. तो म्हणाला 'सर, एवढ्याशा चुकीसाठी तुम्ही मला फार जास्त शिक्षा देत आहात. ' आम्ही बाकीच्या विद्यार्थ्यांना आपआपल्या रूम मध्ये जायला सांगीतलं. मग मी राठीला म्हणालो ' तुला आज हॉस्टेल सोडून जावंच लागेल. ही एवढीशी चूक नाही. आम्ही प्राचार्यांना रीपोर्ट केला तर ते तुला रस्टीकेट सुद्धा करू शकतात एवढी मोठी ही चूक आहे. तू चुपचाप ऐकलंस तर आम्ही रीपोर्ट करणार नाही. नाही तर आम्हाला तो करावा लागेल. अन् इथले खासदार तुझ्या कुठल्या तरी दूरच्या नात्यात आहेत हे ही आम्हाला माहीत आहे. आम्ही त्यांच्याकडे जाऊन, तुझ्या ह्या भानगडी त्यांना रायटिंग मध्ये देवू. अन सर्व सांगू. ' मग तो म्हणाला ' सर मी आता जातो. पण सामान उद्या घेऊन जाईन.' पाटील साहेब म्हणाले. ' ठीक आहे. खोलीला आमचं कुलूप लावतो तुझ्या अन् सर्वांच्या

समोर. तू उद्या मला भेट. अन् सामान घेऊन जा. मला रूम उद्या रिकामी पाहिजे. ‘ तो हो म्हणाला. आमच्या वॉचमनला पाठवून पाटील साहेबांनी त्यांच्या घरचं कुलूप मागवलं. ते सर्वांसमक्ष लावलं. तो, त्याचा भाऊ आणखी एक मित्र आमच्या बरोबरच खाली उतरले अन निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसहा वाजताच माझ्या घराचं दार कोणी तरी ठोठावलं. मी स्वत:चं दार उघडलं. पाहतो तर समोर राठी उभा. त्याच्या हातात पत्त्यांचे दोन पॅक. मला पाहताच त्यानं ते दोन्ही पॅक माझ्या पायावर ठेवले मला नमस्कार केला अन म्हणाला ‘ सर ह्यावेळी एकदा माफ करा सर. पुढून मी असं काही करणार नाही. ‘ मी त्याला घरात बोलावलं, ‘ म्हटलं बस. आता सांग काय म्हणणं आहे तुझं ? ‘ तो म्हणाला, ‘ चुकलो सर. माफ करा. मी माझ्या भावाची राहण्याची दुसरी व्यवस्था करतो. अन सर शपथ घेतो, आजपासून पत्त्याला हात लावणार नाही. पण मला होस्टेल मधून काढू नका सर. हे शेवटचं वर्ष आहे. माझी फार बदनामी होईल सर. सर्व मित्र हसतील मला. मी कान धरतो. सर तुम्ही फार चांगले आहात. सर्व विद्यार्थी म्हणतात, तुम्ही नक्की माझी विनंती ऐकाल. प्लीज. ‘ मी बायकोला आवाज दिला अन म्हणालो, ‘आमचा दोघांचा चहा कर’ मग मी त्याला म्हणालो. ‘ तू आता अंत्य वर्षाला आहे. चांगला अभ्यास कर अन चांगल्या मार्कांनं पास हो, म्हणजे नोकरी मिळेल. ते सोडून तू ह्या फालतू गोष्टी करून स्वत:चं तर नुकसान करतोच आहे पण होस्टेल चं वातावरण खराब करतो आहे. अन तू चांगल्या घरचा आहेस. मागे काही दिवसांपूर्वी तुझे वडील आले होते. तेव्हा त्यांना

a

तुळशीला पाणी घालण्यासाठी आमच्या खालच्या बागेत आणलं होतं. त्यांच्या कपाळावर कपाळ भरून चन्दन होतं व तोंडानं ते हरी पाठ म्हणत होते. मी खिडकीतून पाहिलं. तुझे हे धंदे त्यांना कळले तर त्यांना किती वाईट वाटेल ह्याचा कधी विचार केला तू ? ’ तो खाली बघून चुपचाप सगळं ऐकत होता. चहा आला. मी म्हटलं घे. अन् चहा घेता घेता पुढे बोलू लागलो. ‘ तुझ्यावर ॲक्शन तर पाटील साहेब घेतील. तुला माफ करून हॉस्टेल मध्ये राहू द्या असं मी त्यांना म्हणणार नाही. तुला स्पष्ट सांगतो असं काही मी केलं तर सर्वांना वाटेल की तू माझ्या जातीचा आहे म्हणून तुझ्यावर काही ॲक्शन झाली नाही. लोकांना बोलायला काय लागतं ? अन् ते मला मुळीच आवडणार नाही. मी एक करू शकतो. त्यांना विनंती करून, ह्या गोष्टीचा प्राचार्यांना किंवा कोठेही रीपोर्ट करू नका. राठीच्या त्या खासदार नातेवाईकांना ही काही ही कळवू नका. जास्त काही प्रकरण वाढवू नका. त्यासाठी तुला फक्त एकाच करावं लागेल. तुला होस्टेल सोडावंच लागेल. नाही तर ह्याचा रीपोर्ट झाला तर तुला प्राचार्य एखाद वर्षासाठी रस्टीकेट ही करतील. हे सगळं टाळायचं असलं तर हॉस्टेल सोड. बाहेर खोली घे. दोघं भाऊ एकत्र रहा. चांगला अभ्यास करा अन चांगल्या रीतीनं पास व्हा. आई-वडलांनाही आनंद होईल. अन् हे बघ तू माझ्या पायावर पत्ते ठेवून माफी मागीतली, शपथ घेतली म्हणजे तू रातोरात सुधारला आहेस असं मला वाटलं असेल, असा तुझा भ्रम झाला असेल, तर मी इतका दूध खुळा नाही. ह्या अशा गोष्टी सहजासहजी सुटत नाहीत. त्यासाठी संगत सोडावी लागते. मनाची तयारी करावी लागते. तरी ही मी तुला इतका

वेळ समजावलं कारण आज नाही पण पुढे कधीतरी तुला ह्या गोष्टींचा पश्चाताप झाला तर त्या दिवशी मला आजची गुरु-दक्षिणा मिळाली असं मी समजेन. आता तू ठरव. अन पुढे तुला काही विषयात, अभ्यासात अडचण आली किंवा आणखी कोणता प्रॉब्लेम आला तर तू मला कधी ही भेट. मी तुझ्याबद्दल मनात कुठलीही आधी ठेवणार नाही. समजलं ? ‘ त्या दिवशी त्यानं पाटील साहेबांकडून सामान घेऊन हॉस्टेल सोडलं. पुढे तो मधून मधून भेटायचा कारण त्याच्या वर्गाला मी एक विषय शिकवायचो. ‘ कसा चालला आहे अभ्यास? ‘असं विचारलं की चांगला करतो सर असं म्हणायचा .त्याच्या रूम मध्ये मुंदडा म्हणून ज्या विद्यार्थ्यांनं हॉस्टेलची अॅडमिशन घेतली होती पण तिथे जो राहायचा नाही, त्यालाही मी बोलावून खूप दाटलं. तो राठीच्या वर्गातच होता. राठी त्या वर्षी बऱ्या मार्कानं पास झाला. त्यानं हॉस्टेल सोडलं तेव्हाच आम्ही नोटीस लावली होती की कोणत्याही रूम मध्ये बाहेरचा कोणी राहतो आहे हे आढळून आलं तर, त्या रूम मध्ये राहणाऱ्या होस्टेलरांना हॉस्टेल मधून काढून देण्यात येईल. ह्या सगळ्या प्रकारानं हॉस्टेल मधले असे प्रॉब्लेम्स हळू हळू खूप कमी झाले. मुलं ही खुष होती० आमच्या प्राचार्यांचं ह्या गोष्टींकडे बारीक लक्ष असायचं. त्यांना हे हॉस्टेल चे हालहवाल आमच्या कर्मचाऱ्यांकडून काळायचे. आणि त्यांची दोन्ही ही मुलं आमच्याच कॉलेज मध्ये शिकत होती. एक थर्ड अन् एक फर्स्ट यियरला होता. बरेच होस्टेलर त्यांचे मित्र होते. त्यामुळे त्यांच्या मुलांकडून ही त्यांना कळायचं.

a

नंतर आम्ही काही दिवसांनी होस्टेल सेक्रेटरी, जॉइंट सेक्रेटरी, ट्रेझरर, विंग सेक्रेटरीज ह्यासाठी होस्टेल च्या निवडणुका घेतल्या॰ एका रात्री आम्ही मेस हॉल मध्ये मुलांचं मतदान घेतलं. मी, पाटील साहेब, कान्हेड आम्ही तिघंही बसलो. एका कोपऱ्यात मत पेटी ठेवली. माझ्या समोर एक रजिस्टर होतं त्यात प्रत्येक मत देणाऱ्या विद्यार्थ्याचं नाव व रूम नंबर लिहून सही केल्याशिवाय पुढे मतदानाला जाता येत नव्हतं. मुलं एका रांगेत उभी राहिली. एक एक मुलगा आमच्या टेबलवर आला की मी त्याचं नाव रूम नंबर लिहून सही घेत होतो. एक मुलगा पुढे सरकला की येणाऱ्या मुलाचं नाव व रूम नंबर त्याला न विचारता मी लिहायचो. त्याला फक्त सही करावी लागायची. थोडावेळ हे पाहल्यावर पाटील साहेब मला म्हणाले, ‘ अहो जाजू, तुम्ही कॉम्प्युटर की काय? मुलांची नावं, रूम नंबर पाठ. अजबच आहे. कसं काय लक्षात ठेवता तुम्ही हे ? ‘ मी म्हटलं, ‘ मी काही ती पाठ करत नाही. त्यांच्या हॉस्टेल ॲडमिशन, रूम अलॉटमेंट च्या वेळी लिहताना त्यांची नावं अन चेहरे माझ्या लक्षात राहतात. शिवाय मी रोज एकतरी राऊंड हॉस्टेलचा घेतो. तेव्हा काही विद्यार्थ्यांशी बोलत असतो. प्रत्येक नावाला आपले फोनेटिक्स असतात. ते माझ्या लक्षात राहतात.’ त्या रात्री केवळ पाटील अन् कान्हेडनाच नाही तर मुलांनाही ह्या गोष्टीचं आश्चर्य वाटलं. त्यांना हे ही कळलं की जाजू सरांना आपलं नाव अन् रूम नंबरही माहीत आहे. त्यामुळे माझ्या समोर त्यांना काही बनवाबनवी करता यायची नाही. आमच्या तिघांच्याही त्यांच्या मधल्या वावरानं, आमही हॉस्टेलच्या घेत असलेल्या काळजीनं आमच्या विषयी

त्यांना आदर युक्त वचक वाटू लागला. एकदा प्राचार्यांबरोबर झालेल्या आमच्या प्राध्यापकांच्या बैठकीत प्राचार्यांनी, होस्टेल मध्ये, होस्टेलच्या वातावरणात झालेल्या सुधारणा सांगून आमच्या कामाची स्तुती केली॰ सर्व होस्टेलर ची नावं, त्यांचे रूम नंबर जाजूंना पाठ आहेत हे त्यांनी आवर्जून सांगीतलं.

दुसऱ्या सत्रात एक वाईट घटना घडली. ती आठवली की अजूनही माझं मन गलबलून जातं. आमच्या होस्टेल मध्ये फायनल यियर इलेक्ट्रिकल चा एक विद्यार्थी ऐ. डी. भोंडवे राहायचा. खूप चांगला अन अभ्यासू गरीब घरचा विद्यार्थी होता. मला वाटतं, त्याचे वडील एक प्रायमरी शिक्षक होते. बहुदा मार्च महिन्याची सुरवात झाली असेल. एप्रिल मध्ये विद्यापीठाच्या परीक्षा असल्यामुळे सर्व विद्यार्थी आपआपल्या टर्म वर्क सबमिशन च्या अन अभ्यासाच्या गडबडीत होते. अशा वेळी इंजिनियरिंग चे विद्यार्थी रात्र दिवस एक करतात. एक दिवस माझ्याकडे फायनल यियरचे तिसऱ्या मजल्यावर, बहुदा रूम नंबर 85 मध्ये राहणारे दोन विद्यार्थी आले. म्हणाले, ‘ सर आमचा पार्टनर भोंडवे ह्याची तब्येत खूप खराब झाली आहे. आज सकाळ पासून त्याला तिन-चार वांत्या झाल्या. सर सात-आठ दिवसांपासून तो अगदी कमी जेवतो. खूप अशक्त ही झाला आहे. चार पाच दिवसांपूर्वी आपल्या उस्मान्पुऱ्यातल्या एका डॉक्टर ला ही दाखवलं होतं. ते औषधही सुरू आहे सर. पण काही फरक पडला नाही. तो आराम ही करत नाही सर. सारखा टेर्म वर्क अन् अभ्यास करत असतो. तब्येतीकडे लक्ष देत नाही. आज सकाळ

a

पासूनच त्याला बरं नाही. सर आम्हाला वाटतं त्याला गवर्नमेंट मेडिकल कॉलेज च्या हॉस्पिटल मध्ये घेऊन जावं. तुम्ही आम्हाला तसं पत्र द्या सर म्हणजे ते त्याला लवकर पाहतील अन चांगली ट्रीटमेंट देतील. ' मी म्हटलं तुम्ही वर चला. मी अन पाटील साहेब येतो बघायला.' पाटील साहेब इलेक्ट्रिकल डिपार्टमेंटचेच होते. तो विद्यार्थी त्यांच्या चांगल्या ओळखीचा होता. आम्ही दोघं त्याच्या रूम वर गेलो. तो खूप अशक्त वाटला. त्याला म्हटलं ' अरे इतक्या दिवस अंगावर कशाला काढलं दुखणं ? आधी नाही का सांगायचं? टर्म-वर्क वगैरे नंतर करता आलं असतं. पाटील सरांनी सर्व प्राध्यापकांना सांगून तुझी सबमिशन ची डेट वाढवून दिली असती.' मग आम्ही त्याच्या मित्रांना म्हणालो तुम्ही ऑटोरिक्शा करून ह्याला मेडिकल कॉलेज ला न्या. पत्र-बित्र काही नको. आम्ही तुमच्या मागेच स्कूटरवर येतो. ' मग आम्ही सारे त्याला घेऊन मेडिकल कॉलेज ला गेलो. तिथल्या सीनियर डॉक्टरांना आमची ओळख सांगून , सर्व परिस्थिती सांगून त्याला लवकर बघून ट्रीट करा अशी विनंती केली. त्यांनी ताबडतोब त्याला तपासून ह्याला आताच ॲडमिट करावं लागेल असं सांगीतलं. त्याचा बऱ्याच दिवसांपासून झालेला जॉन्डिस अगदी वाईट अवस्थेला पोहचला आहे. बहुदा त्याच्या लिव्हर वर ही परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. आम्हा काही टेस्ट करून ट्रीटमेंट सुरू करावी लागेल असं ते म्हणाले. त्याप्रमाणे त्याला तिथे ॲडमिट केलं. मुलांना सांगीतलं तुम्ही एक दोन जण पाळीपाळीनं त्याच्या जवळ रहा. डॉक्टर सांगतील तसं त्याला जेवायला द्या. इथे मेडिकल मध्येच ते औषधं देतात.

a

काही बाहेरून आणावं लागलं तर आणा. पैशांची काळजी करू नका. आम्ही व्यवस्था करू. आम्ही परत संध्याकाळी येतो अन् डॉक्टरनाही भेटतो॰

मग आम्ही परत आलो अन् संध्याकाळी तिघंही मेडिकलला गेलो. डॉक्टर म्हणाले, ‘ We just got the reports of his tests. We have accordingly started the treatment. Its quite serious. Will need long treatment. He will have to be in hospital for 15-20 days. He will get his food etc from hospital only. Ask your students not to give him anything to eat without our permission. ‘ विद्यार्थी हे सगळं ऐकतच होते. त्यांना म्हटलं तुम्ही काही जणांची एक टिम करा॰ व आळीपाळीनं दोन दोन जण ह्याच्या बरोबर दवाखान्यात रहा. रात्री सुद्धा रहावं लागेल. अन त्याच्या वडीलांचा आम्हाला पत्ता द्या. आम्ही ऑफिशियली त्यांना कळवतो, पण तुम्हीही एक सविस्तर पत्र लिहून त्याच्या वडीलांना कळवा. आम्ही रोज संध्याकाळी हॉस्पिटल ला चक्कर मारू. तुम्हाला काही अडचण असल्यास आम्हाला सांगा. औषधं ते दवाखान्यातूनच देतात. पण बाहेरून काही आणायचं सांगीतलं तर व घेऊन या. पैशाची काळजी करू नका. आम्ही व्यवस्था करू. आमचं पत्र मिळताच म्हणजे चार दिवसांनी त्याचे वडील आले. त्यांना आम्ही सर्वांनी धीर दिला. दवाखान्यात इलाज सुरू आहे. मुलंही काळजी घेतात आहे असं सांगीतलं. ते म्हणाले ‘ रोज मी त्याच्या जवळ आहेच. रात्रीपण मी इथेच झोपत जाईन. एक विद्यार्थी सोबतीला असला तरी पुरे. आम्ही रोज संध्याकाळी एक चक्कर

a

तिकडे मारून यायचो. औषधं सुरू होती पण प्रकृतीत विशेष सुधारणा वाटत नव्हती.

आणखी चार-पाच दिवस गेले असतील. एक दिवस सकाळी चार वाजताच काही विद्यार्थ्यांनी मला उठवून सांगीतलं ‘ सर थोड्या वेळापूर्वीच भोंडवे वारला. ‘ मी शेजारच्या कान्हेडांना उठवलं. पाटील साहेबांनाही उठवलं. मुलांना म्हटलं तुम्ही निघा. आम्ही निघालोच हॉस्पिटल ला. तिथे पोहचलो. बरेच होस्टेलर अन त्याचे वर्गमित्र जमा झाले होते. त्याच्या वडलांच सांतवन कसं करावं आम्हाला कळेना. एका प्रायमरीच्या शिक्षकाचा चार महिन्यांनी इंजीनियर होणारा, हाता-तोंडाशी आलेला, मुलगा ईश्वरानं असा उचलून नेला होता. ते सारखे रडत होते. त्यांना शांत करून, तुम्ही प्रेत गावी घेऊन जाणार की इथेच सगळं आटोपायचं ते सांगा असं आम्ही विचारताच ते म्हणाले. ‘ साहेब गावी तर न्यावंच लागेल. घरी त्याची आई, भाऊ-बहीण आहेत.’ पाटील साहेब अन् दोन चार मुलं मग हॉस्पिटलला त्याप्रमाणे सांगून त्यांच्या कडून सर्व कागद पत्र घेऊन प्रेत ताब्यात घेण्याविषयी विनंती करायला गेले. इकडे आम्ही दोघांनी अन इतर मुलांनी मिळून ठरवलं की सातआठ जण बसतील एवढी एक टॅक्सी ठरवायची. भोंडवेच्या एका वर्ग मित्राचं कापड दुकान होतं. तो म्हणाला मी शवासाठी लागणारं कापड अन इतर सामान घेऊन येतो. तीन चार जण त्या कामाला लागले. थोड्या वेळात मुलांनी टॅक्सी ही आणली. आम्ही सर्वांनी मिळून दोन- तीन हजार रुपये जमा केले० प्राचार्यांना कळवूनच आम्ही ईकडे आलो होतो. थोड्या वेळात प्राचार्य व विद्युत

विभागाचे प्रमुख व आणखी एक दोन प्राध्यापक आले. सर्वांनी मदत केली. प्राचार्यांनीही भोंडवेच्या वडलांना धीर दिला. आम्ही आताचा सर्व खर्च करू अन् पुढेही जमेल तशी थोडी मदत करू असं त्यांना सांगीतलं. तुम्ही शांत रहा अन् काळजी करू नका असंही सांगीतलं० साधारणत: दहा एक वाजता निघण्याची तयारी झाली. त्यांच्या बरोबर सहा-सात विद्यार्थी ही गेले० सर्व मुलं अन् आम्ही मग होस्टेलला आलो. थोड्या वेळातच आम्ही सर्व होस्टेलर व इतर जमलेल्या मुलांबरोबर मेस हॉल मध्ये शोक सभा घेतली. सर्वांना अतिशय दु:ख झालं होतं. काहीजण तर खूप रडले. आम्ही सर्वांनी मग तिथेच ठरवलं की चार-पाच दिवसात सर्वांनी मिळून, आपल्या मर्जी प्रमाणे त्याच्या वडलांना मदत करण्यासाठी, वर्गणी जमा करायची व त्यांना पोहचवायची. सर्वजण तयार झाले. पुढल्या पाच दिवसात आम्ही तिघं, त्यांच्या विभागाचे काही प्राध्यापक व विद्यार्थी, सर्व होस्टेलर्र् मिळून, मला आठवतं साडेसात आठ हजार रुपये जमा केले. त्या मानानं बारी रक्कम जमा झाली होती. ( त्या वेळी म्हणजे 1979-80 ल सोन्याचा भाव 10 ग्राम ला 1350 रुपये होता.आज तो 46500 आहे. म्हणजे आजच्या दरानं ते साधारणत: अडीच लाख रुपये जमले होते ). आणही मग रीतसर प्राचार्यांच्या सहीचं पत्र व घ्यायची पावती तयार करून दोन विद्यार्थी अन् होस्टेल क्लार्क ला रक्कम घेऊन भोंडवेच्या गावी पाठवलं. शोक संदेश अन ती मदत त्याच्या वडीलांना दिली. बरेच दिवस आम्ही हळहळत राहिलो.

a

असे अनेक छोटे-मोठे प्रसंग, घटना मला अजूनही आठवतात. माझं 1981 च्या एप्रिल मध्ये आय.आय.टी. मुंबई इथे पीएच.डी. साठी सिलेक्शन झालं अन सरकारनं ही मला डेप्युटेशन वर पाठवायचं ठरवलं. एक सप्टेंबर 1981ला मला आय.आय.टी.त रुजू व्हायचं होतं. ऑगस्ट च्या महिन्यात आमच्या हॉस्टेल च्या मुलांनी कॉलेज च्या जिमखाना हॉल मध्ये मला निरोप देण्यासाठी समारंभ आयोजित केला. त्या समारंभाला आमचे प्राचार्य, रेक्टर पाटील साहेब, प्रा.कान्हेड, व आमच्या मेकॅनिकल डिपार्टमेंट चे सर्व प्राध्यापक ह्यांना आमंत्रित केलं होतं. माझा एक वर्गमित्र, सर्व्हिस लागल्या पासून आमच्याच डिपार्टमेंट ला लेक्चरर होता. सेंड-ऑफ च्या दिवशी तो मला म्हणाला, जाजू, गेल्या पंधरा वर्षात या महाविद्यालयात, विद्यार्थ्यांनी प्राध्यापकाला दिलेला, हा पहिला सेंडऑफ आहे. तो हृद्य प्रसंग मला एका खास कारणासाठी निरंतर आठवतो. माझ्या सेंडऑफ च्या दिवशी स्टेज वर आमचे प्राचार्य, विभाग प्रमुख, हॉस्टेलचे रेक्टर पाटील साहेब, दोन वरिष्ठ प्राध्यापक उपस्थित होते. हॉलमध्ये पाचशे तरी विद्यार्थी असावेत. जवळजवळ आठ-नऊ, वेगवेगळया वर्गाचे अन् वेगवेगळया ब्रांचचे, होस्टेल मध्ये राहणारे विद्यार्थी, स्टेज वर येऊन बोलल्यानंतर, प्राचार्यांनी स्वत: भाषण सुरू करण्यापूर्वी, मुलांना विचारलं "आणखी कोणाला बोलायचं आहे काय" तेव्हा थर्ड इयर सिव्हील चा एक विद्यार्थी, एन.जे. पैलवाड म्हणून उभा राहिला आणि म्हणाला "सर मला थोडं बोलायचं." तो जे बोलला ते, त्याच्याच शब्दात मी खाली लिहितो आहे. मला अजून आठवतं सगळं. तो म्हणाला---

a

“ सर आणि मित्रांनो मी थर्ड इयर सिव्हिल चा विद्यार्थी. जाजू सर मेकॅनिकलचे. त्यामुळे त्यांनी मला एकही विषय शिकवलेला नाही. बर मी आपल्या कॉलेजच्या होस्टेल मध्येही राहत नाही. मी भटक्या आणि विमुक्त जमाती चा असल्यामुळे मला संत तुकाराम बॅकवॉर्ड क्लास होस्टेल मध्ये जागा मिळाली आहे. त्यामुळे होस्टेल वर मी राहिलेलो नसल्यामुळे माझा तसा त्यांच्याशी काही संबंध आलेला नाही. पण मला त्यांच्या बद्दल वेगळंच काही सांगायचं आहे. मला शाळेपासून गणिताची म्हणजे मॅथेमॅटिक्सची खूप आवड आहे. वेगवेगळे, मॅथेमॅटिक्स चे प्रॉब्लेम्स निराळ्या तऱ्हेनी करून पहायचे हा माझा छंद आहे. मागच्या वर्षी मी कॉड्रॅटिक इक्वेशन सोडवण्याची एक वेगळी अन् सोपी पद्धत विकसित केली. मला पूर्ण खात्री झाल्यावर मी आमच्या गणितांच्या दोन्ही प्राध्यापकांकडे गेलो. त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी माझं पुरतं ऐकूनही न घेता, मला पळवून लावलं. आमच्या विभागातल्या एका प्राध्यापका कडे गेलो, ते म्हणाले असं काही नसतं. माझी पद्धत मी सांगायला गेलो तर म्हणाले तू गणित वाल्यांना दाखव. मी गरीब मुलगा, माझा अवतार आणि कपडे हे असे. कदाचित मी काही वेड्यासारखे करतोय असं त्यांना वाटलं असावं. मग मी आमच्या संत तुकाराम हॉस्टेल मधल्या काही अभ्यासू आणि हुशार विद्यार्थ्यांना, मित्रांना ती पद्धत समजावून पटवून दिली. त्यात दोन मेकॅनिकल चे ही विद्यार्थी होते. ते म्हणाले अरे तू आपले होस्टेल वार्डन जाजू सर आहेत त्यांच्याकडे घेऊन जा. ते नक्की तुला मदत करतील. मग मी सरांच्या कॉर्ट्रवर सर्व घेऊन गेलो. त्यांनी मला, मी कोण, कोणत्या वर्गातला,

a

कुठे राहतो, काय काम आहे असं सर्व विचारलं. मी त्यांना सर्व सांगितलं. त्यांनी मला घरात बोलावून शेजारी सोफ्यावर बसवलं आणि म्हणाले आता तू काय आणलं ते मला समजावून सांग. जवळपास तासभर मी त्यांच्याबरोबर बसून त्यांना सर्व लिहून सोडवून दाखवलं. त्यांनी मला त्यातले काही कागद ठेवून दे , मी परत रात्री वाचतो असं सांगीतलं. उद्या माझ्या 1-2 प्राध्यापक मित्रांशी मी चर्चाही करतो असेही ते म्हणाले. तू उद्या संध्याकाळी परत भेट असे त्यांनी मला सांगीतलं. मी परत दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी सांगीतलं, तू फार चांगलं काम केलं आहे. तू जे आणलं ह्याच्यात फार तथ्य आहे. हे सर्व दहा-बारा पानात, उदाहरणासहित इंग्रजीत तुला जसं जमेल तसं लिहून आण. ते आपण व्यवस्थित लिहून त्यावर एक पेपर लिहून मॅथेमॅटिक च्या दोन तीन जर्नल्स ला पाठवू. बघू काय होतंय ते. मग मी लिहून आणलेले कागद त्यांनी परत वाचले आणि ज्या ज्या ठिकाणी सुधारण्याची आवश्यकता होती तिथे सुधारून व्यवस्थित लिहून काढ म्हणून मला सांगीतलं किंवा बसून टाईप करून आणायला सांगीतलं. मी त्या पेपरच्या चार-पाच प्रति टाईप करून आणल्यावर त्यांनी माझ्याच नावाने 3-4 गणिताच्या जर्नल्स ला पाठवले. साधारण दोन महिन्यांनी मला एका जर्नल् चं उत्तर आलं.की माझा तो पेपर त्यांच्या पुढच्या महिन्याच्या आवृत्तीत प्रकाशित होईल. मला खूप आनंद झाला. मी जाजू सरांकडे धावत जाऊन त्यांना ते पत्र दाखवलं. त्यांनी माझी पाठ थापटली. खरच पुढच्या महिन्यात मला त्या जर्नल च्या दोन प्रति आल्या. त्यात माझ्या नावाने माझा तो पेपर प्रकाशित झालेला होता. मी पेढे

घेऊन सरांकडे गेलो. त्यांच्या पाया पडलो. त्यांनी मला उठवलं आणि म्हणाले कीप इट अप. एवढंच नाही तर दुसऱ्या दिवशी ते मला प्राचार्यांकडे घेऊन गेले. आमच्या प्राचार्यांनी ही माझी पाठ थोपटून त्यांनी आमच्या ऑफिस मधल्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यावर एक बातमी तयार करून दैनिक मराठवाडा व दैनिक अजिंठा या दोन्ही वर्तमान पत्राकडे पाठवायला सांगितली' मग दोन दिवसांनी त्या दोन्ही पेपर मध्ये ही बातमी माझ्या फोटो सह छापून आली. मग माझ्या इतर प्राध्यापकांनी, मित्रांनी माझं फार कौतुक केलं. पण माझ्या ह्या यशाचे खरे गुरु म्हणजे जाजू सर आहेत. मी त्यांना परत त्रिवार वंदन करतो. मी जाजू सरांना कधीच विसरणार नाही." असं बोलून पैलवाड चे डोळे भरून आले. त्या वेळी माझेही डोळे भरून आले. हॉलमध्ये टाळयांचा कडकडाट झाला. तो आजतागायत मला ऐकायला येतो आहे. असा हा सेंड ऑफ. कधी न विसरण्यासारखा, कधी न विसरता येईल असा.

जवळ जवळ सव्वातीन वर्ष मी औरंगाबादला हॉस्टेल वार्डन म्हणून काम केलं. मी वार्डनशीप घेण्या पूर्वी आमच्या विभागाचे एक सीनियर प्राध्यापक, प्रा.जोग म्हणाले होते. ' अरे इथे हॉस्टेल मध्ये फार कटकटी आहेत. तू वार्डनशीप घेऊन स्वत:चं आयुष्य पाच वर्षांनी कमी करून घेशील. ' पण खरं सांगतो, माझं आयुष्य एका वर्षानंही कमी झालं नाही. उलट वार्डन म्हणून जगलेली ती सव्वातीन वर्ष, त्या आठवणी मी आयुष्य भर जोपासून ठेवल्या आहेत. त्या तिन सव्वातिन वर्षांनी मला अनेक गोष्टी शिकवल्या. अनेक मित्र जोडता आले. माझ्या अनेक विद्यार्थ्यांचं प्रेम व आदर मला मिळाला. अजूनही

a

माझ्या काळात हॉस्टेल मध्ये राहणारे बरेच विद्यार्थी मला आठवतात. त्या पैकी काही तर 40-45 वर्षांनंतरही अजून माझ्या संपर्कात आहेत. त्यातले अनेक उद्योगपती आहेत, काही चीफ इंजीनियर, सुपरिंटेंडिंग इंजीनियर म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत, काही एम.एल.सी., एम.एल.ए. म्हणून राजकारणातही यशस्वी झाले आहेत, काहींनी आमच्या शिक्षण क्षेत्रातही चांगलं नाव कमावलं आहे. ते भेटले की जुन्या दिवसांच्या आठवणी काढतात. त्यांना पाहिलं की मी अजूनही त्यांचं नाव सांगतो. ते आश्चर्य चकित होतात. मला आठवतं, 2009 ला औरंगाबाद इंजीनीरिंग कॉलेज मध्ये भूतपूर्व विद्यार्थ्यांचा मेळावा ( Alumni Meet ) झाला होता. मी त्या मेळाव्याला गेलो होतो. एकतर मी तिथलाच विद्यार्थी होतो, अन दुसरं म्हणजे त्याच कॉलेज चा प्राचार्य म्हणून मी 2001 मध्ये रिटायर झालो होतो म्हणून. त्या वेळी अनेक जुने होस्टेलर भेटले अन् भेटताच मी बऱ्याच जणांना त्यांच्या नावा निशी संबोधलो. एक पाच सहा जणांचा ग्रुप माझ्या जवळ आला तसं मी म्हणालो ‘काय व्ही. बी. तुंगीकर, काय चाललंयं आता ? “ तसा दूसरा समोर आला अन म्हणाला ‘सर, मला ओळखलं ? मी, वडजे. ‘ मी म्हणालो ‘ अरे नुसतं वडजे काय म्हणतोस ? एस.एन. वडजे म्हण. ‘ त्यानं साक्षात दंडवतच घातला. सर्व ओरडले, ‘ सर, कमाल आहे तुमची ? तीस वर्षांनी आपण सर्व भेटतो आहे अन् तुम्ही धडाधड इनिशियल सहित आमची नावं घेत आहात.’ मी म्हणालो ‘ That shows how much I loved you and how much I lived in you. You are integral part of my life. ‘

असे हे माझ्या जीवनातले ‘ हॉस्टेल डेज ‘ चे अनुभव आणि आठवणी. अविस्मरणीय ह्या एकाच शब्दात मला त्यांचं वर्णन करता येईल . ह्या माझ्या जीवनानं मला घडवलं. आयुष्यातल्या ह्या पर्वानं मला माणसं जोडणं शिकवलं. आज ह्या वयात मी अनेकांच्या संपर्कात आहे. त्यामुळे मी एकटा आहे असं मला वाटत नाही. एलेक्ट्रोनिक मिडिया चे म्हणजे, मोबाइल, ईमेल, फेसबुक, व्हाट्सॲप चे जे काही दुष्परिणाम असतील ते असोत, पण माझ्यासारख्या माणुसघाण्या माणसासाठी ह्या उतार वयात ते एक वरदान ठरलं आहे हे नाकारता येणार नाही. एरव्ही ह्या वयात माझ्या ह्या गोतावळ्याशी संपर्क मी कसं ठेवू शकलो असतो ? मी विद्यार्थी जीवनात असताना होस्टेल मध्ये जोडलेले अनेक मित्र, मी होस्टेल वार्डन असतानाच माझ्या संपर्कात आलेले माझे विद्यार्थी, ह्यांच्याशी मी अजून बोलतो, त्यांना मेसेज, मेल पाठवतो अन् मग आम्ही त्या जुन्या आठवणींना उजाळा देतो. तो एक आनंददायी अनुभव आहे.

डॉ. बं० न. जाजू

शिवरंजन टावर्स, पाषाण, पुणे

मोबाईल 8668553115

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. बं. न. जाजू यांचं हे पाचवे पुस्तक.

डॉ. बंकटलाल जाजू हे इंजिनियरिंगचे प्राध्यापक. १९६६ पासून ते विविध इंजिनियरिंग कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य होते. त्या काळचे ते IIT Doctorate. पण त्यांचा स्वभाव निगर्वी, मिळून मिसळून रहाण्याचा आणि सर्वांकडून जे जे मिळेल ते ते शिकण्याचा. इंजिनियरिंग आणि संगीतच नव्हे तर व्यवहारज्ञानही. यातून त्यांना मनुष्य स्वभावाचे व त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे दर्शन घडले ते त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून अक्षरी आणले आणि अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. त्याचे हे अमूल्य पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसाठी ते विनामूल्य देत आहेत. त्यांची या वयातली स्मरणशक्ती अगदी तल्लख आहे हे पुस्तक वाचताना जाणवलेच असेल. त्यामुळे वेगवेगळ्या काळातील जग ते आपल्या डोळ्यांसमोर थेट उभे करतात.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७)

a

उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (५)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥